नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १८७ * * नागपूर * बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बिहारमध्ये गोभक्त निवडणूक लढवणार

■ **वृत्तसंस्था, मुझफ्फरपूर, दि. ७ :**
जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी बिहार विधानसभा निवडणुकीत सर्व जागांवर स्वतंत्र गोपूजक उमेदवार उभे करण्याचा आपला हेतू जाहीर केला आहे.

या घोषणेसह, त्यांनी सनातन धर्माचा प्रचार, गाय मातेचे रक्षण आणि समाजात सांस्कृतिक जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने बिहारमध्ये गो मतदार संकल्प यात्रा सुरू केली आहे. एका सभेला संबोधित करताना स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले की, सनातन धर्माचे रक्षण तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण गाय मातेचे रक्षण करू. गोरक्षण ही केवळ श्रद्धेची बाब नाही तर ती आपल्या संस्कृती आणि समाजाचा पाया आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

# आशेची किरणे

अखेर शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने मूलभूत कामांकरिता मदत जाहीर केलेली आहे. यावर्षीच्या विनाशकारी पावसाने लाखो एकर जमीन अक्षरशा खरडून गेलेली आहे. हे संकट अभूतपूर्व आहे. आपत्तीग्रस्त परिस्थिती येणे, अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होणे अशा गोष्टी दर दोन-चार वर्षांनी होतच असतात पण, यावर्षीच्या पावसाने जे काही जबरदस्त नुकसान केलेले आहे. त्यामुळे भविष्यात खरडून गेलेल्या जमिनीवर पुढील काही वर्षे पीक घेणे ही शक्य होण्यासारखी परिस्थिती नाही. या प्रकारच्या अशा मोठ्या नुकसानीची भरपाई पूर्णपणे होऊ शकत नाही पण, तरीही राज्य सरकारने अशा जमिनीच्या दुरुस्तीसाठी ३१ ते ३२ हजार कोटीच्या दरम्यानचे पॅकेज जाहीर केलेले आहे. महाराष्ट्राच्या तिजोरीची सध्याची परिस्थिती काय आहे हे जगात जाहीर आहे. सरकारला शेतकऱ्यांची मागणी १००% मान्य करणे शक्य नाही कारण कुठलीही आपत्तीमध्ये झालेली नुकसानीची गोष्ट असो. त्या होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण रक्कम कधीच कोणालाही मिळत नसते हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. त्या परिस्थितीतही आताच्या घडीला सरकारने जी मदत जाहीर केलेली आहे. ती निश्चितच उल्लेखनीय मानावी लागेल कारण कासावीस झालेल्या शेतकरी बांधवांना ऐन दिवाळीच्या पर्वावर दिवाळे निघण्याची वेळ आल्यासारखे झालेले आहे. लहान शेतकऱ्यांचे तर पार कंबरडेच मोडून गेलेले आहे. आता या सरकारी रकमेचा उपयोग त्याच कामासाठी होईल ज्यायोगे ती जमीन पुन्हा पेरणी योग्य होईल. याचाच दुसरा अर्थ असा की पिकाच्या नुकसानीची भरपाई या मदतीमध्ये समाविष्ट नाही, ती रक्कम कदाचित वेगळी असावी. सध्या शेतीचे दुहेरी नुकसान झालेले आहे त्यामुळे मदतही वेगवेगळ्या प्रकारे मिळालीच पाहिजे. अनेक शेतकऱ्यांनी विमा काढलेला आहे, गेले अनेक वर्ष विमा कंपन्या गडगंज नफा कमावीत आहेत. यावर्षी जल विस्फोटामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी विस्फोटक स्थिती आणून उभी केलेली आहे. एवढे सर्व झाल्यावरही शेतमालाला पुरेसा कुठेच भाव नाही हे विशेष आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांची हतबलता बघून ज्यांचे डोळे पाणावत नाहीत असा माणूस शोधूनही सापडणार नाही. त्यातल्या त्यात या आपत्तीमध्येही जे थोडेफार तथाकथित सुखी असतील, ते सोडल्यास बाकीचे आपद्ग्रस्त निदान सरकारने आपली अडचण जाणून मदत दिली, हे ऐकून त्यांनाही बरे वाटत असेल. आता ज्या ज्या भागांमध्ये पावसाचा उद्रेक झाला आहे त्या ठिकाणच्या पिकांची परिस्थिती आणि पिकांना मिळणारे उत्पन्न यांचा कुठेही ताळमेळ बसत नाही. म्हणजेच बऱ्यापैकी पीकही नाही आणि त्याहून जास्त मोठे दुःख म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाला भावही नाही. अशा गोंधळलेल्या परिस्थितीमध्ये सरकारने ज्या पद्धतीने मदतीची घोषणा केलेली आहे त्याबद्दल सरकारचे अभिनंदन केलेच पाहिजे. सरकारच्या या मदतीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, त्यांच्या जगण्याला निश्चितच दिशा मिळेल. ही फक्त आशेची किरणे आहेत असे आम्हाला वाटते. भविष्यात सरकारकडून आणखीही मदत मिळण्यासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटना मदत जाहीर करीत आहेत. त्याचाही फायदा मिळावा ही महाराष्ट्राच्या बिगर शेतकरी जनतेची अपेक्षा आहे, यापेक्षा वेगळे काय सांगावे. शेतकऱ्यांच्या टाहोला योग्य ठरवून घेतलेला निर्णय लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरावा, एवढीच आमची मनापासूनची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर

# सरकारने तिजोरी उघडली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
राज्य सरकारच्या मदती कडे आस लावून बसलेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देत राज्य सरकारच्या वतीने अखेर पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मोठे पॅकेज आपण शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा जास्तीत जास्त पैसा दिवाळीच्या आधी, शेतकऱ्यांना देता येईल, असा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रपरिषदेत ही घोषणा केली.

या पॅकेजअंतर्गत शेतकऱ्यांना केवळ जमिनीच्या नुकसानीसाठीच नव्हे, तर घरांचे व जनावरांचे नुकसान भरपाई म्हणूनही मदत मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान, वाहून गेलेली जमीन, कोसळलेली घरे आणि मृत जनावरे यासाठी स्वतंत्र अनुदानाचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत आणि महसूल यंत्रणेकडून पंचनामे पूर्ण होताच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत जमा केली जाणार आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा शेती उभी करण्यास मदत होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारकडून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर पीक पुनर्लागवड, बी-बियाणे वितरण, सवलतीचे कर्ज आणि कृषी यंत्रसामग्री पुरवठा अशा सर्व बाबींसाठी विशेष योजना सुरू करण्यात येतील. पंचनामे लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.



### २९ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मिळणार मदत

फडणवीस म्हणाले की, राज्यातील १ कोटी ४३ लाख ५२ हजार हेक्टर जमिनीवर यंदा लागवड झाली होती. त्यापैकी ६८ लाख ७९ हजार ७५६ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने तत्काळ मदत कार्याला गती दिली आहे. त्यांनी सांगितले की, ज्या भागात नुकसान झाले आहे, तिथे २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ महसूल मंडळांचा समावेश आहे. त्या सर्व भागात मदत पोहोचवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## २ सप्टेंबरच्या अध्यादेशाला
# स्थगिती नाहीच!

**उच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी ओबीसी प्रवर्गात मराठा समाजासाठी आरक्षणाचा अध्यादेश जाहीर केला होता. या निर्णयाविरुद्ध काही व्यक्तींनी उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केल्या होत्या. याचिकांकर्त्यांनी अध्यादेशावर तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली असली तरी न्यायालयाने त्याला स्पष्ट नकार दिला. त्यामुळे राज्य सरकार आणि मराठा समाजासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार, हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदीच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात आले. हा निर्णय जाहीर होताच ओबीसी संघटना आणि काही समाज घटकांनी याला तीव्र विरोध दर्शवला.

त्यांनी हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने सरकारच्या या निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने २ सप्टेंबरच्या शासन निर्णयावर अंतरिम स्थगिती देण्याची मागणी फेटाळली. म्हणजेच राज्य सरकारने जारी केलेला हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणीचा आदेश अद्याप वैध आणि प्रभावी राहणार आहे. न्यायालयाने या याचिकांवर सविस्तर सुनावणीसाठी तारीख दिली असली तरी, तात्पुरती स्थगिती नाकारल्याने सरकारचा निर्णय यथावत राहिला आहे.

राज्यातील विविध ओबीसी संघटना, जसे की कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, तसेच सामाजिक कार्यकर्ते सदानंद मंडलिक यांनी शासनाच्या निर्णयाला विरोध करीत या याचिका दाखल केल्या होत्या. परंतु, त्या कोर्टाने फेटाळून लावल्या.

## तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, त्यापैकी दोन प्रमुख निर्णय हे तुकडा बंदी अधिनियम सुधारणा आणि झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये क्लस्टर योजना लागू करण्यासंदर्भात आहेत.

तुकडा बंदी अधिनियमातील सुधारणेमुळे महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे, तर दुसऱ्या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबवण्यास मंजुरी मिळाली आहे.

**उद्योग विभाग : राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर**

■ सोने, चांदीचे दागिने, हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार. एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितीचे उद्दीष्टे.

**नगर विकास विभाग : सांडपाण्यावर प्रक्रियेचे धोरण**

■ सांडपाण्यावरील प्रक्रियेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराद्वारे चक्रीय अर्थव्यवस्थेस चालना. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार. ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबवण्यात येणार.

■ अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २.३८ हे.आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय.

■ स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार.

## सरकारच्या मदत पॅकेजवर विरोधकांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महायुती सरकारने अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदत पॅकेजवर विरोधी पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही मदत तुटपुंजी असून, सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची संतप्त टीका करत कर्जमाफीच्या आश्वासनालाही पद्धतशीर बगल दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला.

तर हेक्टरी ५० हजार रुपयांची मागणी असताना, केवळ तुटपुंजी मदत जाहीर करून, फसणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीला या सरकारने पद्धतशीरपणे बगल दिलीच, पण तोंडाला अक्षरशः पाने पुसली, असे आ. रोहित पवार म्हणाले. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेताना सरकारच्या हाताला कंप का येतो? असा सवाल सपकाळ यांनी केला.

दुसरीकडे, महायुती सरकार हे शेतकऱ्यांची थट्टा करत आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. कर्जमाफी करणार करणार फक्त तारीख पे तारीख सरकार सांगत आहे. पण नेमकी कर्जमाफी कधी देणार हे सरकार सांगत नाही, असेही ते म्हणाले.

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.




अधिक माहितीसाठी भेट द्या: https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

## युपीआय पेमेंटसाठी वापरले जाईल
# चेहरा आणि फिंगरप्रिंट

**नवीन फीचर्सला सरकारची मान्यता**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
युपीआय वापरकर्ते आता त्यांच्या चेहऱ्याचा आणि फिंगरप्रिंटचा वापर करून पेमेंट करू शकतील. केंद्र सरकारने आज, ७ ऑक्टोबर रोजी युपीआय चालवणारी एजन्सी एनपीसीआयच्या नवीन बायोमेट्रिक फीचर्सना मान्यता दिली.

एनपीसीआय लवकरच त्यांच्या वापरकर्ता पुस्तिका आणि अंमलबजावणी तारखेची माहिती जाहीर करेल. त्यात म्हटले आहे की, ही नवीन पद्धत वढक पेमेंट सोपे, सुरक्षित आणि अधिक वापरकर्ता-अनुकूल बनवेल. नवीन फीचर्समुळे युपीआय पेमेंट पर्यायी करण्यासाठी पिनची आवश्यकता कमी होईल. एटीएममधून पैसे काढण्यासाठी आणि युपीआय पिन सेट करण्यासाठी देखील फिंगरप्रिंटचा वापर होणार आहे.

## आयएएस अधिकाऱ्याची आत्महत्या



■ **वृत्तसंस्था, चंदीगड, दि. ७ :**
हरियाणाचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी वाय. पूरण कुमार यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी चंदीगडच्या सेक्टर ११ येथील त्यांच्या सरकारी निवासस्थानी स्वतःवर गोळी झाडून घेतली. पूरण कुमार हे एडीजीपी दर्जाचे अधिकारी होते. २९ सप्टेंबर रोजी त्यांना रोहतकच्या सुनारिया तुरुंगात हलवण्यात आले होते, जेथे डेरा सच्चा सौदा प्रमुख रामरहिम शिक्षा भोगत आहे.




## राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य शासनाने आज सात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केलेत.

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्रसिंह यांची बदली करून त्यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांना कुंभमेळा आयुक्त, नाशिक या महत्त्वाच्या पदावर नेमण्यात आले आहे.

नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. त्यांच्या जागी जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची नाशिक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. संजय कोलटे यांची बदली साखर आयुक्त, पुणे या रिक्त पदावर करण्यात आली आहे.

## सरन्यायाधीशांवर हल्ल्याचा प्रयत्न निंदनीय

# आठवले यांचा थेट इशारा



**मुंबई :** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा प्रयत्न ही केवळ व्यक्तीगत हल्ला नाही, तर लोकशाही आणि संविधानावर केलेले थेट प्रहार असल्याचे केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीश हा दलित समुदायातून आलेला असल्यामुळे जातीवादाच्या पूर्वग्रहातून हल्लेखोराने हा प्रयत्न केला आहे. हा प्रकार राष्ट्रद्रोह ठरवावा आणि आरोपीवर कठोर कारवाई केली जावी, असे आठवले यांनी स्पष्ट केले. न्यायपालिका ही लोकशाहीचा प्राण असल्यामुळे तिच्यावर हा हल्ला संविधान, समता आणि न्यायव्यवस्थेवरील गंभीर धक्का आहे, असेही ते म्हणाले. आठवले यांनी सरकारकडे एट्रोसिटी अॅक्ट अंतर्गत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांनी हा प्रकार संविधानिक मूल्यांवर, लोकशाहीवर आणि समतेवर केलेला हल्ला असल्याने गुन्हेगारांवर कठोर कारवाई होणे अत्यावश्यक असल्याचेही नमूद केले. सरन्यायाधीशांवर हल्ला हा लोकशाहीच्या प्राणावर केलेला हल्ला असून, रामदास आठवले यांचे मत आहे की अशा घटनांना राष्ट्रद्रोहाचा दर्जा देऊन त्वरित उत्तर द्यावे.

# नवी मुंबई विमानतळ उड्डाणासाठी सज्ज

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

देशातील सर्वाधिक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अखेर उड्डाणासाठी सज्ज झाले आहे. आज, 8 ऑक्टोबर 2025 रोजी, विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे औपचारिक उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. पनवेल जवळ उभारण्यात आलेले हे विमानतळ देशातील पहिले 5G कनेक्टेड स्मार्ट एअरपोर्ट म्हणून ओळखले जाणार आहे.

प्रवाशांना तंत्रज्ञानाधारित आणि निर्बंध अनुभव देण्यासाठी दी. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ अत्याधुनिक सुविधांनी सज्ज आहे. उद्घाटनानंतर मुंबई महानगर प्रदेशातील विमान वाहतुकीवरचा ताण कमी होणार असून, हा प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासाचा नवा टप्पा मानला जातो.

NMIA मध्ये 66 चेक-इन काउंटर, 22 सेल्फ बॅगेज ड्रॉप पॉइंट्स, 29 एरोब्रिज आणि 10 बस बोर्डिंग गेट्स असतील. विमानतळाचा अखेरचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर येथे 245 प्रवासी विमान स्टॅण्ड्स, 7 कार्गो विमान स्टॅण्ड्स, 79 जनरल एव्हिएशन स्टॅण्ड्स आणि 16 हँगर्स असतील. या विमानतळावर सर्व प्रक्रियां तत्त्वावर आधारित असून, प्रवाशांना कॉन्टॅक्ट-फ्री एंट्री, ऑटोमेटेड आयडी चेक, बॅगेज ट्रॅकिंग आणि सायबरसुरक्षा-सक्षम Wi-Fi सुविधा दिल्या जातील. डेटा ॲनालिटिक्सच्या मदतीने



विमानांचे (TAT) कमी करण्याचे लक्ष्य ठेवले गेले आहे.

प्रवाशांना प्रवासासोबतच आलिशान अनुभव मिळावा यासाठी NMIA मध्ये भव्य रिटेल आणि F&इ झोन तयार करण्यात आला आहे. येथे सुमारे 1,800 चौ.मी. ड्युटी-फ्री शॉप्स, 5,000 चौ.मी. रिटेल स्पेस, आणि एकूण 110 स्टोअर्स असतील. ॲपद्वारे प्रवाशांना रिटेल, ड्युटी-फ्री, बॅगेज सेवा आणि लाउंज चेक-इनसाठी डिजिटल सुविधा मिळतील.

विमानतळाच्या इमर्सिव एक्सपेरिअन्सियल झोन मध्ये महाराष्ट्राच्या परंपरा, कला आणि वारसा दाखवणारे डिजिटल टनेल्स आणि इंटरॅक्टिव्ह इन्स्टॉलेशन्स असतील. हा झोन मुंबई, महाराष्ट्र आणि भारताची कहाणी सजीव करण्याचा प्रयत्न करणार आहे.

व्यवसाय वर्गातील प्रवाशांसाठी विशेष CIP लाउंज तयार करण्यात आला आहे, ज्यात एकावेळी 500 प्रवासी बसू शकतात. तसेच, प्रवाशांसाठी 80 खोल्यांचे ट्रान्झिट/डे हॉटेल, होम-टू-डेस्टिनेशन लगेज डिलिव्हरी, बॅगेज रिपेअर, बॅगेज रॅप आणि क्लोक रूम अशा सुविधा देण्यात येणार आहेत. इन-हाऊस ॲपद्वारे विमानतळातील सर्व स्टेकहोल्डर्सना रिअल-टाइम माहिती मिळेल. तसेच, स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम, ऑटोमेटेड कम्युनिकेशन, आणि अक्सक्षम सुरक्षा यंत्रणा या विमानतळाला जागतिक दर्जाचा बनवतात.

NMIA चे उद्घाटन हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर भारताच्या विमानवाहतूक क्षेत्रासाठीही ऐतिहासिक ठरणार आहे. भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असताना, देशातील लक्झरी ट्रॅव्हल मार्केट झपाट्याने विस्तारत आहे. आता प्रवाशांचा कल केवळ प्रवासापुरता मर्यादित न राहता अनुभवात्मक प्रवास या नव्या पद्धतीकडे झुकला आहे. NMIA चे स्मार्ट आणि शाश्वत विमानतळ मॉडेल हे भविष्यातील भारताच्या डिजिटल सामर्थ्याचे प्रतीक ठरणार आहे. महाराष्ट्रातील रोजगार, पर्यटन आणि गुंतवणुकीच्या नव्या दारांना या प्रकल्पामुळे गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## एअर ॲम्ब्युलन्ससह पाच समुद्री बोटी रुग्णवाहिका सेवेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

महाराष्ट्रातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने ही एक ऐतिहासिक घडामोड ठरणार आहे. राज्यात नोव्हेंबरपासून एअर ॲम्ब्युलन्स सेवा सुरू होणार असून, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना क्षणार्धात वैद्यकीय मदत पोहोचवण्यासाठी दोन हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली आहे. या सेवेअंतर्गत अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज रुग्णवाहिका आणि प्रशिक्षित वैद्यकीय पथक रुग्णांच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहील. यामुळे विशेषतः डोंगराळ व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर उपचार मिळून अनेक जीव वाचवले जाण्याची शक्यता आहे. आरोग्य विभागाकडून या प्रकल्पाला आपत्कालीन वैद्यकीय सेवा (एमईएमएस 108) या योजनेचा भाग म्हणून लागू करण्यात येत आहे.

राज्यातील रुग्णवाहिका व्यवस्थेतील तक्रारी आणि सेवेमधील उणिवा लक्षात घेऊन आरोग्य विभागाने या सेवेचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात पहिल्या टप्प्यात 200 अत्याधुनिक रुग्णवाहिका रस्त्यावर धावतील. या सर्व रुग्णवाहिका 5जी तंत्रज्ञानावर आधारित असतील आणि त्या रुग्णालयांशी थेट डिजिटल माध्यमातून जोडल्या जातील. त्यामुळे रुग्णांना वाहतुकीदरम्यानच प्राथमिक उपचार सुरू करता येतील.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, "रुग्णवाहिकांच्या सेवेसंदर्भात मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत होत्या. त्यामुळे या सेवेत तांत्रिक सुधारणा आणि नव्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ज्यामुळे नागरिकांना अधिक जलद आणि कार्यक्षम सेवा मिळेल." एअर ॲम्ब्युलन्स सेवेव्यतिरिक्त आरोग्य विभागाने पाच समुद्री बोटीदेखील रुग्णवाहिका सेवेत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. ही व्यवस्था कोकण किनारपट्टीवरील आणि समुद्रालगतच्या भागांसाठी उपयोगी ठरेल.

## प्रबोधनकार ठाकरे यांचे पुस्तक वाटपावरून वादंग



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात एका निवृत्ती कार्यक्रमादरम्यान प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुस्तक वाटपावरून अनपेक्षित वादंग निर्माण झाले आहे. रुग्णालयातील कक्ष अधिकारी राजेंद्र कदम यांनी निवृत्तीच्या निमित्ताने सहकाऱ्यांना देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे हे प्रबोधनकार ठाकरे लिखित पुस्तक भेट दिले. मात्र, काही महिला कर्मचाऱ्यांना हे पुस्तक मिळाल्यानंतर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यावर सर्वांसमोर पुस्तक फेकले आणि माफी मागण्यास भाग पाडले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर रुग्णालय तसेच महापालिकेच्या वतुर्ळात खळबळ माजली आहे. घटनेची पार्श्वभूमी अशी की, 30 ऑगस्ट रोजी राजेंद्र कदम यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. समाज जागृतीसाठी त्यांनी सहकाऱ्यांना काही विचारप्रवर्तक पुस्तके भेट दिली होती. मात्र, प्रबोधनकार ठाकरे यांचे पुस्तक मिळाल्यानंतर काही महिला कर्मचाऱ्यांनी आपल्याला धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत त्यांचा निषेध नोंदवला. त्यांनी कदम यांना आपल्या कक्षात बोलावून सर्वांसमोर माफी मागण्याची मागणी केली. यावेळी महिलांनी पुस्तक फेकल्याचा आरोप करण्यात आला असून, हा संपूर्ण प्रकार मोबाइलवर रेकॉर्ड झाला आणि पुढे सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनासोबत बीएमसीच्या कर्मचारी संघटनांमध्ये संताप उसळला आहे.

# एसटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

एस टी महामंडळ कामगारांच्या विविध मागण्या आहेत. त्या रास्त असून या मागण्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कामगार संघटना सोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत सांगितले.

बैठकीस एस. टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे



संदीप शिंदे, समीर मोरे, श्रीरंग बरगे, हनुमंत ताटे, प्रकाश निंबाळकर, मुकेश तिगोटे, प्रदीप धुरंधर यांच्यासह एस टी कामगार संघटनांचे प्रतिनिधी

**परिवहन मंत्री सरनाईक यांची माहिती**

उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, कामगारांचे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व अन्य थकीत भत्ते, तसेच दिवाळी सण अग्रिम देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. सन २०१८ पासून कर्मचाऱ्यांची उपरोक्त स्वरुपाची आर्थिक देणी प्रलंबित आहेत. त्यासाठी सुमारे ४४०० कोटी रुपये लागणार आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक वेळेस शासनाकडे निधी मागणी योग्य नाही, त्याकरता एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. म्हणून मी कार्यभार स्वीकारल्या पासून एस टी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून वर्षाला सुमारे १०० कोटी रुपये, आधुनिक पार्सल सेवेच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी तसेच महामंडळाच्या बस आगारांत असलेले पेट्रोल पंप सध्या केवळ महामंडळाच्या बसेस करीता इंधन पुरवठा करतात. भविष्यात हे पेट्रोल पंप व्यावसायिक स्वरूपात सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारे वर्षाला ५००-६०० कोटी रुपयांची उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे.

# उर्दू साहित्य कला अकादमीच्या सुवर्णमहोत्सवी समारोहाचे उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**

मराठी व उर्दू साहित्यिक देवाणघेवाणीसाठी सांस्कृतिक केंद्रे म्हणजे उर्दू घर योजना आहे. हे उर्दू घर अद्ययावत बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील. तसेच उर्दू शाळा, वसतिगृहे वाढविण्यासाठी सकारात्मक असल्याचे अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. उर्दू साहित्य अकादमीची नवीन समिती लवकरच गठित करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

महाराष्ट्र उर्दू साहित्य अकदमीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वरळी डोम येथे आयोजित तीन दिवसीय साहित्यिक व सांस्कृतिक सोहळ्याचे अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. द वर्ल्ड ऑफ उर्दू या



प्रदर्शनाचेही यावेळी उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री नवाब मलिक, माजी मंत्री अनिस अहमद, आमदार सना मलिक, माजी आमदार झिशान सिद्दिकी, पंजाबी साहित्य अकादमीचे अध्यक्ष मार्क सिंह, गीतकार, औकाफ बोर्ड चे अध्यक्ष समीर काझी, पटकथा लेखक जावेद अख्तर, विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, आयुक्त प्रतिभा इंगळे यांच्यासह अधिकारी आणि साहित्यिक उपस्थित होते. यावेळी उर्दू सिखे आणि मराठी शिकूया या दोन पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

अल्पसंख्याक विकास मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले की, शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि संविधान निमार्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विभूतींनी समाजउन्नतीसाठी कार्य करताना सर्वसमावेशकता, शिक्षण, भाषेचा विकास आणि संस्कृती संवर्धन यासारख्या मूल्यांची परंपरा निर्माण केली. त्यांच्या विचारांच्या प्रभावामुळेच उर्दूसह सर्व भाषांना महाराष्ट्रात मानाचे स्थान लाभले. या आदर्शांच्या प्रेरणेनेच आज उर्दू भाषेच्या सुवर्ण प्रवासाचा सोहळा होत आहे. उर्दू ही फक्त भाषा नाही, ती संस्कृतीचा सुगंध, विचारांचा सेतू आणि आत्म्याचा आवाज आहे.

अकादमीच्या कायार्बाबत ॲड.कोकाटे म्हणाले की, ४५० पेक्षा जास्त साहित्य कार्यक्रम, २५० हून अधिक कवी संमेलने, १५० पेक्षा जास्त कार्यशाळा आणि १०० हून अधिक पुस्तक प्रकाशनांनी उर्दू साहित्याची परंपरा समृद्ध केली आहे.

२५ पेक्षा अधिक जिल्ह्यांत अकादमीने कार्यक्रम घेत ग्रामीण भागातील उर्दूप्रेमींपर्यंत साहित्य पोहोचवले. उर्दू ही भारतीय भाषा असून सुमारे सात कोटी लोक ती प्रथम भाषा म्हणून आणि १० कोटी लोक द्वितीय भाषा म्हणून वापरतात. महाराष्ट्रात सात टक्के लोक उर्दू बोलतात, तसेच जवळपास २५ पेक्षा अधिक उर्दू दैनिके कार्यरत आहेत. उर्दू घर योजनेअंतर्गत नांदेड, मालेगाव, जळगाव, सोलापूर, नागपूरमध्ये उभारणी सुरू आहे. नवोदित लेखक, उर्दू शिक्षक, लेखक, कवी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. महाराष्ट्रातील १८०० उर्दू शाळात नऊ लाख विद्यार्थांना उर्दू शिकविले जाते.

# पवार गटाला मोठा धक्का

## आमदार अरुण लाड यांचा मुलगा भाजपात



**मुंबई :** राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघालं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला मोठा धक्का बसला असून, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार अरुण लाड यांचे पुत्र शरद लाड यांनी भाजपाचा झेंडा हातात घेतला आहे. फक्त एवढंच नाही, तर सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने भाजपामध्ये प्रवेश करून विरोधकांची चूल थंड केली आहे. राज्याच्या राजकारणात लाड घराणं हे प्रभावी मानलं जातं. त्यामुळे या प्रवेशाने भाजपाला पश्चिम महाराष्ट्रात नवं बळ मिळालं आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात राज्यातील अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. या कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, सत्यजीत देशमुख, अमल महाडिक आणि सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी रविंद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा विकास वेगाने होत आहे. बारा बलुतेदारांना न्याय देत नवभारताच्या निर्मितीचं काम सुरू आहे. आज पक्षात दाखल झालेले सर्व कार्यकर्ते या परिवर्तनाच्या प्रवासाचा भाग ठरणार आहेत. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, सांगली-कोल्हापुरातील मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या या प्रवेशामुळे विरोधकांना उमेदवार शोधण्याची वेळ येईल.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ बारामतीत आंदोलन



■ **महासागर प्रतिनिधी**
**बारामती, दि. ७ :**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ बारामतीत आंदोलन करण्यात आले. बारामतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते युगेंद्र पवार यांच्यासह तालुक्यातील विविध वकील आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी मौन पाळत आंदोलन केले. यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या, देश संविधानानुसार चालतो. मात्र, हे समाजातील वितृष्ट कशामुळे निर्माण झाले आहे, हे शोधण्याची गरज आहे. या देशाला आता आत्मचिंतनाची गरज आहे. सरन्यायाधीश पद हे देशाच्या लोकशाहीचे सर्वोच्च पद आहे. या पदावरील व्यक्तीवर अशा प्रकारचा हल्ला करणे हे अत्यंत निषेधार्थ असून, हा देशातील काळ दिवस आहे.

# 'नायक' या चित्रपटाने प्रभावित केले : फडणवीस

## अक्षय कुमारच्या प्रश्नांना मुख्यमंत्र्यांची मनमोकळी उत्तरे

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'फिक्की फ्रेम्स' कार्यक्रमात अभिनेते अक्षय कुमार यांनी घेतलेल्या एका विशेष मुलाखतीत विविध विषयांवर मनमोकळेपणाने उत्तरे दिली. मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटीचा कायापालट करण्यापासून ते महाराष्ट्र पोलिसांच्या युनिफॉर्ममधील बदलांपर्यंत अनेक महत्त्वाच्या गोष्टींवर फडणवीस यांनी भाष्य केले. यावेळी त्यांनी मुंबईकरांची जाहीर माफीही मागितली.

अक्षय कुमारने फडणवीस यांना कोणत्या चित्रपट किंवा अभिनेत्याचा तुमच्यावर प्रभाव पडला, असा प्रश्न विचारला. यावर फडणवीस यांनी 'नायक' या चित्रपटाचा आवर्जून उल्लेख केला. फडणवीस म्हणाले, "चित्रपट फक्त नेतृत्वाच्या गुणांनाच नाही, तर मानवी भावनांनाही प्रभावित करतात. राजकीय चित्रपटाबद्दल बोलायचं झाल्यास, 'नायक' या चित्रपटाने मला प्रभावित केले, पण माझ्या समस्याही वाढवल्या आहेत."

यामागील किस्सा सांगताना ते म्हणाले, "जेव्हा मी अनेक ठिकाणी जातो, तेव्हा लोक म्हणतात, तुम्ही 'नायक'सारखे काम का करत नाही? मला एकदा अनिल कपूर भेटले, तेव्हा मी त्यांना म्हटले की, तुम्ही 'नायक' चित्रपट का केलात? तुम्ही नायक आणि आम्ही नालायक असे आता लोकांना वाटू लागले आहे. एक दिवसात तुम्ही इतक्या गोष्टी केल्या आणि एक बेंचमार्क सेट केला आहे."

जर तुम्ही एका दिवसासाठी चित्रपटाचे दिग्दर्शक बनलात आणि त्या चित्रपटाचे नाव महाराष्ट्र असेल, तर पहिला सीन तुम्ही कोणता चित्रित कराल, असा प्रश्न अक्षयने पुढे विचारला. त्यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रावर चित्रपट बनत असेल तर त्यातील पहिला सीन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा असेल. ते राज्याभिषेकासाठी बसलेले असतील आणि इतक्या वर्षांच्या गुलामीनंतर पुन्हा एकदा स्वराज्याचं निर्माण.. हाच तो सीन असेल.

अक्षय कुमारने त्यांना राजकारणातील खरे हिरो कोण वाटतात, असा प्रश्न विचारला.




त्यावर फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी असे उत्तर देत त्यामागील कारणसुद्धा सविस्तर सांगितले. गरीबी हटाव चा नारा सातत्याने लागला. पण 10 वर्षांत 25 कोटी लोकांना दारिद्र्य रेषेखालून वर आणण्याचे काम नरेंद्र मोदींनी केले. इतकंच नाही तर प्रत्येक क्षेत्रात भारत इतरांशी बरोबरी करतो आहे हे नरेंद्र मोदींमुळे शक्य झाले, असे फडणवीस म्हणाले.

मराठी चित्रपटांविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, मराठी थिएटरने मराठी फिल्म शक्तीशाली केली. देशातील जे भाषिक थिएटर आहेत. ते कमी होताना दिसत आहे. पण मराठी थिएटर इनोव्हेटिव्ह राहिले आहे. अभिव्यक्तीचे उदाहरण कायम ठेवले आहे. मराठी प्रेक्षक व्हायब्रंट आहे. आजही मराठी नाटक हाऊसफुल्ल होतात. काही लोकांनी तर 10 हजार नाट्यप्रयोग करण्याचा विक्रम केला आहे. नटरंगसारखा सिनेमा आला. दशावतार सारखा सिनेमा आला. सखाराम बाइंडरचा शो होतो. त्याला झेन जी पसंत करत आहे. हा मराठी ऑडिअन्स आहे, तो सिनेमाला जोडला जात आहे. मराठीत क्रिएटिव्हीटी आहे.

या मुलाखतीमध्ये अक्षय कुमारे मुख्यमंत्री फडणवीसांना फिल्मसिटीबाबतही प्रश्न विचारला. फिल्मसिटीसाठी काय कराल असे विचारले असता, फिल्मसिटीबाबत लवकरच तुम्हाला हा बदल दिसेल, असे ते म्हणाले. माझ्या मनात एक छोटी सल आहे ती अशी की 2014 ते 2014 या कालावधीत मला फिल्मसिटीसाठी काम करायचे होते ते राहून गेले. मात्र आता पुढच्या वर्षापासून हे काम सुरु होईल. मी ते ठरवले आहे. फिल्मसिटी टॉप क्लास असेल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

राज्यातील गुन्हेगारी चित्रपटात दाखवण्यात येणाऱ्या गुन्हेगारी पेक्षा पुढे निघून गेली आहे. रस्त्यावर जोपर्यंत गुन्हे घडत होते तोपर्यंत असे दिसत होते की लोक चित्रपटात पाहून ते अनुकरण करायचे. आताची गुन्हेगारी सायबर क्राईमची आहे. हे गुन्हेगार टेकसॅव्ही असतात. त्यांनी एक प्रश्नचिन्ह आमच्यापुढे निर्माण केले आहे. येत्या काळात सायबर वॉर रोखणारे नायक दिसले पाहिजेत. कारण सायबर क्राईमचा हल्लाच जणू आपल्यावर झाला आहे असे दिसून येते आहे. डिजिटल क्राईमचे मोठे आव्हान आहे.

या मुलाखतीत अक्षय कुमार यांनी मेट्रोची कामे लवकर संपवण्याची मागणी केली. तसेच हे काम पूर्ण झाल्यावर महाराष्ट्र दिनाप्रमाणे एक दिवस सुट्टी जाहीर करावी, अशी एक सूचनाही त्यांना केली. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी सविस्तर भाष्य केले. तुम्ही चांगली गोष्ट सांगितली. मुंबईत मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. त्यामुळे अनेकांना वाहतूक कोंडीतून जावे लागत असल्याने मी त्याबद्दल मुंबईकरांची माफी मागतो. असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# नाशिकजवळ साकारणार भव्य चित्रपटनगरी

## इगतपुरी येथे गोरेगावच्या धर्तीवर चित्रपट सृष्टी उभारणार : छगन भुजबळांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**

नाशिक विभाग विकास कार्यक्रम 2009 अन्वये नाशिक येथे गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर चित्रपट सृष्टी निर्माण करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. या चित्रनगरीसाठी प्रस्तावित असलेला नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीचा परिसर नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत सुसंपन्न व सुंदर आहे. त्यामुळे या ठिकाणी आम्ही लवकरच एक भव्य चित्रपटनगरी साकारणार असल्याची माहिती राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह याठिकाणी राज्याचे उपमुख्यमंत्री



अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत छगन भुजबळ बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, आजही नाशिक परिसरामध्ये अनेक हिंदी आणि मराठी चित्रपट तसेच मालिकांचे चित्रीकरण केले जाते. नियोजन विभागाने सन 2009 ते 2012 या कालावधीसाठी नाशिक चित्रपटसृष्टीसाठी रुपये 10 कोटी इतका नियतव्यय सुद्धा मंजूर केलेला होता. या प्रकल्पासाठी मौजे मुंढेगाव ता. इगतपुरी येथे प्रत्यक्ष पाहणी करून सर्वे नंबर 459 येथील 54.58 हेक्टर मधील 47 हेक्टर 39.4 आर ही शासकीय जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला देण्यासाठी जमीन जिल्हाधिकारी नाशिक यांनी महसूल विभागाला प्रस्ताव पाठवलेला आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, गोरेगाव चित्रनगरीच्या धर्तीवर नाशिक चित्रनगरी उभारण्यासाठी हा प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य व सुसाध्य आहे किंवा नाही याची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे काम दादासाहेब फाळके चित्रनगरी महामंडळामार्फत मिटकॉन या संस्थेला देण्यात आलेले होते. मिटकॉन या संस्थेने व्यवहार्यता अहवाल तयार करून महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाला सादर केलेला आहे. महामंडळाने या व्यवहार्यता अहवालाचे विश्लेषण व तपासणी करून हा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

# सोयाबीन उद्ध्वस्त, पिकात सोडली जनावरे

■ महासागर प्रतिनिधी
**मारेगाव, दि. ७ :**

सतत दीड महिना सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान केले आहे. पीक सडल्याने तसेच कोंब फुटल्याने उत्पादन थेट अर्ध्यावरच नव्हे, तर काही ठिकाणी शून्यावर आले आहे. सोयाबीनचे पीक हाती येणार नसल्याची खात्री झाल्याने तालुक्यातील केगाव येथील मनोहर



हजारे या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात चक्क जनावरे सोडली आहे. मागील काही दिवसांपासून सतत कोसळणारा पाऊस आणि किर्डीच्या प्रादुर्भावाने सोयाबीनचे पीक उद्ध्वस्त झाले आहे. तालुक्यातील अनेक सोयाबीनच्या शेतात जनावरांचे कळप चरताना दिसून येत आहे. यावर्षी वेळेवर पाऊस आल्यामुळे सुरुवातीला समाधान वाटले. परंतु, जुलै–ऑगस्टसप्टेंबर महिन्यात आलेल्या अतिवृष्टीने परिस्थिती हाताबाहेर गेली. काही ठिकाणी पिकं सडली तर काही ठिकाणी सोयाबीनला शेंगा लागल्याच नाहीत. शासनाकडून पीकविमा, नुकसान भरपाई, मदत याबाबत अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. मदत मिळाली नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. एका थैली मागे येणारे उत्पन्न फक्त १ ते २ पोते इतक्यावर आले आहे. बाजारभाव केवळ ३ हजार हजार रुपये पोते आहे. बियाणे ३ हजार ते ३ हजार ५०० , खत २ हजार, तणनाशके ३ हजार, सांगवणी ३ हजार ५०० आणि किरकोळ खर्च धरून एकूण १५ हजार रुपयांचा खर्च शेतकऱ्याच्या खिशातून गेला. उत्पन्न कमी, अपेक्षित दर नाही आणि अस्मानी संकटामुळे उत्पादन शून्यावर आल्याने शेतकऱ्यांनी पिकात जनावरे सोडली आहे. सोयाबीन कापणीसाठी मजूर मिळत नाही. त्यातून उत्पन्न हाती येण्याची फारशी अपेक्षा नाही. त्यापेक्षा जनावरांना दोन घास मिळतील, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. ९० टक्के पेक्षा जास्त सोयाबीन पिकाचे नुकसान झाल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीत सांगितले जात आहे.

रोगाची खात्री करण्यासाठी कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ तालुक्यात दाखल झाले. कृषी विभागाकडून सोयाबीन नुकसानीवर शिक्कामोर्तब झाले आहे. आता शेतकऱ्यांनी सोयाबीनमध्ये जनावरे सोडण्यास सुरुवात केली आहे. हतबल शेतकरी जनावरांना चारा म्हणून सोयाबीनच्या पिकात जनावरे सोडत आहे. हतबल शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी, अशी मागणी होत आहे.

## Change Of Name

MY OLD NAME WAS **ASHOKKUMAR MADHWANI**. NOW MY NEW NAME IS **ASHOK MADHWANI.**
**ADD :** GANESH NAGAR GURUNANAK WARD GONDIA

---

MY OLD NAME WAS **SANJAY KUMAR SONI**. NOW MY NEW NAME IS **SANJAY SONI.**
**ADD :** HOUSE NO. 1149, C A ROAD, GANDHIBAG, NAGPUR - 440002

---

MY OLD NAME WAS **ANITA SINDHI**. NOW MY NEW NAME IS **LEENA GURUMUKHADAS PARYANI.**
**ADD :** NIRANKARI BHAVAN ROAD, NEAR SHRINAGAR, GONDIA-441601

---

I, GURUMUKHADAS **ANANADRAM PARYANI**, HEREBY DECLARE THAT IN MY DAUGHTER'S EDUCATIONAL DOCUMENTS, MY NAME SPELLING WAS WRONGLY MENTIONED AS **GURUMUKHDAS PARIYANI.** BUT MY NAME IN ALL DOCUMENTS IS MENTIONED AS **GURUMUKHADAS ANANADRAM PARYANI.**
**ADD:** NIRANKARI BHAVAN ROAD, NEAR SHRINAGAR, GONDIA - 441601

---

MY OLD NAME WAS **MEENA HARISHLAL AHUJA**. NOW MY NEW NAME IS **BHAWNA MOHAN BHAGWANI.**
**ADD :** PLOT NO-45 NEAR RAJAVIR MANDIR SINDHI COLONY KHAMLA NAGPUR-440025

---

MY OLD NAME WAS **SHAHANBAJ KHAN JAHID KHAN**. NOW MY NEW NAME IS **SHAHANAWAZ ZAHID KHAN.**
**ADD :** UMRED ROAD NEAR BADA TAJBAGH NAGPUR 440009

---

MY OLD NAME WAS **NILAM AMRIT LAL RAO**. NOW MY NEW NAME IS **NEELAM RAM NARAYAN RAO.**
**ADD :** HOUSE NO. 7242, PLOT NO. 37, PRABAGH NO. 10, MAHARASHTRA CHOWK, WANADONGRI, NAGPUR - 441110

---

MY OLD NAME WAS **NAIR HARISH HARIDASH**. NOW MY NEW NAME IS **HARISH HARIDAS NAYAR.**
**ADD :** NEW KORADI GRAMPANCHAYAT NEW KORADI, PIN CODE 441111

---

MY OLD NAME WAS **AQUIB SOHEB SHEIKH MATIN SHEIKH MOBIN**. NOW MY NEW NAME IS **SHEIKH AQIB SHEIKH MATIN.**
**ADD :** NEW KORADI GRAMPANCHAYAT NEW KORADI, PIN CODE 440035

---

MY OLD NAME WAS **ASHOKKUMAR MADHWANI**. NOW MY NEW NAME IS **ASHOK MADHWANI.**
**ADD :** GANESH NAGAR GURUNANAK WARD GONDIA

---

MY OLD NAME WAS **JAHIRUDDIN**. NOW MY NEW NAME IS **ZAHIRUDDIN QURESHI.**
**ADD :** HOUSE NO. 114 JAFAR NAGAR KATOL ROAD JAMA MASJID JAFAR NAGAR NAGPUR MAHARASHTRA 440013

---

MY OLD NAME WAS **MOHD. RIZWAN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD RIZWAN ATTARI.**
**ADD :** PLOT NO. 348, SHANTI SUGANDH BHANDAR GHANDHI GATE MAHAL NAGPUR

---

MY OLD NAME WAS **MOHD. YASIN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD YASIN ATTARI.**
**ADD :** PLOT NO. 348, SHANTI SUGANDH BHANDAR GHANDHI GATE MAHAL NAGPUR

---

MY OLD NAME WAS **NOORJHAN BEGUM MUKHTAR AHMED**. NOW MY NEW NAME IS **NURJAHA BEGAM QURAISHI.**
**ADD :** PLOT NO.276 ASHIRWAD NAGAR NAGPUR, PASSPORT NO. **L9315675**

---

MY OLD NAME WAS **KALYANI BORKAR SHAMBHARKAR**. NOW MY NEW NAME IS **KALYANI KRUPAL BORKAR.**
**ADD :** L I G 240 NEW MHADA COLONY KHAT ROAD TAKIYA WARD BHANDARA - 441904

---

MY OLD NAME WAS **ANITA MEGHARAJ WANKHEDE**. NOW MY NEW NAME IS **ANITABEN MEGHARAJ WANKHEDE.**
**ADD :** SHUBHANGI SOC-2, PLOT NO. 44B, BESA, NAGPUR, PIN-440037

---

MY OLD NAME WAS **PRAVINAB ESUF KHAN PATHAN**. NOW MY NEW NAME IS **PARVIN BEGAM ABDUL NABI.**
**ADD :** FLAT NO.301/A,BEHIND SUNIL HOTEL,NEAR ATTAR MOTHERSA, SATRANJIPURA, NAGPUR 440008 MS

---

MY OLD NAME WAS **MAHFOOZ ALI**. NOW MY NEW NAME IS **SAYYAD MEHFOOZ ALI.**
**ADD :** PLOT NO. S/1 AHBAB COLONY POLICE LINE TAKLI NEAR ANANT NAGAR BUS STOP NAGPUR MAHARASHTRA 440013

---

MY OLD NAME WAS **A SUBHAN SHE SULTAN**. NOW MY NEW NAME IS **ABDUL SUBHAN BAGBAN SHEKH SULTAN BAGBAN.**
**ADD :** MURTUZA NAGAR UMARKHED YAVATMAL 445206

---

MY OLD NAME WAS **MOHAMMAD JAVED ABDUL SUBHAN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD JAVED ABDUL SUBHAN BAGBAN.**
**ADD :** NAGAPUR RUPALA POST TQ,UMARKHED YAVATMAL 445206

---

MY OLD NAME WAS **RESHMA BANO MOHAMMAD QASEEM**. NOW MY NEW NAME IS **RESHMA PARAVIN MOHD JAVED BAGBAN.**
**ADD :** NAGAPUR RUPALA POST TQ,UMARKHED YAVATMAL 445206

---

MY OLD NAME WAS **SHAHEENA KAUSAR**. NOW MY NEW NAME IS **SHAHINA KAUSAR ABDUL IMRAN.**
**ADD :** PLOT NO, 570 MOHAMMAD ALI CHOWK NAGPUR 440018

# धम्मचक्र अनुप्रववर्तन दिनानिमित्त विनोद विरघट सरांची सदिच्छा भेट

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. ७ :** अशोक विजया दशमी अर्थात धम्मचक्र अनुप्रववर्तन दिना निमित्ताने संपूर्ण भारत भर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. अशोक विजया दशमी म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयानांसाठी मोठा आनंदोत्सव व क्रांतीउत्सवच होय. या आनंद महोत्सवास मुंबई येथे कार्यरत असलेले राज्य कर व सेवा अधिकारी विनोद विरघट सर यांनी सदिच्छा भेट दिली. अकोला येथे आयोजित कार्यक्रमात लाखोंच्या संख्येने अनुयायी येत असतात या अनुयांसाठी पिण्यासाठी शितल जलची व्यवस्था दरवर्षी लॉर्ड



बुद्धा फाऊंडेशन च्या माध्यमातून केली जात असते. या ही वर्षी दिवसभर लाखों अनुयायांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाला विनोद विरघट सरांनी स्वत: उपस्थिती दर्शवून आदर्शांना वंदन करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करून ही सेवा सुरू करण्यात आली. विनोद विरघट सर मुंबई येथे अधिकारी असुनही वेळात वेळ काढून प्रत्येक सामाजिक कार्यास कोणतेही कारण न सांगता हजर राहतात. सामाजिक जागृती, शिक्षण व आरोग्य सेवे साठी ते सदैव तत्पर असताना. विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा मिळावी व समाजात अधिकारी निर्माण व्हावे म्हणून त्यांनी वाचनालय सुद्धा सुरु केले आहे. विजया दशमी निमित्ताने अकोला येथे सदिच्छा भेट दिल्याने समाजात सकारात्मक व तरुणांमध्ये प्रेरणादायी उर्जा निर्माण झाली. आणि हिच उर्जा सामाजिक कार्य करण्यासाठी प्रेरणा देते. विनोद विरघट सरांबरोबर सिरसाट सर, मेश्राम सर सुद्धां उपस्थित होते.

# सोयाबीनची सोंगणी सुरू केली असतानाच पावसाचा जोरदार दणका



**बोरगाव मंजू :** 'पावसा, थांब जरा, खूप झाले बरसून, विसावा घे जरा, असा कसा रे तू , नको तेव्हा खूप बरसतो, हवा असतो तेव्हा आभाळाकडे डोळे वेधून, वाट पाहायला लावतो, मृग नक्षत्रात पेरणीच्या वेळी लांब सुटीवर जातो, पिके डोलायला लागले की क्षणातच पुरात सर्व वाहून नेतोय, ही आहे गत दोन दशकांपासून मान्सूनच्या लहरीपणा शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. यावर्षी सुद्धा मृग नक्षत्रात पावसाने दडी मारल्यामुळे पेरण्या लांबणीवर पडल्या होत्या. अवेळी पाऊस ,गत दोन महिन्यांपासून संततधार पाऊस पडतो आहे. त्यामुळे खरिपातील पिके बाधित झाल्याचे वास्तव समोर असताना या अतिवृष्टीच्या तावडीतून काही प्रमाणात सोयाबीन पीक शेतात उभे असताना गत आठवड्यात पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाचे सोंगणी सुरू केली असतानाच आता मात्र ऐनवेळी परतीच्या पावसाने सोमवारी मध्यरात्री बोरगाव मंजू परिसरात दमदार हजेरी लावली. त्यामुळे शेतात नदीच्या पाण्यासारखे स्वरूप आले. यामध्ये सोंगुन ठेवलेल्या सोयाबीन पिकाची नासाडी उघड्या डोळ्यांसमोर अतिवृष्टीमुळे एका रात्रीत होत्याचे नव्हते झाले आणि शेतकरी कमालीचा धास्तावलेल्या अवस्थेत असतानाच हे नवं संकट उभे ठाकले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे आता मात्र शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे.

## कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी

त. हिंगणा, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. : ९८२३५१४९९५, ई – मेल : mcwanadongari2016@gmail.com

जावक क्रमांक: न.प.वा/निवडणूक -३३/२०२५ — दिनांक: ०७/१०/२०२५

### वानाडोंगरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५
### जाहीर सूचना

वानाडोंगरी नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे | ०८/१०/२०२५ |
| प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०८/१०/२०२५ ते १३/१०/२०२५ |
| अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे. | २८/१०/२०२५ |
| मतदान केंद्राची यादी प्रसिद्ध करणे. | ०७/११/२०२५ |

प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी दिनांक ०८/१०/२०२५ रोजी कार्यालयाच्या नोटिसबोर्डवर, न.प. अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, सदर प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवर हरकत व सूचना घ्यावयाची असल्यास संबधितानी दिनांक ०८/१०/२०२५ ते १३/१०/२०२५ पर्यंत नमुना – अ किंवा नमुना – ब मध्ये विहित पुराव्यासह लेखी स्वरूपात नगरपरिषद वानाडोंगरी कार्यालय येथे सादर करावेत.

**टीप :- कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पद्धतीने किंवा एकत्रित यादींच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.**

(राहुल परिहार)
मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

# आर्णीत आदिवासींचा जनआक्रोश मोर्चा, शहरात रास्तारोको

■ महासागर प्रतिनिधी
**आर्णी, दि. ७ :**

बंजारा समाजासह धनगर व इतर समाजाकडून होत असलेल्या आदिवासी आरक्षणाच्या मागणी विरोधात आता आदिवासी समाज आक्रमक झाला असून आर्णी तालुका सकल आदिवासी समाजाच्या वतीने सोमवारी दि. ६ ऑक्टोबरला आर्णी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथून आरक्षण बचाव मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्र राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढण्यात आलेल्या हैद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाज आदिवासी आरक्षणात समावेश करण्यासाठी मोर्चे आंदोलन करत आहे. त्यामुळे आता आदिवासी समाज सुद्धा बंजारा समाजाच्या मागणी विरोधात आक्रमक झाला असून महाराष्ट्रभर मोर्चे आंदोलन करत आहे. याचेच पडसाद महाराष्ट्रातील जिल्ह्यात तालुक्यात उमटत असून अशातच आर्णी तालुका सकल आदिवासी समाजाच्यावतीने सोमवारी आदिवासी आरक्षण बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

सोमवारी आर्णी तालुका सकल आदिवासी समाजाच्या वतीने आदिवासी आरक्षण जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान या मोर्चला दहा हजार पेक्षा जास्त समाज बांधवांची उपस्थिती होती.



विशेष म्हणजे महिलांचा उस्फुर्त सहभाग होता. त्यामुळे या मोर्चात सहभागी होणाऱ्या बांधवानी, तरुणांनी व महिलांनी आदिवासी समाजाची संस्कृती असलेली पोशाख परिधान केली होती, तसेच आदिवासींचे उपजीविकेचे व्यवसाय असलेले देखावे झार्कीच्या माध्यमातून या मोर्चात पाहायला मिळाले. आयोजकांनी सुद्धा आदिवासी समाजातील थोर महापुरुषांच्या झार्कीचे दर्शन यावेळी घडवले.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
अभियांत्रिकी कार्य

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा सूचना क्रमांक १३-२०२५-एसआरडीईएनसीओ. कामाचे नाव:- १) टीकेडब्ल्यूडी (फेज-१) येथे प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपो २) टीकेडब्ल्यूडी येथे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या तपासणी आणि देखभालीच्या कामांसाठी ट्रिप मेंटेनन्स/अॅडव्हान्स तपासणी केंद्रांची निर्मिती. कामाची अंदाजे किंमत:- रू.३८,३०,५५,०८५.४८/- सर्वात कमी खर्च:- रु. २०,६५,३००.००/- काम पूर्ण होण्याचा कालावधी:- १२ महिने. देखभालीचा कालावधी:- १२ महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:- १३-२०२५-एसआरडीईएनसीओ- २४/१०/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:- १३-२०२५-एसआरडीईएनसीओ- २४/१०/२०२५ दुपारी ३.३० वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल / शुध्दीकरण लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in ANJ-59

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखें

## महानिर्मिती — भु. औ. वि. कें.

ई-निविदा सूचना क्र. १६ /२०२५-२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा / कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत / बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ३०००06२३४८ / बाष्पक संधारण विभाग २ x ५०० मे. वॅ | भु.औ.वि.केंद्र दीपनगर, येथे शॉर्ट शटडाउन असताना आवश्यकतेनुसार आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा बॉयलर ट्यूब गळती एच.पी. वेल्डिंगद्वारे आणि अलाइड वर्क्स पाहण्यासाठी कामाचा करार. | रु.१,०६,६७,८०२/- / रु.१,१०,२००/- |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या. https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.)
भु. औ. वि. कें., दीपनगर.

**MIRAE ASSET** Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / seminars, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
|---|---|---|
| October 10, 2025 | 6:30 P.M. | The seven Hotel, Surendra Nagar, Nagpur - 440 015. |

**MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited.** CIN - U65990MH2019PTC324625)
**Registered & Corporate Office:** 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), ✉ customercare@miraeasset.com www.miraeassetmf.co.in

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### E-TENDER NOTICE

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e-tenders in B-1 form / appropriate form for the following works. These e-tenders can be purchased by experience licensed electrical contractor from Website **(https://Mahatenders.gov.in).** The terms and conditions of e-tenders are available on above website. Purchase and submission of e-tenders can be done through internet.

| Name of Work | Project Cost in Rs. |
|---|---|
| Shifting of existing Ht & Lt Line which causes obstracle for construction of bridge in r/o the executive engineer Ashinagar zone 9 Nagour at Tarkeshwar Nagar under Nara Section, Lashkaribag Subdivision under civil lines Division. | **10,07,098/-** |

**Note : (1)** Tender Submission end date : **14-10-2025 (3.00 pm.)**
**(2)** Date of Opening of Tender (If Possible) : **15-10-2025 (3.00 pm.)**
**(3)** Rates are exclusive of G.S.T.

**Advt No 537 PR**
**Date: 07.10.2025**

**Executive Engineer (Electrical)**
**N.M.C., Nagpur**

P/N/25/537

## कार्यालय नगर परिषद सावनेर जिल्हा नागपुर

क्रमांक–नपसा/पा.पु.वि./नि.स./३६६८/२०२५ — दिनांक:–०६/१०/२०२५

### निविदा सूचना

मा. मुख्याधिकारी, नगर परिषद सावनेर, जिल्हा नागपूर यांचे वतीने खालील कामाच्या बी–१ दोन लिफाफा पद्धतीने आरोग्य विभागा करिता खालील कामासंबंधित कंत्राटदारांकडून/पुरवठा धारकांकडून निविदा दर मागविण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदा दि. ०८/१०/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता पासून ते दि. १४/१०/२०२५ ला दुपारी ०४.०० वाजेपर्यंत त्यांचा कालावधीत कामाचे सोलबंद लिफाफ्यात या कार्यालयात सादर करावयाचा आहेत. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामाचे निविदा पत्रक दि. ०८/१०/२०२५ पासून ते दि.१४/१०/२०२५ पर्यंत सबंधित कार्यालयातून प्राप्त करता येईल. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा प्रपत्र | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | नगर परिषद सावनेर मोकाट कुत्र्यांचा व्यवस्थापणासाठी जाळीचे पार्टिशन बसविण्याचे काम. | ५००/– | २०००/– | २ महिने कार्यादेश मिळाल्यापासून |

अटी व शर्ती :–
१) शक्य झाल्यास प्राप्त निविदा त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता निविदाधारकांना समक्ष उघडण्यात येईल.
२) कोणती एक अथवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी यांना राहतील.
३) निविदा संबंधित इत्तर सर्व अटी व शर्ती कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
नगरे परिषद सावनेर

## DIVISIONAL FOREST OFFICER, SOCIAL FORESTRY, NAGPUR

**(Maharashtra Forest Department, Government of Maharashtra)**

Office: New Administrative building (Vanbhavan), 001 Ground Floor, Zero Mils, Civil Line, Nagpur 440001

Ref. No.: Sec-Plan/SFD/N/25.26/942 — Dated: 06/10/2025

### NOTICE INVITING TENDER

Notice inviting 'Request for Proposal' (RFP) from competent and experienced persons/ firms/ organizations for providing Hi Tech tissue culture lab Consultancy Services for construction of Hi-tech tissue culture lab at Ambazari Dist. Nagpur.

| Name of the work | Earnest money deposit (Rs). | Bid processing fee | Period of completion |
|---|---|---|---|
| Project Management Consultancy Services for establishment of Hi-Tech Tissue Culture Lab at Gate no. 03, Compartment no. 703 Ambazari Dist. Nagpur | Rs.10,000/- (Rs Ten thousand only) | Rs.1180/- (Rs One Thousand One Hundred Eighty only) | 18 months (Eighteen months) |

| | | |
|---|---|---|
| (I) | Bid Document Downloading Start Date | From: 06/10/2025, 15:00 hrs. |
| (ii) | Bid Document Downloading End Date | Up to: 14/10/2025, 18:00 hrs. |
| (iii) | On line submission of technical proposal and financial proposal end | Up to: 14/10/2025, 18:00 hrs. |
| (iv) | Opening of tender online (Technical proposal only) | On 15/10/2025, 12.00 hrs. |
| (v) | Date of opening of financial proposal | After the result of Technical Bid |

**Note:**
For any query/clarifications, please contact - ddsfdnagpur@gmail.com on or before

**Terms:**
a) This notice and tender documenta are available on the following internet site address for e-tender- http://mahatondors.gov.in.
A complete set of tender documents can be downloaded from the above website,
b) Bids shall remain valid for 180 days (one hundred and eighty days) from the last date of submission of bid.
c) Any bid not accompanied by Bid Processing fee and Earnest Money Deposit will be rejected as non-responsive.
d) Divisional Forest Officer Social Forestry, Nagpur will not be responsible for any delay in submission of bid in electronic / physical form
e) Divisional Forest Officer Social Forestry, Nagpur reserves the right to accept or reject any bid and to cancel the bidding process and reject all bids at any time prior to award of the contract without incurring any liability to the affected bidder or bidders or any obligation to inform the affected bidder or bidders.
f) Address of Communication -
**Divisional Forest Officer Social Forestry, Nagpur**
**New Administrative building (Vanbhavan), 001 Ground Floor, Zero Mils, Civil Line, Nagpur 440001**

क्र. संमावज/नाग/४४०/२०२५

न्यायसंस्थेचा सन्मान आणि स्वातंत्र्य हेच आपल्या लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या आधारस्तंभांना धक्का पोहोचू नये यासाठी सरकार, समाज आणि प्रत्येक नागरिकाने जागरूक राहणे ही काळाची गरज आहे. हे आता सांगण्याची गरज का निर्माण झाली? असा प्रश्न पडू शकतो. त्याला कारणच असे घडले आहे की, सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयाच्या आवारातच हल्ल्याचा प्रयत्न झाला. ही घटना अत्यंत धक्कादायक व मनाला अस्वस्थ करणारी ठरली आहे. जर न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च आसनावर असणाऱ्या व्यक्तीवर हल्ला होत असेल, तर या देशात आता सुरक्षित आहे तरी कोण? असा प्रश्न जरूर निर्माण झाला आहे. हा देश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आहे, न्यायाचा आहे, समानतेचा आहे. कुणाच्याही जाती-धर्माच्या अहंकाराचा नाही. संविधानावर हल्ला करणाऱ्यांना लोकशाहीच्या न्यायालयातच चपराक बसवावी लागणार आहे. 'सनातन धर्मा'च्या नावाखाली द्वेष पसरवणारे आता न्यायाच्या मंदिरातही घुसले असल्याने समाज जागा होईल की नाही याबाबत आता शंका निर्माण झाली आहे. कारण ही केवळ धोक्याची घंटा नाही, तर संविधान, सामाजिक न्याय आणि समानतेवर थेट प्रहार झाल्याची अत्यंत वाईट घटना आहे. देशाच्या सरन्यायाधीशांना लक्ष्य करण्याची बाब चीड आणणारीच नव्हे तर संताप आणणारी आहे.

आपल्या देशात पेरलं जाणारं विष आता संविधानाच्या सर्वोच्च संस्थांनाही जुमानत नाही, ही देशासाठी धोक्याची घंटा आहे. लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना आधार मानून वाद-प्रतिवादातून न्याय्य भूमिकेकडे जाण्यासाठी न्यायव्यवस्था असते. त्याच न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च संस्थेत मुख्य न्यायमूर्तींवर अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न होणं हा केवळ न्यायव्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाहीचा, संविधानाचा आणि देशाचा घोर अवमान आहे. न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचे डावपेच गेल्या काही दिवसांपासून चर्चेत होतेच. परंतु आता त्याची अनुभूती यायला लागली आहे. लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना हे आव्हान आहे. न्यायमूर्तींची सुरक्षा सुनिश्चित करण्याकडे आता सरकारला लक्ष द्यावेच लागणार आहे. अन्यथा न्यायव्यवस्थेकडे गांभीर्याने पाहायचे दिवस संपून जातील.

या देशातील सुदृढ लोकशाही टिकून राहावी, यासाठी सरकारला कठोर पावले उचलावी लागतील, तरच न्यायालयाचा सन्मान राखला जाईल. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकारला अति कठोर व्हावे लागेल. भूषण गवई यांच्यावर कोर्टरूममध्ये झालेला हल्ला हा केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर झालेला हल्ला समजावा लागेल. आता असं म्हणायला हरकत नाही की, उच्चवर्णीय मानसिकतेचं विष अजूनही या देशाच्या नसानसांत भिनलयं व ते आता ओसंडून वाहायला सुरू झाले आहे. जे संविधानाचं रक्षण करतात, जे अन्यायाविरुद्ध उभे राहतात. त्यांच्यावरच हल्ले होत असेल, तर हा देश आता नेमक्या कोणत्या दिशेने निघाला आहे, याबाबत आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे.

# या देशात आता सुरक्षित आहे तरी कोण?

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान एक धक्कादायक घटना घडली. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला. सुप्रीम कोर्टात एका वकिलाकडून सुनावणी दरम्यान बूट फेकण्याचा प्रयत्न झाला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला वेळीच रोखलं. या वकिलाने सुनावणी दरम्यान मंचाच्याजवळ जाऊन बूट काढून फेकण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वेळीच त्याला अडवलं. त्यावेळी सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला कोर्टाबाहेर काढलं, त्यावेळी तो वकिल आरडाओरडा करत होता, 'सनातनचा अपमान सहन करणार नाही'. त्यामुळे या हल्ला प्रकरणामागे एक वेगळेच षडयंत्र असल्याचे दिसून आले आहे.

असे असले तरी संपूर्ण न्यायव्यवस्थेचं वैभव, स्वातंत्र्य आणि सर्वोच्च न्यायालयाचा निःपक्षपातीपणा राखण्यासाठी देशाच्या सरन्यायाधीशांच्या आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या पाठीशी एकजुटीनं उभे राहण्याची ही वेळ आहे. न्यायासन हे केवळ व्यक्तीचे नव्हे तर राष्ट्राच्या न्यायबुद्धीचे आणि संविधानिक प्रतिष्ठेचे प्रतीक असते. त्यामुळे अशा व्यक्तीवर हल्ला करणे म्हणजे न्यायसंस्थेचा आणि अप्रत्यक्षपणे संपूर्ण भारतीय लोकशाहीचा अपमान करणे होय.

विचारभेद आणि असंतोष हे लोकशाहीत स्वाभाविक असले तरी त्याची अभिव्यक्ती हिंसा, अवमान किंवा



अपमानाच्या स्वरूपात होत असेल तर ती प्रवृत्ती समाजात अराजक आणि अविश्वास निर्माण करते. विशेषतः जेव्हा न्यायालयासारख्या सर्वोच्च संस्थेच्या प्रमुखावर अशा प्रकारे हल्ला करण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा ते केवळ व्यक्तिपरत्वे नसून न्यायाच्या अधिष्ठानालाच कलंक लावणारे ठरते.

मुळातच भूषण गवळी यांची सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्यावर अनेकांच्या पोटात कालवाकालव झाली होती. पण काही काळ गेल्यानंतर जे पोटात होते ते ओठात आले व नको तो इतिहास घडून गेला. वस्तुस्थिती अशी आहे की, न्यायालयाचा अवमान करणे हे लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना घातक मानले जाते. सुदृढ लोकशाही टिकून राहण्यासाठी न्यायालयाचा सन्मान आणि न्यायमूर्तींची सुरक्षा सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

पण सर्वोच्च न्यायालयात नुकतेच घडलेले वर्तन हे कायदा क्षेत्राच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारं ठरलं आहे. तसंच ते योग्य वर्तन, शिस्त आणि संस्थेच्या विश्वासार्हतेबाबतच्या घटनात्मक मूल्यांच्या विरोधी आहे.

देशाच्या सरन्यायाधीशांविरोधात वैयक्तिक स्वरुपात करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा हावभाव किंवा त्यांची निंदानालस्ती करण्याचा केलेला कोणताही प्रयत्न हा देशाच्या स्वतंत्र न्यायव्यवस्थेवर केलेला थेट हल्ला आहे आणि न्यायदानाच्या व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कमी करणारा आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई हा सर्व प्रकार सुरु असताना शांत होते. ते म्हणाले की, अशा प्रकारांनी आम्ही विचलित होत नाही' अन् समोरच्याकडे बघून म्हणाले की, तुम्ही तुमचा युक्तीवाद सुरु ठेवा. पोलिसांनी त्या वकिलावर अजूनही कारवाई केलेली नाही. काय तर म्हणे न्यायालयाने तक्रार केली नाही.

आपल्या देशात पेरलं जाणारं विष आता संविधानाच्या सर्वोच्च संस्थांनाही जुमानत नाही, ही देशासाठी धोक्याची घंटा आहे. कोणत्याही परिस्थितीत भारतीय लोकशाहीचे स्तंभ कमकुवत होणार नाहीत, यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे.

### लोकशाही संवादाच्या मुळावरच घाव घातला

मध्य प्रदेशातील खजुराहो येथील एक मंदिरात भगवान विष्णूच्या तुटलेल्या मूर्तीची दुरुस्ती आणि देखभाल करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावण्यात आली होती. त्यावेळी खंडपीठानं म्हटलं की, हे प्रकरण न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात नव्हे, तर भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या अधिकारक्षेत्रात येतं. या याचिकेला 'प्रसिद्धीसाठी दाखल केलेली याचिका' असं म्हणत खंडपीठानं याचिकाकर्त्याला म्हटलं की, जर तो भगवान विष्णूचा मोठा भक्त असेल, तर त्यानं प्रार्थना करावी आणि थोडं ध्यान करावं. सरन्यायाधीशांच्या या वक्तव्यावर विश्व हिंदू परिषदेनं आक्षेप घेतला होता. तसेच सरन्यायाधीशांनी आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवलं पाहिजे, असा सल्ला दिला. त्यावेळी 'मी सर्व धर्मांचा विश्वास ठेवतो आणि सर्व धर्मांचा आदर करतो' असं गवई यांनी स्पष्ट केलं होतं. या घटनेतून काही घटकांची असहिष्णु आणि नीच प्रवृत्ती उघड झाली आहे, जी अविचारांच्या टोकावर उभी राहून लोकशाही संवादाच्या मुळावरच घाव घालते. मतभेद मांडण्यासाठी घटनात्मक आणि सभ्य मार्ग उपलब्ध असताना अशा हिंसक कृतींचा अवलंब करणे हे केवळ कायद्याचा अपमान नाही, तर भारतीय संस्कृतीतील संयम, संवाद आणि आदर यांच्या परंपरेचा अपमान आहे. म्हणूनच, या कृतीचा तीव्र निषेध करताना सरकारने आणि कायदा रक्षक संस्थांनी दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य पुन्हा होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

---

# पुन्हा एकदा औषधींच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह!

मागील काही काळापासून देशातील आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे उडत असतानाच बोगस कफ सिरप प्याल्याने राजस्थान आणि मध्यप्रदेश मध्ये लहान मुलांचा मृत्यू झाल्याने आरोग्य व्यवस्था खडबडून जागी झाली आहे. रुग्णांसाठी औषध हे व्याधीवर मात करून प्रसंगी जीवनदायी ठरते, आणि याच विश्वासाने डॉक्टरांच्या सल्ल्याने ती औषधी घेतली जातात. तद्वतच दिलेली औषधी सुद्धा गुणवत्तेस पात्र ठरणारी असावीत.

औषधी ही गुणवत्तापूर्ण नसणे अथवा बनावट असल्यास त्याच्या विपरीत परिणाम होऊन शारिरिक व्याधी तीव्र होतात.प्रसंगी मृत्यू सुद्धा ओढावतो. अलीकडेच मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात कफ सिरप प्राशन केल्यामुळे एका महिन्यात नऊ मुलांचा मृत्यू झाला. त्याचप्रमाणे राजस्थान मधील सिकर येथे सरकारी रुग्णालयात मोफत औषधी योजनेअंतर्गत कफ सिरप दिल्यामुळे काही बालके दगावली.

मध्यप्रदेश मध्ये ज्या कप सिरपचे नमुने घेण्यात आले, त्यामध्ये डायथिलीन ग्लायकोल आढळले. हे कप सिरप नसून एक औद्योगिक रसायन आहे.तज्ञानुसार जर कफ सिरप बनवण्यासाठी याचा वापर एक टक्क्या पेक्षा अधिक केला,तर अत्यंत धोकादायक ठरते. त्यामुळे किडनी, यकृताची समस्या उद्भवून मृत्यू ओढाऊ शकतो.

मध्यप्रदेशच्या घटनेसोबतच राजस्थान मधील भरतपूर येथे एक मुलगा आणि स्वास्थ्य केंद्राचे प्रभारी असे सिरप पिल्यामुळे गंभीर आजारी पडले होते. त्यामुळे राजस्थान सरकारने त्या सिरपवर बंदी घातली आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

राज्यासह संपूर्ण देशात बनावट औषधी व डॉक्टरांचा सुळसुळाट असल्याच्या बातम्या अनेक वेळा प्रसारमाध्यमात प्रसारित होत असतात. अनेक व्हेटर्नरी डॉक्टर ह्यूमन पेशंटला औषधी लिहून दिल्याचे प्रकारही काही कमी नाहीत. डॉक्टरांच्या चिठ्ठीविना मेडिकल मधून सहज औषधी मिळत असते. अशावेळी औषधींच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह सहजच उपस्थित होत असतो. रुग्णांच्या आरोग्याशी खेळ मांडण्याची घटना ही केवळ राजस्थान,मध्यप्रदेश, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्रातील नसून संपूर्ण देशाची बनलेली आहे.

एखाद्या राज्यात बनावट औषधींचा साठा सापडल्यानंतर ती जप्त केली जाते. मात्र ज्या बाधक घटकांची मात्रा औषधात आढळून आली त्या औषधीवर त्वरीत बंदी घातली जाते. मात्र जिथे अशा औषधीची निर्मिती होते, तिथ पर्यंत पोहोचण्याची अनास्था कमालीची असते. चौकशी बसतात,औषधींची नमुने घेतली जातात, मात्र त्यांचा परीक्षण अहवाल विलंबाने येतो. तो पर्यंत ही औषधी छुप्या मार्गाने विक्री सुरूच असते. बनावट कफ सिरप प्याल्याने बालकांचे मृत्यू झाल्याची घटना ही काही नवीन नाही.यापूर्वी जागतिक आरोग्य संघटनेने भारतात तयार झालेल्या चार कप सिरप वर प्रतिबंध घातले होते.त्यात आफ्रिकेतील ग्लाबिया देशात कफ सिरप केल्याने ६६ मुलांचा मृत्यू झाला होता. या घटनेने देशाची प्रतिमा मलीन झाली होती.

मध्य प्रदेशातील छिंदवाड्यातील कफ सिरप पाल्याच्या घटनेनंतर त्या सिरपची चाचणी केल्याचा अहवाल प्राप्त झाला. ज्या कफ सिरप प्याल्याने बालकांचे मृत्यू झालेत त्यामध्ये कुठलेही दूषित घटक नसल्याचा निवाळा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिला आहे.परंतु बालके दगावल्याच्या घटनेवर पालकांची गंभीर चिंता आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालया अंतर्गत आरोग्य सेवा महासंचालयांनी(डीजीएचएस) दिशानिदेशांत म्हटले आहे की,सर्वसाधारणपणे पाच वर्षाखालील मुलांसाठी कफ सिरपची शिफारस केली जात नाही. तर मोठ्या मुलांसाठी त्याचा वापर काळजीपूर्वक केला जातो. म्हणून क्लीनिकल मूल्यांकन, बारकाईची देखरेख आणि योग्य डोसचे काटेकोर पालन ; तसेच अनेक औषधी देणे टाळले पाहिजे असे दिशानिर्देश दिले आहेत.

मात्र त्याचे गांभीर्याने पालन करणे डॉक्टरांची जबाबदारी आहे. तसेच त्यावर अंकुश ठेवणे आरोग्य विभागाचे आद्य कर्तव्य ठरते. आज अनेक रुग्ण सरकारी रुग्णालयातून मोफत औषधी मिळतात. म्हणून, रुग्णांचा विचार न करता थेट केमिस्टला कफ सिरपची मागणी करतात. औषधींचा वापर आणि वितरणसाठी औषधी निर्मात्यापासून, तर डॉक्टरांपर्यंत प्रोटोकॉल आहे.त्याचे पालन होणे गरजेचे आहे. तसेच सामान्य नागरिकांनाही त्याची जाणीव करून घेतली पाहिजे, तर अनेक संकटापासून आज संरक्षण होईल.

---

# लोकशाहीच्या मंदिरात विकृतीचा आरसा!

जय महाराष्ट्र !, माझा महाराष्ट्र ! आपण हे शब्द किती अभिमानाने उच्चारतो. पण हल्ली विधानभवनात, या लोकशाहीच्या मंदिरात जे काही पाहायला मिळतंय, ते पाहून प्रश्न पडतोः खरोखर 'माझा' आहे का हा महाराष्ट्र? हीच का माझ्या महाराष्ट्राची संस्कृती? जिथं ज्ञान, विचार, क्रांती आणि संस्कृतीचं भान होतं.

---

महाराष्ट्राचं विधानभवन हे मंदिर आहे लोकशाहीचं मंदिर. जिथं आपल्या, तुमच्या आमच्या सामान्य जनतेच्या जीवनाशी निगडित प्रश्न विचारले जातात. या मंदिरात जनतेचे, कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे, युवकांचे प्रश्न उपस्थित व्हायला हवेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढतं कर्ज, शेतकरी कर्जमाफी, महागाई, बेरोजगारी, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न, शिक्षणातील अडथळे यावर चर्चा व्हायला हवी, उपाय सुचवले जायला हवेत, पण इथे काय घडतंय?



आपले निवडून गेलेले आमदार मंडळी... 'कोणी कॅंटीनवाल्याशी भांडतंय,' 'तर, कोणी कथित पैश्यांची बॅग घेऊन फिरतंय,' 'कोणी सभागृहातच तंबाखू मागतंय,' 'कोणी सभागृहाच्या प्रागंणातच हाणामारी करतंय, आणि प्रगल्भ भाषेचा वापर करतंय,' 'आणि चौथे मंत्री अधिवेशन चालू असताना मोबाईलमध्ये रमी (जुगार) खेळताना दिसतात !' व्वा ! हे काय सुरू आहे आपल्या लोकशाहीच्या मंदिरात? हेच का आपले सुसंकृत महाराष्ट्राचे लोकप्रतिनिधी? लोकशाहीचे रक्षणकर्ते? त्यांचं वर्तन पाहून तुम्ही आम्ही सामान्य नागरिक काय शिकणार? राज्याचा सर्वोच्च सभागृहात हे असे तमाशे होत असेल तर तुम्ही आम्ही कुठे जायचे हो?



हेमंत हरिदास भोंबे
तळेगाव (शामजी पंत),
आष्टी, जिल्हा वर्धा.
8483847467

महाराष्ट्रातील नागरिकांनी निवडून दिलेला आमदार जो लोकांच्या प्रश्नांसाठी लढायला गेला आहे तो जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून मोबाइलवर गेम खेळतोय ! आणि मग प्रश्न पडतो, हे लोक कोणासाठी निवडून आले आहेत? जनतेसाठी? की स्वतःच्या स्वार्थासाठी?

शेतकरी रोज कर्जाच्या खाईत बुडतोय, रोज दिवस निघाला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतायेत, त्यांचा मालाला भाव नाही, त्यात निसर्गाचं चक्र, कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ, आणि आमचे कृषीमंत्री, जे स्वतःच्या पदाला ओसाड गावाची पाटीलकी म्हणतात ते अधिवेशनात जंगली रम्मी खेळण्यात व्यस्त आहेत ! मग कशा थांबणार शेतकरी आत्महत्या? कसा मिळणार शेतकऱ्यांना न्याय? आणि कुठे मागावा शेतकऱ्यांनी न्याय?

आज महागाईने सामान्य माणसाचं कंबरडं मोडलंय, बेरोजगारीने तरुण पिढी नैराश्याच्या गर्तेत आहे, ग्रामीण आरोग्य यंत्रणा कोलमडली आहे, मराठी शाळा बंद पडतायत, शिक्षणाचा बाजार होत आहेत, पाणी संकट, वीज प्रश्न, रस्ते, शिक्षण सर्वत्र अडचणीच अडचणी. या प्रश्नांवर चर्चा व्हायची, निर्णय व्हायचे, पण होतेय काय ?

जर सत्तेच्या नशेत, अहंकारात, आणि बेजबाबदार वागण्यात लोकशाहीचे स्तंभच कोसळत असतील, तर सामान्य जनतेचं काय होणार? तुमच्या एका चुकीमुळे संपूर्ण व्यवस्थेवर लोकांचा विश्वास डळमळीत होतो, हे समजतंय का?

लोकशाही ही केवळ संकल्पना नाही तर ती एक आचारसंहिता आहे. ती जपणं, वागणं, आणि अनुभवणं ही तुमची जबाबदारी आहे. जर आमदारांनीच जबाबदारी विसरली, तर मग ही व्यवस्था कोसळणार नाही का? हे लोकशाहीचं मंदिर आहे, येथे पवित्रता, शिस्त आणि सेवाभाव अपेक्षित आहे.

आज सगळा महाराष्ट्र फक्त एकच गोष्ट विचारतो आहे, अरे, कुठं नेऊन ठेवलंय महाराष्ट्र माझा? आणि कुठं गेलं जनतेशी बांधिलकीचं भान? खुर्चीवरचा माज आज जनतेच्या मतांचा आणि विश्वासाचा अपमान करत आहे.

आमच्या मुख्यमंत्र्यांनाच विचारावंसं वाटतं, किती संयम दाखवायचा आम्ही सामान्य जनतेनं? किती प्रश्नांना उत्तर न मिळवता गप्प बसायचं? लोकप्रतिनिधी जर असं वागत असतील, तर आम्ही आदर्श कुणाला मानायचं?

आज प्रश्न एकच आहे, हेच महाराष्ट्राचं भवितव्य आहे का? आम्ही शांत बसून हे सगळं बघतच राहायचं का? आमदार, मंत्री, मुख्यमंत्री, एकदा तरी तुमच्या खुर्चीतून खाली उतरून, रस्त्यावर चालणाऱ्या सामान्य माणसाच्या डोळ्यांत बघा. त्याला काय वाटतंय ते समजून घ्या.

तुम्ही भांडता, आमचं आयुष्य ढवळून टाकता. आम्ही मतं देतो, तुम्ही सत्ता मिळवता. पण शेवटी - उत्तर कोण देणार? आणि जबाबदारी कोण घेणार? आता वेळ आली आहे, लोकशाहीचे मूळ मूल्य परत मिळवण्याची.

नेते बदलू शकतात. सरकारं बदलू शकतात. पण जनतेचा विश्वास एकदा तुटला, तर तो पुन्हा मिळवणं अशक्य आहे.

आज माफ करा म्हणणं पुरेसं नाही. हवे आहेत कठोर निर्णय, जबाबदारीची जाणीव, आणि जनतेच्या प्रश्नांचं प्राधान्य. शेवटी ही फक्त विधानसभा नाही, ही जनतेच्या विश्वासाची जागा आहे. आणि हा विश्वास ढासळला, तर देशाचं भविष्यच धोक्यात येईल. जय महाराष्ट्र !

---

(लेखक नियमित स्तंभलेखक आहेत.)

---

## भारतीय वायुसेनेच्या शौर्याचा, समर्पणाचा आणि सामर्थ्याचा गौरवदिन



भारतीय वायुसेना दिन

८ ऑक्टोबर हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस असतो. कारण हा दिवस आहे भारतीय वायुसेना दिन. आकाशातील त्या धैर्यवान योद्धयांचा सन्मान करण्याचा दिवस, जे आकाशातुन राष्ट्राचे रक्षण करतात. १९३२ साली ब्रिटिशकालीन रॉयल इंडियन एअरफोर्स म्हणून स्थापन झालेल्या या दलाने स्वातंत्र्यानंतर भारतीय वायुसेना (इंडियन एअरफोर्स) म्हणून नवे रूप घेतले आणि आज भारतीय हवाई दल जगातील सर्वात सक्षम व आधुनिक हवाई दलांपैकी एक आहे.



भारतीय वायुदलाचा प्रवास अत्यंत साधेपणाने सुरू झाला. काही मोजक्या लढाऊ विमानांपासून सुरुवात करून आज भारतीय वायुदल राफेल, सुखोई-३० एमकेआय, मिराज २०००, तेजस अशा आधुनिक लढाऊ विमानांनी सज्ज आहे. वायुसेनेने १९४७ च्या काश्मीर युद्धात, १९६५ व १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात, १९९९ च्या कारगिल युद्धात व देशांतर्गत अनेक मोहिमांमध्ये अपार शौर्य दाखवले आहे.

विशेषतः ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन सफेद सागर आणि बालाकोट हल्ला आणि आता नुकतेच झालेल्या ऑपरेशन सिन्दुर ने वायुसेनेची कार्यक्षमता जगासमोर सिद्ध केली आहे.

वायुसेनेतील प्रत्येक जवान हा देशाचा आकाशातला प्रहरी आहे. त्यांचे ब्रीदवाक्य नभः स्पृशं दीप्तम् (तेजाने आकाशाला स्पर्श करणारे) हे फक्त शब्द नाहीत, तर त्यांच्या कार्याचा सारांश आहे. देशाचे रक्षण करणे, संकट काळात अडचणीच्या ठिकाणी मदत पोहोचवणे, नैसर्गिक आपत्तींत बचावकार्य करणे या सर्व जबाबदाऱ्या भारतीय वायुसेना पूर्ण शिस्तीने पार पडते.

आज भारतीय वायुसेना स्वदेशी तंत्रज्ञानाच्या बळावर आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारत आहे. डी.आर.डी.ओ. आणि एच.ए.एल. यांच्या सहकार्याने तयार झालेला तेजस लढाऊ विमान, लाइट कॉम्बॅट हेलिकॉप्टर ह्यप्रचंडह्न, आणि भविष्यातील ॲडव्हान्स मिडीयम कॉम्बॅक्ट एअरक्राफ्ट प्रकल्प हे भारताच्या वाढत्या तांत्रिक सामर्थ्याचें प्रतीक आहेत.

संकटाच्या वेळी भूकंप असो, पूर असो, किंवा महामारीचा काळ असो भारतीय वायुसेनेने नेहमीच पुढाकार घेतला आहे. ऑपरेशन राहत, ऑपरेशन देवी शक्ती (अफगाणिस्तानातील नागरिकांची सुटका) आणि कोविड काळातील वैद्यकीय मदतीकरिता केलेली उड्डाणे हे सारे वायुसेनेचे मानवी मूल्य अधोरेखित करतात.

भारतीय वायुसेना दिवस हा केवळ समारंभ नसतो, हा दिवस त्या सर्व वीरांना सलाम करण्याचा दिवस आहे, ज्यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता राष्ट्राचे रक्षण केले. आकाशातील प्रत्येक उड्डाणात एक विश्वास असतो भारत सुरक्षित आहे, कारण त्याचे आकाश सज्ज आहे. ८ ऑक्टोबर रोजी आपण सगळ्यांनी मनोमन म्हणावं जय हिंद!



सुमेघ रामचंद्र वानरे
(शिक्षक)
नॅशनल मिलिटरी स्कूल,
अकोला.
९१३००२१३८७

---

## सायबर हल्ल्यामुळे दारूचा तुटवडा



सायबर हल्लयामुळे संपूर्ण जपानमध्ये दारूचा तुटवडा निर्माण झाला आहे. जपानमधील सर्वात मोठी पेय कंपनी असाही ग्रुपवर झालेल्या सायबर हल्लयामुळे ही टंचाई निर्माण झाली आहे.




परिणामी, कंपनीची ऑर्डर प्रक्रिया, शिपींग आणि कॉल सेंटर सिस्टम ठप्प झाली आहे आणि स्टॉक संपत चालला आहे.

या संकटामुळे कंपनीचे शेअर्स ४ % ने घसरले आहेत. लोकांना आता सम्मोरो कंपनीकडून दारू मागवावी लागत आहे.



---

## मनी नाही भाव...

**वाचक लिहितात**

नुकताच नवरात्रोत्सव संपन्न झाला. आदिशक्तीच्या आगमनाने सर्व वातावरण आनंदीत,प्रफुल्लीत झाले होते. उत्साह सर्वत्र ओसंडून वहात होता. भक्तांनी डौलाने मातेचे स्वागत केले. मातेचा जागर, गोंधळ, घागरी फुंकणे या सर्वांमुळे भाविक आनंदात डुंबत होते.भजन, किर्तन, कुंकूमार्चन, कुमारीका पूजनाचे विधी पार पडले.

असे असूनही उत्सवाला गालबोट लावण्याचे प्रकार घडत होते. गरब्याच्या ठीकाणी हिंदी अर्थहीन गाणी, चित्रविचित्र पोषाख घातलेला युवा वर्ग, फॅशनच्या नावाखाली शरीरावर देवीचा मुखवटावाले टॅटू काढणे, देवीचे मुखवटे असणारे पोषाख घालून अंगविक्षेप करत गरबा खेळणे. रात्री उशिरा घरी जाणे असे प्रसंग घडत होते. शास्त्राचा आधार नसताना महिलांनी नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या परिधान करणे, अविवाहीत मुलींनी नऊ दिवस रोज नऊ रंगांचे ड्रेस घालून, विचित्र पोज घेऊन ग्रुप फोटो तसेच सेल्फी काढणे याला ऊत आला होता.

अस वाटत की, यांना देवी म्हणजे काय? हेच कळले नसावे. देवीला काय अपेक्षित आहे? याबाबत ही मंडळी अनभिज्ञच आहेत.हे देवाचे भक्त होऊच शकत नाही. भावाच्या भुकलेल्या देवीने यांच्या येण्याची तरी दखल घेतली असेल का?

मनात भक्तीचा ओलावा नसणारे, दिखाऊपणा पणा करणारे हे सर्व भक्त ढोंगी आहेत. अशा सर्व मंडळींसाठी मनी नाही भाव आणि देवा मला पाव एवढेच म्हणावेसे वाटते.

▪ दिपाली गिते, सातारा.

---

## यकृत निरोगी ठेवायचे? काही टिप्स लक्षात ठेवा



यकृत हा आपल्या शरीराचा एक अतिशय महत्वाचा अवयव आहे, जो पचनपासून ऊर्जा साठवण्यापर्यंत आणि शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकण्यापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण कार्ये करतो. हे रक्त फिल्टर करते, आवश्यक प्रथिने बनवते आणि पित्त रस तयार करते, जे अन्न योग्य प्रकारे पचवते. जेव्हा यकृत पेशी असामान्यपणे वाढू लागतात तेव्हा त्याला यकृत कर्करोग म्हणतात.

दीर्घकालीन मद्यपान, हिपॅटायटीस-बी आणि सी संसर्ग, फॅटी यकृत रोग, लठ्ठपणा किंवा कुटुंबात कर्करोगाचा इतिहास यासारखी अनेक कारणे असू शकतात. हा रोग हळूहळू यकृताच्या कार्यावर परिणाम करतो आणि शरीरावर गंभीर परिणाम करू शकतो. यकृताचा कर्करोग झाल्यावर शरीराच्या डिटॉक्स प्रक्रियेवर परिणाम होतो आणि रक्तात विषारी पदार्थ जमा होऊ लागतात.

यामुळे थकवा, वजन कमी होणे आणि पाचक समस्या वाढतात. यकृत कर्करोगाचे दोन मुख्य प्रकार आहेतः हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमा (एचसीसी), जो सर्वात सामान्य आहे आणि यकृत पेशींमध्ये सुरू होतो आणि पित्त नलिकापासून होणारा कोलेन्गिओकार्सिनोमा हा कर्करोग अत्यंत धोकादायक मानला जातो. कारण सुरुवातीच्या काळात त्याची लक्षणे अनेकदा स्पष्ट नसतात आणि जेव्हा त्याचे निदान होते तेव्हा या आजाराने गंभीर रूप घेतले असते. यकृताची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे इतर अवयवांवरही परिणाम होतो आणि शरीर हळूहळू अशक्त होते.

यकृताच्या कर्करोगाची लक्षणे हळूहळू दिसून येतात आणि एक सामान्य आजार म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. सुरुवातीच्या काळात, थकवा, भूक न लागणे आणि वजन कमी होणे ही सामान्य चिन्हे आहेत. रुग्णाला ओटीपोटाच्या उजव्या बाजूला सतत वेदना किंवा जडपणा जाणवू शकतो. डोळे आणि त्वचेचा पिवळेपणा, वारंवार उलट्या होणे किंवा मळमळ होणे देखील यकृत कर्करोगाची चिन्हे असू शकतात.

गंभीर प्रकरणांमध्ये ओटीपोटात सूज, पाय सुजणे, उलट्या होणे आणि शरीरात अशक्तपणा वाढतो. म्हणून वेळेत चाचणी करणे महत्वाचे आहे. सीटी स्कॅन, एमआरआय आणि बायोप्सीद्वारे या आजाराचे अचूक निदान केले जाऊ शकते. लवकर निदान केल्याने उपचार सुलभ होतात आणि गंभीर परिस्थिती टाळता येते.

**बचाव कसा करावा?**

मद्यपान आणि धुम्रपानापासून दूर राहा.
हिपॅटायटीस बीची लस घ्या.
निरोगी आहार घ्या.
लठ्ठपणा आणि फॅटी लिव्हर टाळा.
दररोज व्यायाम करा.
वेळोवेळी यकृताची तपासणी करून घ्या.

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

**कभी मानलो, कभी मनालो !**

**जगातील एक तरी जोडपं**
**दावा तुम्ही मले हटके**
**ज्यांच्या आयुष्यात भौ -**
**कधीच उडाले नाही खटके ..!**

**एकवर्णी जीवन होते अळणी**
**म्हणून विधात्यानेच**
**कधी आंबट कधी गोडची**
**करून ठेवलीय आखणी ..!**

**घरोघरी मातीच्या चुलीचा**
**समजतोना तुम्हाला अर्थ**
**मग विणाकारण जीवनात**
**उदास राहणे नाही का व्यर्थ ..?**

# देशभरातील १५ निवडक साखर कारखान्यांना कंप्रेस्ड बायोगॅस प्लांट स्थापन करण्यासाठी सहकार्य

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे देशातील पहिल्या सहकारी मल्टी-फीड कंप्रेस्ड बायोगॅस प्लांटचे उद्घाटन करताना केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी स्पष्ट केले की, देशभरातील १५ निवडक साखर कारखान्यांना या मॉडेलवर बायोगॅस संयंत्र उभारण्यासाठी मोदी सरकारकडून आवश्यक सहकार्य दिले जाईल.या उपक्रमामुळे देशाच्या ऊर्जा क्षेत्राला नवी दिशा मिळेलच, शिवाय शेतकरी व ग्रामीण उद्योगांसाठीही नव्या संधी निर्माण होतील.

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सहकार मंत्रालयाची स्थापना केली आणि त्या मंत्रालयाची जबाबदारी सहकार क्षेत्राचे खरे योद्धे असलेल्या अमित शाह यांच्याकडे सोपवली, तेव्हा भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाचा शंखनाद झाला. अवघ्या तीन-चार वर्षांत शाह यांच्या दूरदर्शी धोरणांमुळे आणि जमिनीवरच्या अंमलबजावणीमुळे सहकार मंत्रालय आज देशाच्या ग्रामीण पाठीचा कणा बनले आहे. जे क्षेत्र एकेकाळी जर्जर व मृतप्राय स्थितीत होते, ते आज आत्मनिर्भर भारताच्या समृद्धीचे केंद्र बनले आहे.

महाराष्ट्रातील महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे येथे ऊसापासून इथेनॉल, इथेनॉलपासून सीबीजी आणि उरलेल्या अवशेषांपासून पोटॅश निर्मितीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर कचऱ्यातून कमाई आणि संसाधनांचे पुनर्चक्रण सुनिश्चित केले गेले आहे.हीच ती महाराष्ट्राची भूमी आहे जिथून सहकारी साखर कारखान्यांची परंपरा सुरू झाली. आज तीच भूमी सहकाराच्या नव्या औद्योगिक क्रांतीची जननी ठरत आहे. शाह यांचे मत आहे की प्रत्येक लाभदायक साखर कारखाना आता फळप्रक्रिया आणि मूल्यवर्धन यांसारख्या नवीन उपक्रमांना हात घालून शेतकऱ्यांना अतिरिक्त लाभ मिळवून देऊ शकतो.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राला जो नीतिगत पाठिंबा मिळत आहे, तो अभूतपूर्व आहे. नुकत्याच केंद्रीय मंत्रिमंडळाने जाहीर केलेल्या दलहन आत्मनिर्भरता मिशन अंतर्गत शेतकऱ्यांची संपूर्ण कडधान्य पिके किमान आधारभावावर खरेदी केली जातील.तसेच जीएसटी सुधारणा अंतर्गत शेतकऱ्यांच्या वापरातील ट्रॅक्टर, हार्वेस्टर, ठिबक सिंचन यंत्रणा आणि मधमाशी पालन उपकरणांवरील जीएसटी फक्त ५ टक्के करण्यात आला आहे. हे निर्णय दाखवतात की मोदी सरकार शेतकऱ्यांसाठी ईज ऑफ डूइंग एग्रीकल्चर या संकल्पनेला वास्तवात आणत आहे.

अमित शाह यांसारख्या दूरदर्शी नेत्यांना आज जनता सहकाराचे शिल्पकार म्हणून ओळखते. त्यांनी सिद्ध केले आहे की भारताचे भविष्य स्वदेशी, सहकार आणि आत्मनिर्भरतेत आहे.त्यांचे ठाम मत आहे की जर १४० कोटी देशवासीयांनी संकल्प केला की ते परदेशी वस्तूंचा वापर करणार नाहीत, तर भारत केवळ



आर्थिक दृष्ट्याच नव्हे तर सांस्कृतिक आत्मगौरवाच्या दृष्टीनेही जगात पहिल्या क्रमांकावर पोहोचेल.

हीच ती भावना आहे जी छत्रपती शिवाजी महाराजांच्या परंपरेतून आलेली आहे. शाह यांच्या शब्दात नव्हे तर जनमानसात आज हे स्पष्टपणे घुमत आहे की शिवाजी महाराजांचे अनुयायीच औरंगाबादला संभाजीनगर आणि अहमदनगरला अहिल्यानगर असे नाव देण्याचे धैर्य दाखवू शकतात; औरंगजेबाच्या अनुयायांमध्ये ही हिम्मत नाही.आज अमृतकाळात भारत जेव्हा २०४७ च्या पूर्ण विकसित भारताच्या दिशेने पुढे जात आहे, तेव्हा हे स्पष्टपणे दिसते की मोदीजींच्या नेतृत्वात आणि अमित शाह यांच्या मार्गदर्शनात भारतातील सहकारी क्रांती आपल्या सुवर्णयुगाकडे वाटचाल करत आहे जिथे प्रत्येक शेतकरी उत्पादक बनेल, प्रत्येक गाव आत्मनिर्भर बनेल आणि प्रत्येक भारतीय स्वदेशीच्या शक्तीतून समृद्ध भारताचा भागीदार बनेल.

# निसानची नवीन सी एसयूव्ही येतेय: भारतात ऑल न्यू टेक्टॉनचा पहिला लुक



**मुंबई, ६ ऑक्टोबर :** निसान मोटर इंडियाने आज आपल्या नवीन गाडीचे नाव जाहीर केले आणि जागतिक एसयूव्ही लाइनअपमधील आवृत्तीच्या डिझाइनची आकर्षक झलक सादर केली: ती म्हणजे ऑल-न्यू निसान टेक्टॉन.

टेक्टॉन हे नाव ग्रीक असून त्याचा अर्थ कारागीर किंवा आर्किटेक्ट आहे. हे निसानच्या अचूक अभियांत्रिकी आणि जीवन समृद्ध करणाऱ्या नावीन्यपूर्णतेच्या नीतिमत्तेशी सुसंगत आहे. हे नाव एक शक्तिशाली, प्रीमियम सी-एसयूव्ही दर्शवते जे अभियांत्रिकी उत्कृष्टता, कामगिरी आणि एक विशिष्ट डिझाइन ओळख आहे. टेक्टॉन हे त्यांच्यासाठी एक पर्याय असेल जे त्यांच्या करिअर, आवडी किंवा जीवनशैलीद्वारे आपल्या जगाला आकार देत आहेत.

२०२ मध्ये पूर्ण अनावरण आणि विक्री सुरू होण्यापूर्वी टेक्टॉनची रचना आणि इंजिनिअरिंग सी-एसयूव्ही सेगमेंटमध्ये बदल घडवून आणण्यासाठी करण्यात आली आहे. हे निसानच्या 'वन कार, वन वर्ल्ड' धोरणांतर्गत दुसरे उत्पादन असेल, जे चेन्नई प्लांटमध्ये रेनॉल्ट या अलायन्स पार्टनरसोबत भागीदारीत उत्पादित केले जाईल आणि भविष्यात निवडक जागतिक बाजारपेठांमध्ये निर्यात केले जाईल.

निसानच्या नवीन एसयूव्ही, टेक्टॉनला कंपनीच्या सर्वात दीर्घकाळ चालणाऱ्या आणि सर्वात प्रतिष्ठित एसयूव्ही असलेल्या पेट्रोलपासून डिझाइन प्रेरणा मिळाली आहे. पुढच्या वर्षी ती येईल तेव्हा ती धाडसी सौंदर्यशास्त्र, मजबूत विश्वासार्हता, प्रीमियम कारागिरी आणि प्रगत तंत्रज्ञान वैशिष्ट्यांचा संच एकत्र करेल.

समोर एक शक्तिशाली शिल्पित बॉनेट आणि विशिष्ट सी-आकाराचे हेड लॅम्प सिग्नेचर - पेट्रोलची आठवण करून देणारे असून ते मजबूत खालच्या बंपरसह जोडलेले आहे. त्यातून वाहनाचा आकार मोठा असला तरी ती नियंत्रणात राहते.

निसान मोटर कंपनी लिमिटेडचे कॉर्पोरेट कार्यकारी अल्फोन्सो अल्बाइस म्हणतात, ऑल-न्यू निसान टेक्टॉनची डिझाईन प्रेरणा आमच्या प्रसिद्ध निसान पेट्रोलपासून घेतली आहे. ती आजच्या आधुनिक भारतीय ग्राहकांच्या इच्छांची पूर्तता करण्यासाठी, वर्चस्व गाजवण्यासाठी आणि सौंदर्यासाठी डिझाइन केलेली आहे. आकर्षक, स्टायलिश आणि भारत आणि त्यापलीकडे एक नवीन बेंचमार्क स्थापित करण्यासाठी बनवलेली, डिझाइन आणि बिल्डची गुणवत्ता स्पष्टपणे निसान आहे आणि ती निसानच्या एसयूव्ही डीएनएचे सर्वोत्तम प्रतीक आहे.

निसान मोटरचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक सौरभ वत्स म्हणाले, नवीन निसान टेक्टॉन ही निसानच्या विकासाच्या कथेच्या केंद्रस्थानी असणार आहे आणि देशातील आमच्या उत्पादन पोर्टफोलिओच्या भविष्याची झलक दाखवते. तिचे प्रभावी अस्तित्व, बोल्ड लूकमुळे आणि प्रीमियम इंटीरियरमुळे आम्हाला विश्वास आहे की ती सेगमेंटमध्ये एक उत्साह निर्माण करणारी ठरेल, जी मजबूत पण आगळ्यावेगळ्या सी-एसयूव्ही शोधणाऱ्या ग्राहकांना आकर्षित करेल. हे मॉडेल भारतातील निसानच्या विकासाच्या कथेचे नेतृत्व करेल.

# भारताचा पहिला सब-५० एचपी कॅबिन ट्रॅक्टर सादर



**बुलढाणा, ७ ऑक्टोबर :** ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे, यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज (सब-५० एचपी सेगमेंट) समाविष्ट आहे.

या नव्या ट्रॅक्टरशिवाय, ग्रोमॅक्सने आपल्या सबसे सही चुनाव कॅम्पेनअंतर्गत दुसरा डीव्हीसीसी (डिजिटल व्हिडिओ कमर्शियल) लॉन्च केला आहे. या नव्या मोहिमेत ग्रोमॅक्सची उत्पादने परफॉर्मन्स, उत्पादकता आणि नफा या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी परवडणारी आणि योग्य निवड असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

लॉन्चच्या वेळी बोलताना वीजय नाकरा प्रेसिडेंट, फार्म इक्विपमेंट बिझनेस, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड म्हणाले, ग्रोमॅक्समध्ये आमचे ध्येय म्हणजे भारतीय शेतीच्या बदलत्या गरजांना अनुरूप, विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून मॅक्सिमम ग्रोथ साध्य करणे. एका दिवसात ८ नवे ट्रॅक्टर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो. प्रत्येक ट्रॅक्टर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर आधारित असून शेतकऱ्यांना वर्षभर उत्पादनक्षमतेसाठी सक्षम बनवण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. भारताचा पहिला सब-५० एचपी फॅक्टरी-फिटेड कॅबिन ट्रॅक्टर लॉन्च करून, ग्रोमॅक्स मूल्य, परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यांचा आदर्श समतोल शोधणाऱ्या वाढत्या ग्राहकवर्गाची सेवा करत आहे. उत्सव काळात लॉन्च झाल्याने हे नवे ट्रॅक्टर ऑक्टोबर २०२५ पासून ग्रोमॅक्स डिलरशिप्सवर उपलब्ध होणार आहेत.

# समावेशक वित्तपुरवठ्यासाठी जबाबदार बुद्धिमत्ता निर्माण करणे: अजय कुमार चौधरी



**नागपूर, ७ ऑक्टोबर :** कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशल इंटेलिजन्स) ही सीमांतून मुख्य प्रवाहात आली आहे. ती आर्थिक सेवांची रचना, वितरण आणि अनुभव घेण्याच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहे, ज्यामुळे कार्यक्षमता, समावेशन आणि लवचिकतेसाठी नवे दरवाजे उघडले आहेत, असे राष्ट्रीय नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) चे गैर-कार्यकारी अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक अजय कुमार चौधरी यांनी मुंबईत झालेल्या ग्लोबल फिनटेक फेस्ट (जीएफएफ) २०२५ मध्ये आपले विशेष भाषण दिले.

एआयचे आश्वासन आणि आव्हाने: समावेशक वित्तीय प्रणालीसाठी जबाबदार बुद्धिमत्तेची उभारणी या विषयावर बोलताना चौधरी यांनी अधोरेखित केले की जरी एआय अभूतपूर्व संधी उघडत असली, तरी ती गुंतागुंतीची आव्हानेही निर्माण करते, ज्यासाठी जबाबदार प्रशासन आणि सीमापार सहकार्याची आवश्यकता आहे.

त्यांनी नमूद केले की २०२७ पर्यंत बँकिंग, विमा, भांडवली बाजार आणि देयकांमध्ये एआयमधील गुंतवणूक जवळजवळ १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सध्या ७८% वित्तीय संस्था किमान एका कार्यामध्ये एआयचा वापर करत आहेत, जो २०२३ मध्ये ५५% या आकड्यापेक्षा मोठी वाढ आहे. उद्योग आता एआय महत्त्वाचा आहे की नाही यावर चर्चा करत नाही, तो आता या तंत्रज्ञानामुळे आपण किती दूर आणि किती वेगाने घेऊन जाईल याची तयारी करत आहे. खरा प्रश्न हा आहे की आपण या शक्तीचा वापर किती जबाबदारीने करतो असे ते म्हणाले.

एआय क्रांतीच्या दोन महत्त्वपूर्ण पैलूंवर जनरेटिव्ह एआय, जे मोठ्या प्रमाणावर निर्मिती आणि विश्लेषण करते, आणि एजेंटिक एआय, जे स्वयंचलितपणे गुंतागुंतीची कामे पार पाडू शकते. प्रकाश टाकताना, चौधरी यांनी या तंत्रज्ञानांच्या फसवणूक शोध, अनुपालन स्वयंचलन, ट्रेडिंगमधील अचूकता आणि ग्राहक सहभाग यांसारख्या क्षेत्रांतील परिवर्तनक्षम क्षमतेवर भर दिला.

प्रारंभिक अभ्यासानुसार, या तंत्रज्ञानांच्या वापरामुळे जागतिक बँकांना दरवर्षी २०० ते ३४० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत उत्पादकतेत वाढ होऊ शकते, असे सूचित होते.

चौधरी यांनी अधोरेखित केलेल्या प्रमुख धोरणात्मक प्राधान्यांपैकी एक म्हणजे एआय पायाभूत सुविधांमधील एकाग्रता जोखीम. त्यांनी स्पष्ट केले की एआय परिसंस्था पाच परस्परावलंबी स्तरांवर आधारित आहे म्हणजेच विशेष चिप्स, क्लाउड प्लॅटफॉर्म्स, विशाल डेटासेट्स, फाउंडेशन मॉडेल्स आणि अंतिम वापरकर्त्यांसाठीच्या अनुप्रयोगांवर.

आज, एकच कंपनी सुमारे ९०% प्रगत प्रोसेसर तयार करते, तीन कंपन्या जागतिक क्लाऊड क्षमतेचा बहुतांश भाग नियंत्रित करतात, आणि फक्त काही संस्था फाउंडेशन मॉडेल्सवर वर्चस्व गाजवतात. अशा प्रकारच्या प्रणालीगत परावलंबनांमुळे, त्यांनी इशारा दिला की, केवळ आर्थिक लवचिकतेवरच नव्हे तर आर्थिक सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम होतो. त्यामुळे, या आव्हानांना विविधीकरण आणि सक्षम शासकीय चौकटीद्वारे सक्रियपणे हाताळणे आवश्यक आहे.

# नागपूर येथील ऑर्बिट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ड्रग-एल्युटिंग बलून या नाविन्यपूर्ण कार्डियाक उपकरणाने जटिल हृदयरोगावर यशस्वी उपचार



**नागपूर, ७ ऑक्टोबर :** छातीत तीव्र वेदना आणि हृदयाशी संबंधित इतर लक्षणांमुळे नागपूर येथील ऑर्बिट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये एका ५ वर्षीय पुरूष रुग्णाला दाखल करण्यात आले. त्याच्या वैद्यकीय अहवालात असे दिसून आले की त्याच्या कोरोनरी आर्टरीजमध्ये आधीच पाच स्टेंट बसवण्यात आले होते, ज्यामुळे केस अत्यंत गुंतागुंती ची आणि आव्हानात्मक बनली होती. रुग्णाच्या स्थितीनुसार पारंपारिक स्टेंटिंग प्रक्रिया किंवा कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टिंग (सीएबीजी) शक्य नव्हते. रुग्णालयाचे मुख्य हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गजेंद्र अग्रवाल यांनी केसची तपासणी केली आणि पर्यायी उपाय आवश्यक असल्याचे ठरवले.

रुग्णाचे वय आणि वैद्यकीय अहवालामुळे तो पारंपारिक स्टेंटिंग किंवा सीएबीजी साठी उच्च-जोखीम उमेदवार बनला.भारतातील लोकांच्या वाढत्या वयानुसार, भविष्यात हृदयरोग होण्याची शक्यता ही एक मोठी चिंतेची बाब होती. गुंतागुंतीचा धोका कमी करण्यासाठी आणि दीर्घकालीन परिणाम सुधारण्यासाठी उपाय आवश्यक होता. म्हणूनच ड्रग-एल्युटिंग बलून (डीईबी) वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.

डीईबी तंत्रज्ञान हे कोरोनरी इंटरव्हेन्शन्समध्ये एक अभूतपूर्व उपचार आहे जे अद्वितीय फायदे देते. पारंपारिक ड्रग-एल्युटिंग स्टेंट (डीईएस) च्या विपरीत, डीईबी रुग्णाच्या शरीरात कोणत्याही धातूची रचना न सोडता थेट प्रभावित भागात औषध पोहोचवते.

डॉ. अग्रवाल म्हणाले, डीईबी तंत्रज्ञानाचा वापर करून, वैद्यकीय पथकाने रुग्णाच्या कोरोनरी धमन्यांमधील धातूचा भार कमी करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे भविष्यात इतर उपचार पर्याय खुले झाले. ही यशस्वी प्रक्रिया रुग्णांचे परिणाम सुधारण्यासाठी डीईबी तंत्रज्ञानाची क्षमता दर्शवते. डीईबी कोरोनरी इंटरव्हेन्शन्समध्ये गेम-चेंजर ठरेल आणि त्याच्या अद्वितीय गुणधर्मांमुळे, ते जटिल प्रकरणांमध्ये पर्यायी उपाय प्रदान करेल.

डीईबी तंत्रज्ञानाचा वापर जगभरात ओळखला जात आहे आणि हृदय विज्ञानातील तांत्रिक नवोपक्रमात आघाडीवर आहे. अत्याधुनिक उपचारांचा अवलंब करून, डॉक्टर रुग्णांना सर्वोत्तम काळजी प्रदान करू शकतात आणि त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारू शकतात. डीईबी तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे, या ५ वर्षीय व्यक्तीसारखे रुग्ण कोरोनरी धमनी रोगासाठी अधिक प्रभावी आणि दीर्घकालीन उपचारांचा फायदा घेऊ शकतात.

# मी तिच्यासारखी नाही: सरुमधील अभिनेत्री अनुष्का मर्चंडे आपल्या नकारात्मक भूमिकेबद्दल मिळालेल्या टीकेवर प्रतिक्रिया देत आहे!



**मुंबई, ६ ऑक्टोबर :** झी टीव्हीच्या लोकप्रिय मालिका सरुमधील अनिका ही भूमिका साकारणारी अनुष्का मर्चंडे तिच्या नकारात्मक पात्राबद्दल प्रेक्षकांकडून विविध प्रतिक्रिया मिळवत आहे. नेटिझन्स तिच्या पात्राच्या गडद पैलूंबर असलेली नाराजी सोशल मीडियावरही व्यक्त करत आहेत, काही वेळा तर लोकांच्या टिप्पण्या खूपच कठोर होत आहेत. अशा प्रतिक्रियांवर अनुष्का मर्चंडेने आता आपली भावना व्यक्त केली आहे. या अभिनेत्रीने प्रेक्षकांना भावपूर्ण संदेश दिला असून तिने कलाकारांची कलाकृती आणि त्यांच्या प्रत्यक्ष आयुष्याला वेगळे ओळखण्याचा आग्रह धरला आहे.

अनुष्का म्हणाली, मला ठामपणे वाटते की प्रेक्षकांनी कधीही अभिनेत्याचे खरे आयुष्य आणि पडद्यावरील भूमिका एकत्र करू नयेत. सरुमधील अनिका ही फक्त मी साकारलेली भूमिका आहे, ती मी नाही. कोणतीही मालिका नकारात्मक पात्रांशिवाय पुढे जाऊ शकत नाही; हेच कथेत नाट्यमयता, खोली आणि संतुलन आणते. लोकांना अनिका आवडणार नाही पण याचा अर्थ मी या भूमिकेला न्याय देत आहे. पडद्याबाहेर मी तिच्यासारखी नाही आणि मला आनंद वाटेल जर लोक वास्तविकतेसोबत गोंधळून न जाता फक्त माझ्या अभिनयाची कला ओळखतील. मालिकेच्या अलीकडील भागांमध्ये कथा अचानक वळण घेते, कारण सरू आणि वेद यांचा साखरपुडा अनपेक्षित अडचणींना सामोरा जातो. इतके लोक त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न करत असतानाही ते लग्न करतील का?

# टीव्हीएस मोटरने महाराष्ट्रात टीव्हीएस ऑर्बिटर सादर केली

**पुणे, ६ ऑक्टोबर :** दुचाकी आणि तीन चाकी वाहनांमधील जागतिक स्तरावरील आघाडीची कंपनी असलेल्या टीव्हीएस मोटर कंपनीने (टीव्हीएसएम) महाराष्ट्रात त्यांची नवीन इलेक्ट्रिक दुचाकी टीव्हीएस ऑर्बिटर लाँच करण्याची घोषणा केली. रोजचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून डिझाइन केलेल्या या टीव्हीएस ऑर्बिटरमध्ये १५८ किमी आयडीसी रेंज, क्रूझ कंट्रोल, ३४-लीटर बूट स्पेस, हिल होल्ड असिस्ट आणि प्रगत कनेक्टेड फीचर्स अशा अनेक या सेगमेंटमधील फीचर्सचा प्रथमच समावेश केला आहे. तसेच या उद्योगातील प्रथमच १४ फ्रंट व्हीलसह, स्कूटर ९४,९०० (एक्स-शोरूम मुंबई, पीएम ई-ड्राइव्ह स्कीमसह) च्या आकर्षक किमतीत आरामदायी प्रवास, अनेक सुविधा देते.

कनेक्टेड मोबाइल ॲप, व्हिझरसह फ्रंट एलईडी हेडलॅम्प आणि इनकमिंग




कॉल डिस्प्लेसह रंगीत एलसीडी क्लस्टर अशा प्रगत वैशिष्ट्यांचा टीव्हीएस ऑर्बिटरमध्ये समावेश आहे, ज्यामुळे ग्राहकांची सोय तर होतेच पण प्रवासाचा आनंद देखील मिळतो. त्याची ३.१ किलोवॅट प्रति तास बॅटरी आणि सुधारित एअरोडायनॅमिक कार्यक्षमता स्थिर, कार्यक्षम कामगिरीसह विस्तारित श्रेणी देते.

या लाँचबद्दल टीव्हीएस मोटर कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष - प्रमुख कम्युटर आणि ईव्ही व्यवसाय तसेच कॉर्पोरेट ब्रँड आणि मीडिया प्रमुख श्री. अनिरुद्ध हलदर म्हणाले, ईव्ही क्षेत्रात आमचे नेतृत्व मजबूत करण्यासाठी तसेच विश्वास आणि नावीन्यपूर्णतेचा पाया भक्कम करत भारताच्या इलेक्ट्रिक प्रवासाला पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. ग्राहकांच्या वाढत्या गरजांना अनुसरून, टीव्हीएस ऑर्बिटर महाराष्ट्रातील शहरी प्रवासाची पुनर्परिभाषा करण्याच्या आमच्या प्रयत्नांचे प्रतिनिधित्व करते. प्रगत तंत्रज्ञान, वाढीव एअरोडायनॅमिक कार्यक्षमता, आराम आणि सेगमेंट-फर्स्ट वैशिष्ट्यांसह दैनंदिन व्यावहारिकतेचे संयोजन करते. टीव्हीएस ऑर्बिटर या सेगमेंटमध्ये नवीन बेंचमार्क स्थापित करेल, असा आम्हाला विश्वास आहे. यामुळे शाश्वत गतिशीलता सुलभ होईल.

# शब्दकोडे क्रमांक २२३५



**आडवे शब्द :-**
१) कारण
४) नाजूक, कोवळा
६) कैद
८) सोपे
११) एकाग्र नजर
१२) न्याय
१३) सामान
१४) दह्याचे पातळसर पेय
१५) डीर
१६) एक काटेरी आंबटगोड कंद
१९) पवित्र
२२) अंगठा व तर्जनी या मधील अंतर
२३) रमापती
२५) प्रजाजन
२६) वाकलेला
२७) अथवा
२८) पुष्पदल
२९) जंगलातील प्राणी
३२) खानदान
३३) मीठाची चव
३४) श्रीकृष्णाचे एक नाव
३५) पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३८) गंध,
३९) विरोध, प्रतिबंध
४०) व्यापारी नफा
४३) शोभणारा
४४) पातक
४७) खटला
४८) श्रेष्ठ पुरुष
५०) एक मड्डा भाजी
५३) केविलवाणा
५५) बडबड त्रास
५६) रुची, स्वाद
५७) वसुंधरा
५८) केसांना लावण्याचा रंग
६०) एक मराठी महिना
६१) मृत्यू नसलेला
६३) नाश पावणारे
६४) इंद्र
६६) मत्सर
६७) अरण्यवास
७१) राखता
७३) जनन
७४) सत्ता
७६) मनाचा ओढा
७७) काव्य करणारा
७८) उष्ण
७९) दारूचा एक प्रकार

**उभे शब्द :-**
२) मोठे डोळे
३) बगळा
५) चिंतन
६) शेराचा आठवा भाग.
७) अर्धवर्तुळाकार
९) वल्ली
१०) तीव्र भूक, वखवख
१७) नाकावरील मोत्याचा दागिना
१८) बाजूला होणे
२०) वरपांगी
२१) मुलींच्या खेळण्यातील एक वनस्पतीचे फळ
२४) बनकर
२५) नृत्य
२६) मेणा, पालखी
२८) पारद
३०) नृत्याकलेचे दैवत
३१) मालाचे येणेजाणे
३२) मोठा हातोडा
३३) विशेष
३६) धातूचा धागा
३७) सम्मान
३८) शाब्दिक चकमक
४१) जेव्हा (सं.)
४२) खोटे कारण लपविण्यासाठी केलेला प्रयत्न
४३) अरण्य
४४) एक चतुर्थांश
४५) पुन्हा पुन्हा
४६) एक उष्ण सुगंधी पेय
४९) धोबी
५०) अभिनेता
५१) लटकत ठेवणे, अधांतरी ठेवणे
५२) चमक, मुरवला
५४) मऊ
५५) कारस्थान
५९) लाख, अवधान
६१) अवास्तव
६२) लबाडीचा हेतू
६५) शिक्षा
६८) दृष्टी
६९) मनाला टोचलेले दुःख
७०) शपथ
७२) जपानी चलन
७५) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# निहारिका चौक्सीचे तुम से तुम तकच्या सेटवरचे सगळ्यात गोड गुपित!



**मुंबई, ६ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील तुम से तुम तक ही मालिका अनु (निहारिका चौक्सी) आणि आर्यवर्धन (शरद केळकर) यांची वेगळी प्रेमकथा प्रेक्षकांची मने जिंकत आहे. पडद्यावर त्यांचे नाते जसजसे पुढे सरकत आहे, तसेच सेटवरच्या आयुष्यातही काही खास क्षण घडत आहेत जे कलाकार आणि टीमच्या चेहऱ्यावर हसू फुलवत आहेत.

अशाच एका गुपिताचा किस्सा म्हणजे निहारिकाची स्नॅक टोकरी. नेहमी हेल्दी खाऊ आणि थोड्या मजेदार ट्रीट्सनी भरलेली ही टोकरी सेटवरील सगळ्यांसाठी एक छोटेसे पण आनंददायी सरप्राईज बनली आहे. शॉट्सच्या दरम्यान एनर्जी देणारे स्नॅक्स असोत किंवा लांब शूटिंग तासांमध्ये गोड खाण्याची झटपट सोय या टोकरीत प्रत्येक मूडसाठी काहीतरी असतं. निहारिका मात्र हसतहसत कबूल करते की ही टोकरी तिने सुरुवातीला फक्त स्वतःसाठीच आणली होती!

अशा या छोट्या-छोट्या बिहाइंड-द-सीन्स क्षणांमुळे तुम से तुम तकचा सेट अगदी अनुच्या स्वभावासारखाच काळजी घेणारा, मनमिळावू आणि उत्साहाने भरलेला असा खूप आपुलकीचा आणि जिव्हाळ्याचा वाटतो. पडद्यावर प्रेक्षक अनुची वेगळी प्रेमकथा पाहतात, तर सेटवरची टीम निहारिकाच्या टोकरीमुळे मिळणाऱ्या या छोट्या आनंदांचा आस्वाद घेते.

**आज का अंदाज**

बुधवार ८ ऑक्टोबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ५७० | १६६ | १६९ | ५६८ | ११० | २४९ | १७८ | २६९ |
| ४८० | ५९९ | २६८ | ४७८ | २०० | ३५७ | ३५८ | ४५८ |
| ३३६ | २२१ | ३६७ | ३८८ | ३९० | ४५६ | २६८ | ३४० |
| २४ | ३४ | ६१ | ९१ | २१ | ५१ | ६८ | ७८ |
| २० | ३० | ६५ | ९५ | २० | ५० | ६३ | ७३ |
| २७ | ३७ | ६८ | ९८ | २९ | ५९ | ६४ | ७५ |

**८ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७३ | ८३ |
| ११ | ४१ | ७५ | ८५ |
| १२ | ४२ | ७६ | ८६ |
| ११९ | १५८ | ७०० | १८९ |
| ४७० | ३४७ | ३४० | ३५० |
| ३८० | ७८९ | १६० | २६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ६ ९ ८ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# राशीभविष्य

**मेष :** नातेसंबंधांमध्ये उबदारपणा आणि मोकळेपणा असेल. व्यावसायिकदृष्ट्या, नवीन प्रकल्पांमध्ये उडी मारण्यापूर्वी जुने काम पूर्ण करा. नात्यात उदारता आणि उबदारपणा ठेवा.

**वृषभ :** विद्यार्थ्यांना अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. तुमच्या कामाच्या ठिकाणीही आज काही बदल आवश्यक आहेत. टूर, ट्रॅव्हल आणि मीडियाशी संबंधित व्यवसायांमध्ये सुधारणा होईल.

**मिथुन :** आज कामावर लक्ष केंद्रित करणे आणि नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या प्रकल्पांमध्ये बारकाईने लक्ष द्या आणि नातेसंबंधांमध्ये प्रामाणिकपणा ठेवा. जास्त टीका करणे टाळा.

**कर्क :** आज संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. निष्पक्षता आणि समजूतदारपणामुळे भागीदारी मजबूत होईल. घाईघाईने निर्णय घेणे टाळा. काळजीपूर्वक पावले उचला. जोडीदाराशी संवाद साधा.

**सिंह :** आज तुम्हाला व्यवसायात लक्षणीय आर्थिक लाभ होतील आणि तुमचे व्यावसायिक संबंधही सुधारतील. खाजगी नोकरी करणाजयांना बढतीच्या संधी मिळतील. मतभेद संपतील आणि परस्पर सौहार्द वाढेल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. तुम्ही आर्थिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न कराल. कुटुंब आणि व्यावसायिक कामांमध्ये संतुलन राखल्याने योग्य समन्वय सुनिश्चित होईल.

**तुळ :** आर्थिक बाबींमध्ये विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. आज व्यवसायात भागीदारीवर लक्ष केंद्रित केले जाईल. आजचा दिवस स्थिरता आणि सुरक्षिततेने भरलेला असेल.

**वृश्चिक :** आज तुमचे लक्ष कौटुंबिक आणि भावनिक बाबींवर असेल. घर आणि काम यांच्यात संतुलन राखा. करिअरची प्रगती मंद असेल, परंतु संयम आणि कठोर परिश्रम यश मिळवून देतील.

**धनु :** तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि कोणत्याही प्रयत्नात तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून पाठिंबा मिळेल. अनेक काम ओढवून घेऊ नका. घरच्यांशी प्रेमाने वागा, सोबत वेळ घालवा.

**मकर :** कोणताही महत्वाचा निर्णय घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. व्यावसायिक आघाडीवर, संघर्षापेक्षा सहकार्य आणि समजूतदारपणा चांगले परिणाम देईल. अनपेक्षित खर्च टाळा.

**कुंभ :** आत्मविश्वास वाढलेला असल्यामुळे तुम्ही तुमची कामे अधिक चांगल्या प्रकारे करू शकाल. व्यवसायात तुम्हाला नफा मिळेल, परंतु भागीदारीत तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे.

**मीन :** आज नवीन संधी मिळतील. संवाद, अभ्यास आणि नेटवर्किंगसाठी आजचा दिवस चांगला आहे. कुटुंबियांच्या भावना हाताळताना सावधगिरी बाळगा. तुमची ऊर्जा एक किंवा दोन कामांवर केंद्रित करा.

# विभागीय आयुक्तालयासमोर प्रहारचे लोटांगण

## निराधार योजनेतील लाभार्थ्यांना सहा महिन्यापासून मानधन नाही

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. ७ :**
जिल्ह्यातील संजय गांधी, श्रावण बाळ या योजनेतील निराधार दिव्यांग लाभार्थ्यांना मागील सहा महिन्यांपासून अनुदान मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. दिव्यांगाना तत्काळ अनुदान देण्यात यावे. या मागणीला घेऊन सोमवारी प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वात शेकडो दिव्यांग बांधवांनी विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक देत आंदोलन केले. यावेळी संतप्त झालेल्या दिव्यांग बांधवांनी मुख्य प्रेसशद्वारापासून लोटांगण घेत शासनाचा निषेध केला. यावेळी आंदोलकांकडून तीव्र नारेबाजी करण्यात आली. प्रहारच्या शिष्टमंडळाने विभागीय आयुक्तांना निवेदन दिले. मागील अनेक महिन्यांपासून निराधार योजनेतील लाभार्थ्यांना डिबिटी प्रणालीद्वारे अनुदान देण्यात येत आहे. मात्र, यात अनेक तांत्रिक अडचणी असल्यामुळे लाभार्थ्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. राज्यसह जिल्ह्यातील अनेक विधवा, जेष्ठ नागरिक, दिव्यांग लाभार्थी असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. मात्र, शासन याकडे दुर्लक्ष करत आहे. एक ते दीड वर्षापासून ही डीबीटी प्रणालीद्वारे राज्य आणि केंद्र सरकारच्या निराधार योजनेचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा झाले नाही. ऑनलाइन प्रक्रिया असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या आहेत. मागील सहा महिन्यांपासून अनेक दिव्यांग निराधार लाभार्थ्यांचे मानधन रखडलेले आहे. लाभार्थी हे बँकेच्या चकरा मारत आहे. तर दुसरीकडे बँक कर्मचारी लाभार्थ्यांना अनुदान रक्कम खात्यात जमा झाल्या नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे या लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्यात बँकेतून वापस पाठवण्यात येत असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे म्हणणे आहे. या आधी प्रहार जिल्हाधिकारी यांच्यामार्फत उपमुख्यमंत्री यांना संजय गांधी, श्रावण बाळ योजनेतील थकीत अनुदान देण्यासाठी निवेदन देण्यात आले असल्याचे प्रहारचे म्हणणे आहे. मात्र, याची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या लाभार्थ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक दिली. या वेळी तीव्र नारेबाजी करून निदर्शने करण्यात आली. तसेच लोटांगण आंदोलन करून शासनाचा निषेध व्यक्त केला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता यावेळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. या वेळी जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, संपर्कप्रमुख गोलू पाटील, प्रहार अपंग क्रांती अजय तायडे, नंदू वानखडे, कमलेश गुप्ता, कुणाल खंडारे, सलीम खान, नौशाद भाई,



भीमराव वानखडे, नरेंद्र चंडकापूर, अनिस खान, पप्पू खान, अब्दुल जाफर, अब्दुल सादिक, अंजली देशमुख, पद्मा नेमाडे, पंचफुला जाधव, गिरजा बसावे, सुमन कुटे, मंगला ठाकूर, नंदू ठाकूर यांच्यासह शेकडो दिव्यांग लाभार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठात महर्षि वाल्मिकी यांची जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. ७ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महर्षि वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन जनसंपर्क विभागातील श्री सुनिल महल्ले यांनी केले.

## धम्मदेसना व धम्मप्रबोधन कार्यक्रम संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
**कोटेवा, दि. ७ :** बुद्ध संदेश शिक्षण प्रचार सभा तथा सामाजिक शेतकरी सत्ता, धम्मभूमी मासिक पत्रिका कोटेवा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ०७.१०.२०२५ ला अश्विन पौर्णिमा व वर्षावास समारोप निमित्य धम्मभूमी कोटेवा येथे परित्राण, धम्मदेसना व धम्मप्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या मंगल प्रसंगी पूज्य भदंत राहुलबोधी महाथेरो व धम्मभूमी कोटेवा येथील श्रामणेर संघ उपस्थित होते. पूज्य भदंत राहुलबोधी महाथेरो यवतमाळ यांनी सुमधुर वाणीतून बुद्ध वंदना व परित्राणपाठ,धम्मदेसना दिली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून धम्मभूमी, बुद्ध महाविहाराचे व्यवस्थापक मा.विजय डांगे साहेब, प्रमुख उपस्थिती मा.भालचंद्रजी वासनिक, मा. जयकुमारजी बंजारी तसेच प्राचार्य तथा मुख्याध्यापक डी.वाय.सातपुते आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आयु. अश्विन खोब्रागडे यांनी केले तर आभार आयु. अरविंद लोमटे यांनी मानले. या कार्यक्रमाला आयु. विनोद गुजर, आयु. अनुसयाबाई लहाने यवतमाळ, आयु. अशोक मोटघरे चांदूर, यांनी भोजन दान देवून पुण्याची पुष्टी केली. या कार्यक्रमाला अनेक गावावरून, बौद्ध उपासक, उपासिका पांढरे वस्त्र परिधान करून, उपस्थित होते.

## गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव



■ महासागर प्रतिनिधी
हिवाळ्यात थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मोजे घालणे आवश्यक आहे. काही काळापूर्वी घोट्यापर्यंत मोजे लोकप्रिय झाले होते; परंतु आता हा ट्रेंड बदलत आहे. घोट्यापर्यंतच्या पायघोळ आणि डेनिमचा ट्रेंड कमी झालेला नाही. तरुणांना लोफर्स आवडतात; परंतु घोट्यापर्यंतच्या मोज्यांसह फॅशनची समस्या निर्माण होते. तरुणांना असे मोजे हवे होते, जे त्यांच्या लोफर्सना ॲंकल-लेंग्थ पॅंटसह पूरक असतील. कदाचित म्हणूनच शहरातील तरुण आता 'नो-शो सॉक्स'ला महत्व देत आहेत. त्याला 'नो-शो सॉक्सना लोफर सॉक्स' असेही म्हणतात. ते 'लो-शो सॉक्स'पेक्षा लहान असतात. त्यामुळे दिसत नाहीत. यामुळे तरुणांना खूप आकर्षक लूक मिळतो. ते लोफर्स, शूज आणि स्नीकर्ससह घातले जातात. हे मोजे बहुउद्देशीय कारणांसाठीदेखील वापरले जात आहेत. ते आरामदायी आहेत. अनेक प्रमुख पोशाख ब्रँडदेखील यात सहभागी होत आहेत आणि 'नो-शो सॉक्स लॉंच' करत आहेत. असे मोजे अमेरिकेत बऱ्याच काळापासून प्रचलित आहेत; परंतु भारतात फॅशन जागरूकता वाढल्याने अलिकडे त्यांची लोकप्रियता वाढली. तरुणांना लोफर्स आणि स्नीकर्स आवडतात आणि ते घोट्याच्या लांबीच्या पॅंटशी जुळत आहेत. परिपूर्ण लूक मिळवण्यासाठी ॲक्सेसरीजची आवश्यकता भासली. भारतातील मोजे बाजार ९०० ते १००० कोटी रुपयांचा असल्याचा अंदाज आहे.

# 'विंडोज १०'वर सुरक्षा अपडेट्स बंद

सॉफ्टवेअर अपडेट

'मायक्रोसॉफ्ट'ने घोषणा केली आहे की ते पुढील महिन्यापासून विंडोज १० साठी सुरक्षा अपडेट्स जारी करणार नाही. विंडोज १० साठी सपोर्ट १४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपेल. यानंतर, हे विंडोज व्हर्जन वापरणाऱ्यांना मासिक मोफत सुरक्षा अपडेट्स मिळणार नाहीत. परिणामी हॅकर्स किंवा सायबर हल्लेखोर त्याचा फायदा घेऊ शकतात.




'विंडोज १०' साठी मोफत सपोर्ट बंद केल्याने जगभरातील लाखो वापरकर्त्यांची डिजिटल सुरक्षा धोक्यात येऊ शकते. या पार्श्वभूमीवर, मायक्रोसॉफ्टला सपोर्ट बंद करण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले जात आहे. 'कंझ्युमर रिपोर्ट्स' या अमेरिकन ग्राहक संघटनेने म्हटले आहे, की लाखो लोक असे डिव्हाइस वापरत आहेत, जे विंडोज ११ वर अपग्रेड केले जाऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत मायक्रोसॉफ्टने विंडोज १० साठी सपोर्ट बंद केला, तर या वापरकर्त्यांना सायबर हल्ल्यांचा धोका वाढेल. या वर्षी ऑगस्टपर्यंत ४६ टक्क्यांहून अधिक जागतिक वापरकर्ते विंडोज १० वापरत होते. यापैकी बहुतेक सिस्टीम विंडोज ११ च्या आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम नाहीत. वापरकर्त्यांकडे आता हे पर्याय आहेत.

मायक्रोसॉफ्टने या निर्णयामुळे प्रभावित झालेल्या वापरकर्त्यांसाठी अनेक पर्याय दिले आहेत. पहिला पेड कव्हर आहे. विंडोज १० वापरू इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांना ३० (अंदाजे रु. २,६५०) डॉलर्समध्ये एक वर्षाचे कव्हर मिळू शकते. हे पुढील वर्षी ऑक्टोबरपर्यंत संरक्षण प्रदान करेल. एक हजार मायक्रोसॉफ्ट रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करूनदेखील अतिरिक्त वर्षाचे कव्हर मिळू शकते. वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असलेला दुसरा पर्याय म्हणजे वनड्राईव्ह बॅकअप, जो मर्यादित कव्हर प्रदान करेल. या पलीकडे, वापरकर्त्यांना विंडोज ११ वर अपग्रेड करण्याचा पर्याय आहे.

# युरोपला पर्यटकांची पसंती

धमाल भटकंती

सुंदर निसर्गरम्य दृश्य, प्राचीन ऐतिहासिक वारसा आणि सांस्कृतिक संपन्नता यामुळे युरोप नेहमीच पर्यटकांची पहिली पसंती राहिला आहे आणि म्हणूनच तो प्रवासासाठीही जगभर प्रसिद्ध आहे. कोणत्या देशात काय पहावे, याचा हा लेखाजोखा.



*** इटली**

इतिहास, कला आणि उत्तम खाद्यपदार्थ यांचे मिश्रण असलेल्या इटलीचा समावेश प्रत्येक प्रवाशाच्या इच्छायादीत केला जातो. रोमच्या ऐतिहासिक स्थळांपैकी व्हेनिसचे कालवे आणि टस्कनीतील सुंदर वाईनरी त्याला खास बनवतात. इटलीतील लहान आणि कमी गर्दीची गावे शोधण्याचा कल वाढत आहे.

*** फ्रान्स**

पॅरिसव्यतिरिक्त नीस आणि प्रोव्हेन्ससारख्या शहरांमध्ये फिरणे अधिक ट्रेंडी आहे. लूव्र म्युझियम, आयफेल टॉवर आणि फ्रेंच रिव्हेरास-ारखी ठिकाणे याला अद्वितीय बनवतात. फ्रान्समधील उत्कृष्ट पाककृती आणि वाइन हीदेखील प्रवाशांसाठी विशेष आकर्षणे आहेत.

*** स्पेन**

बार्सिलोना आणि माद्रिद ही स्पेनमधील आवर्जून पाहण्यासारखी शहरे आहेत. लोक बास्क देश आणि अंदालुसिया प्रदेशाच्या सांस्कृतिक वारशाचा शोध घेत आहेत. ला टोमॅटिना आणि बुल फाइटिंगसारखे सण त्याला खास बनवतात.

*** ग्रीस**

सँटोरिनी आणि मायकोनोसचे समुद्रकिनारे, अथेन्सचा इतिहास आणि ग्रीक खा-द्यपदार्थ पर्यटकांना आकर्षित करतात. ग्रीसमधील लपलेली बेटे आणि गावे शोधण्यात लोकांचा रस वाढत आहे.

*** ऑस्ट्रिया**

व्हिएन्नाचे शाही रंग, साल्झबर्गचा सांगितीक वारसा आणि तिरोलचे सुंदर पर्वत ऑस्ट्रियाला युरोपचा जादुई देश बनवतात. हिवाळ्यात स्कीइंग आणि उन्हाळ्यात हायकिंगसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे.

*** पोर्तुगाल**

लिस्बन आणि पोर्टोचे रंगीबेरंगी रस्ते, डोरो व्हॅलीतील द्राक्षबागा आणि अल्गारवेचे समुद्र किनारे एक उदयोन्मुख गंतव्य स्थान बनवत आहेत. पोर्तुगीज खाद्यपदार्थही खवय्यांसाठी खास आकर्षण आहेत.

*** नॉर्वे**

निसर्गप्रेमींसाठी नॉर्वे हा सर्वात प्रेक्षणीय देश आहे. उत्तरेकडील दिवे, गीझर आणि नेत्रदीपक रो-षणाईमुळे ते भेट देण्यासारखे आहे. नॉर्वेमध्ये इको फ्रेंडली टुरिझमची विशेष आवड आहे.

*** नेदरलँड**

ॲमस्टरडॅमचे कालवे, ट्युलिप गार्डन हे अनोखे बनवतात. नेदरलँड्समधील ग्रामीण सौंदर्य आणि लहान ऐतिहासिक शहरांचा शोध घेण्याचा ट्रेंड वाढत आहे.

*** स्कॉटलंड**

एडिंनबर्गचा इतिहास, हायलँडचे नैसर्गिक सौंदर्य

# शेतकऱ्यांना मदत करण्याची आमची पूर्ण भूमिका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :



मुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे हे एकत्र चर्चा करत शेतकऱ्यांना जी काही मदत करायची आहे त्यांची घोषणा करतील. तर केंद्र सरकारला प्रस्तावही पाठवतील. मुख्यमंत्री आणि आमचे सरकार हे शेतकऱ्यांना पूर्ण मदत करण्यासाठी ताकद देण्याचे काम करणार आहे. त्यासाठी जे काही करावे लागेल ते करणार आहे. दोन-चार प्रकल्प त्यासाठी मागे पडले तरी चालतील पण शेतकऱ्यांना आम्ही काही कमी पडू देणार नाही. या करता आमचे पूर्ण नियोजन सुरू आहे, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, गवई यांच्यावर झालेला हल्ला ही घटना निषेधार्य आहे. सरकारने या घटनेला गांभीर्याने घेतले आहे. भुषण गवई यांच्यासारखे प्रतिष्ठा वान व्यक्तीवर भ्याड हल्ला करणे योग्य नाही. शरद पवार यांनी या घटनेवर आंदोलन करावे का नाही हे ठरवायला हवे. हे काही आंदोलन करण्यासारखी गोष्ट नाही, असे गुन्हे पुन्हा होऊ नये यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे.

**मविआमुळे ओबीसी आरक्षण रद्द**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महा विकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसीचे २७ टक्के आरक्षण रद्द झाले होते. भाजप महा युतीमुळे ते पुन्हा मिळाले. भाजप हाच खरा ओबीसीचा हितचिंतक आहे असा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. राज्यात सर्वत्र पूरपरिस्थिती आहे. अशा परिस्थिती राजकारण सोडून सर्वांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एकत्र यावे आणि मोर्चा रद्द करावा.

**हा आमचा विजय**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, २०१९ मध्ये महा विकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसीचे २७ टक्के आरक्षण रद्द झाले होते. त्या विरोधात भाजपच्या आमदारांनी आंदोलन केले होते. त्या वेळी आघाडी सरकारने आमच्याविरुद्ध आकसापोटी गुन्हे दाखल केले होते. न्यायालयाने आज आम्हाला निर्दोष मुक्त केले असून हा न्यायाचा विजय आहे.




■ *नागपूर : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषण गवई यांच्यावर न्यायालयातच जोडा भिरकावण्याच्या घटनेने देशभरात संतापाची लाट उउसळली आहे. या घटनेचा सर्वच स्तरातून निषेध केला जात आहे. ॲडव्होकटस् मल्टीस्टेट मल्टीपर्पज को. ऑप. सोसायटी, मुंबई, शाखा नागपूर तसेच महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या वतिनेही आज नागपूर येथे या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते.*

# आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का?

## जरांगेंच्या वक्तव्यावरुन तायवाडेंचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राज्यातील राजकारण तापले आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या नेत्यांवर मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या विरोध करणारा संपवायचा या इशाऱ्याने नवा वाद पेटला आहे.

या वक्तव्यावरून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी जोरदार पलटवार केला आहे. आमच्या मनगटात ताकद नाही का? आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का? असा सवाल करत तायवाडे यांनी जरांगेंच्या विधानावर थेट हल्ला चढवला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या दोन वर्षांत आक्रमक आंदोलन उभारणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात खळबळ माजवली आहे. नुकत्याच दिलेल्या वक्तव्यात त्यांनी मराठ्यांवर जळणारे एवढे लोक का आहेत? आपला खरा शत्रू कोण हे कळाले. आता चिंता करायची नाही, विरोध करणारा संपवायचं, असा इशारा दिला. या विधानाने राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात धुमस निर्माण झाला आहे.

जरांगेंच्या या वक्तव्याचा संदर्भ ओबीसी नेत्यांकडे गेला आणि त्यातून वादाचे नवे पर्व सुरू झाले. ओबीसी समाजात या वक्तव्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, संपवायचं ही भाषा समाजात द्वेष आणि संघर्ष निर्माण करणारी आहे, अशी टीका होत आहे.

मनोज जरांगेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बबनराव तायवाडे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिला आहे. जरांगे म्हणतात विरोध करणाऱ्यांचा गेम संपवणार, तर आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का? आमच्या मनगटातही ताकद आहे, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. त्यांनी पुढे म्हटले की, आमच्या ओबीसी समाजाला मिळालेले २७ टक्के आरक्षण संविधानाने संरक्षित केलेले आहे. ते कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

मनोज जरांगे आपल्या लोकांना खुश करण्यासाठी अशा बालिश आणि भडकाऊ वक्तव्यांचा वापर करत आहेत. जरांगे यांनी पुढेही अशी भाषा केली, तर आम्ही प्रत्येक ओबीसी नेता आणि कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभं राहू. संघर्षाला तयार राहू. आमचे आरक्षण कोणी संपवू शकत नाही. सरकारने जरांगे यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही तायवाडेंनी सरकारकडे केली आहे.

# फुटाळा : गडकरींचा ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ : नागपूरमधील फुटाळा तलाव आर्द्रभूमी (वेटलँड) म्हणून घोषित करण्यास नकार देणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मान्यता दिली. त्यामुळे तलाव परिसरात उभारण्यात येणाऱ्या फ्लोटिंग रेस्टॉरंट, बॅन्क्वेट हॉल, संगीत कारंजे (म्युझिकल फाऊंटन) आणि दृश्य गॅलरी यांसारख्या तात्पुरत्या स्वरूपातील प्रकल्पांना कायदेशीर मान्यता मिळाली आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई, तसेच न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने नागपूर मधील स्वयंसेवी संस्था स्वच्छ असोसिएशन यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली.

या संस्थेने नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिकेत असे नमूद केले होते की, तलावाभोवती उभारण्यात येणारी तात्पुरती बांधकामे ही नियमांचे उल्लंघन करतात आणि त्यामुळे तलावाचे पर्यावरणीय संतुलन बिघडू शकते.

याचिकाकर्त्यांनी सार्वजनिक विश्वास तत्त्व आणि पूर्वकाळजीचा सिद्धांत यांचा आधार घेत तलाव परिसरातील मूळ पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याची मागणी केली होती. त्यांच्या मते, फुटाळा तलाव हा नैसर्गिक जलाशय असून तेथे कोणतेही मानवनिर्मित संरचनात्मक काम पर्यावरणासाठी धोकादायक ठरू शकते.

राज्य शासन आणि इतर उत्तरदारांनी या दाव्याला विरोध करत स्पष्ट केले की फुटाळा तलाव हा मानवनिर्मित जलाशय आहे, त्यामुळे तो आर्द्रभूमीच्या परिभाषेत येत नाही. तसेच या प्रकल्पासाठी वर्ष २०१९ व २०२२ मध्ये सर्व आवश्यक परवानग्या, वारसा समितीची मान्यता आणि शहरी विकास विभागाची अनुमती घेण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले होते की, तलाव जरी कायदेशीरदृष्ट्या आर्द्रभूमी नसला तरी पर्यावरणीय काळजीच्या तत्त्वांचा अवलंब करणे आवश्यक आहे. न्यायालयाने कायमस्वरूपी बांधकामांना बंदी घालून, केवळ तात्पुरत्या व मंजूर प्रकल्पांना मर्यादित स्वरूपात परवानगी दिली होती.

या निर्णयाविरुद्ध स्वच्छ असोसिएशनने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत असे स्पष्ट केले की फुटाळा तलाव हा आर्द्रभूमीच्या परिभाषेत येत नाही, आणि राज्य शासनाने घेतलेल्या सर्व परवानग्या व पर्यावरणीय अटींच्या अधीन राहून हे प्रकल्प पुढे नेण्यास हरकत नाही.

परिणामी, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या स्वप्नातील या प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

: मुलखावेगळी माणसं :

# काष्ठशिल्पकार छगन शिक्कलकर



लोकरंग

शिल्पकलेची अनेकांना आवड असते. शिल्पात कोरलेली चित्र कायमच मनमोहित करतात. देवाकडून जन्मजात मिळालेल्या याच नजरेच्या माध्यमातून धुळ्यातील त-हाडी येथील सामान्य कुटुंबाचे छगन जगन्न शिकल्लकर यांनी काष्ठशिल्पाचा छंद चांगल्या पद्धतीनं जोपासलाय. शिकल्लकर यांना शालेय जीवनापासूनच चित्रकलेची आवड होती. निसगार्ने निर्माण केलेल्या सृष्टीत अनमोल खजिना दडलेला आहे. झाडांची मुळं, फांद्या, लाकूड, वेली यात विविध प्रकारच्या कलाकृती दडलेल्या असतात.

शिल्पकलेच्या दगड आणि धातू या दोन माध्यमांप्रमाणेच लाकूड किंवा काष्ठ हेही एक महत्त्वाचे माध्यम आहे. हस्त व्यवसाय आणि इतर उपयुक्त कला इत्यादींत जसा लाकूडकामाचा अंतर्भाव होतो, त्याचप्रमाणे उच्च प्रकारची शिल्पकला म्हणूनही काष्ठशिल्प गणले जाते. जंगलातील अनेक वनस्पती, झाडांपासून विविध आकार असलेली शिल्पे तयार होतात. परंतु ते प्रत्येकाच्या नजरेस पडत नाहीत. कारण त्यास पारखी कलाकाराच्या नजरेची गरज असते.

छगन जगन्न शिकल्लकर यांनीसुद्धा काष्ठशिल्पाची कला जोपासली. घरीच त्यांनी आपली शिल्प कार्यशाळा समजून कामाला सुरुवात केली. जातीने आदिवासी असलेल्या शिकल्लकर यांनी सुतार कामाची सर्व अवजारे आणली आणि लाकडाच्या प्रत्येक तुकड्यापासून एक सुंदर शिल्प आकार घेऊ लागले. मागील २० वर्षांपासून त्यांनी ही कला जोपासली असून, आज अनेक सुंदर शिल्पे त्यांच्याकडे तयार झालीत. लाकडांना आकार देऊन सुंदर काष्ठशिल्प घडविण्याचे काम छगन शिकल्लकर करीत असतात. आपल्या जबाबदारीतून मिळालेल्या फावल्या वेळेत ते आपला छंद जोपासतात. तऱ्हाडी येथील घरामध्ये त्यांनी तयार केलेले अनेक काष्ठशिल्प अडगळीत पडलेले दिसून येतात.

एक शिल्प बनविण्यासाठी त्यांना साधारण ८ दिवस अथवा दोन महिने देखील लागतात. प्रत्येक शिल्पाच्या आकारानुसार ते बनविण्याचा कालावधी अवलंबून असतो. शिल्पासाठी आणलेल्या लाकडाला पटाशी, किकरे, काणस या अवजारांचा वापर करून वेगळा आकार दिला जातो. आवश्यकतेनुसार जोडणी करून तर काही अखंड काष्ठशिल्पाची पॉलिश पेपरने घसाई केली जाते. त्यामुळे ते शिल्प गुळगुळीत होते.

पॉलिशचा लेप दिल्यानंतर ते अधिक आकर्षित होते. एकदा बनविलेल्या शिल्पासारखे सेम टू सेम दुसरे शिल्प तयार होत नाही. प्रत्येक शिल्पाचे वेगळेच महत्त्व असल्याचे शिकल्लकर यांनी सांगितले. या काष्ठशिल्पांसाठी ते शिवन, जांभूळ, साग, बोर, अंजन या जातीच्या लाकडांचा वापर करतात.छगन शिकल्लकर यांच्या संग्रहात बैलगाडी, लाटणे, बाजवड, गवराई, रोटपाटले पाटल, काम शिल्प, आदी आकर्षक काष्ठशिल्पे आहेत. मी छंदातून जोपासलेल्या काष्ठिशिल्पांचे जिल्हास्तरावर प्रदर्शन भरवण्याची माझी इच्छा आहे. मात्र आजपर्यंत ही संधी मिळू शकली नाही याची खंत आहे, असंही छगन शिकल्लकर सांगतात.

काष्ठ हे शिल्पाच्या सर्वांत प्राचीन माध्यमांपैकी एक आहे. लाकडातून शिल्पाकृती कोरून काढण्याची परंपरा आजही प्रचलित आहे. शिकल्लकर यांच्या काष्ठकलेतून भारतीय कलेच्या ऐतिहासिक प्रवासाचा बोध होतो, असंही डी. एस. मोरे या कलाशिक्षकानं सांगितलं.

■ ■ ■

# 'राज' सोबतीला काँग्रेसचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला आघाडीत सामावून घेण्यास काँग्रेसने ठाम विरोध दर्शवला आहे. महाविकास आघाडीला आणि काँग्रेसला नव्या भिडूची आवश्यकता नाही, असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले असून, यामुळे ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीच्या चर्चेला धक्का बसला आहे. दरम्यान, आम्ही युतीसाठी तुमच्याकडे कुठे आलोय, असे प्रत्युत्तर मनसेने दिले आहे.

इंडिया आघाडीच्या वाटाघाटी काँग्रेसच्या स्थानिक पातळीवर होणार आहेत. जिल्हा आणि ब्लॉक पातळीवरील अध्यक्ष, शहराध्यक्ष आणि कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानुसार निर्णय घेतले जातील. त्यामुळे नवीन मित्रपक्ष घेण्याची आवश्यकता नाही, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तसेच विद्यमान महाविकास आघाडी पुरेशी मजबूत आहे. त्यामुळे नवीन भिडूची आवश्यकता काँग्रेस आणि महाविकास आघाडीला नाही, असे सपकाळ म्हणाले.

सपकाळ यांच्या विधानाला मनसेकडूनही प्रत्युत्तर देण्यात आले आहे. युतीसाठी आम्ही कुणाकडे गेलो नाही. आमच्याकडे आले असतील, तर त्यांना विचारावे. आमच्या पक्षात निर्णय घेण्याचे अधिकार फक्त राज ठाकरे यांनाच आहे, असे मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी सांगितले. यामुळे मनसे आणि मविआ यांच्या आघाडीबाबत संभ्रम आहे.

# अवजड वाहनांना शहरात प्रवेशबंदी



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

शेजारील परराज्ये आणि अन्य मार्गाने शहरात येणारी जड वाहतूक अपघाताला कारण ठरत असल्याने वाहतूक शाखेने अवजड वाहनांना प्रवेश बंदी लागू केली आहे. विभागाचे उपायुक्त लोहित मतानी यांनी तडकाफडकी याबाबतचे परिपत्रक जारी केले.

यात जिल्ह्याच्या बाहेरून शहरात येणारी वाहतूक बाह्यवळण रस्ता मार्गे परस्पर शहराबाहेरून प्रवास करतील. शहरात दूध, जीवनावश्यक वस्तू, इंधन आणि ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या वाहनांव्यतिरिक्त जड वाहतुकीलाही पायबंद घातला जाणार आहे.

नागपूर मार्गे जिल्ह्या बाहेर जाणाऱ्या वाहनांना बाह्य वळण रस्त्याचा वापर करावा लागणार आहे. बरेचदा बाह्यवळण रस्ता टाळून ट्रक चालक शहरातील अंतर्गत मार्गांवरून प्रवास करतात. त्यामुळे अपघातांची संख्या वाढत आहे. गेल्या पाच वर्षांत शहरात ४२२ अपघात झाले. यात ४५७ लोकांचा मृत्यू झाला तर २७९ गंभीर अपघातात ५६३ जण गंभीर जखमी झाले. यातील अनेकांना कायमचे अपगंत्व आले.

या कालावधीत १८० अपघातात २४७ जण लोक किरकोळ जखमी झाले. त्यामुळे, या वाहतुकीला शहरात प्रवेश बंदी लागू होणार आहे. वाहतूक शाखेने जारी परिपत्रकात विविध मार्गांनी शहराच्या दिशेने होणारी जड वाहतूक बाह्य वळण रस्त्याच्या कुठल्या मार्गाने वळवावीत याबाबत स्पष्ट आदेश आहेत.

शहरातील औद्योगिक क्षेत्रातून जड वाहतूक होणार आहे. मात्र, या वाहतुकीलाही वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. जबलपूर व भंडाराकडून एमआयडीसीकडे येणारी जड वाहने कापसी उड्डाणपूल, जामठा , झिरो सर्कल अमरावती मार्गावरील गोंडखैरी टि-पॉइंन्ट येथून उजवे वळण घेवून सरळ वाडी टि-पॉइंन्ट मार्गाचा वापर करतील. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना शहर हद्दीत प्रवेशासाठी सकाळी ६ ते दुपारी १२ आणि दुपारी ४ ते रात्री १० पर्यंत वाहतूकीस मनाई असेल. अजनीतील भारतीय खाद्य निगम गोदाम, संत्रा मार्केट तसेच शासकीय गोदाम येथे होणारी जड वाहतुकीचे मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

शासकीय कामात गुंतलेल्या जड वाहन चालकांनी मुळ प्रमाणपत्र बाळगणे सक्तिचे असेल. वाहनावर सरकारी कर्तव्याचे फलक सक्तीची असेल.य दुध, इंधनासारख्या जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी जडवाहने बाह्यवळण मागार्चाच अवलंब कतील. जडवाहनाचे मालक- चाकांना वाहतूक नियम पालन सक्तिचे असेल. शहराच्या हद्दीतून ताशी ३० कि.मी. गतीची मर्यादा बंधनकारक असणार आहे.

नागपूर शहरात माल वाहतूक करणाऱ्या जड वाहन धारकांनी दुपारी १२ ते ४ दरम्यान शहरात प्रवेश मिळावा, अशी मागणी केली आहे. शहरात मधल्या मागार्ने अनेक वाहने दाखल होतात. या बाबींचा विचारकरून प्रशासनाकडून शहरात विकासकामाचे पुरावे देणाऱ्या वाहनाला परवानगी दिली जाईल. मात्र, दुपारी १२ ते ४ आणि रात्री १० ते सकाळी ६ वाजतापर्यंत याव्यतिरीक्त कोणतेही जड वाहन दिसल्यास वाहन जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

: किड्स इंडिया २०२५ :

# नवकल्पना आणि जागतिक संधींचा उत्सव

भारताचा प्रमुख बी2बी टॉय फेअर किड्स इंडिया 2025 मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये सुरू झाला. हा मेळा स्पिलवारनमेसे इंडिया प्रा. लि. यांनी आयोजित केला असून, ती जर्मनीतील स्पिलवारनमेसे या जगातील सर्वात मोठ्या टॉय फेअर आयोजक संस्थेची सहयोगी कंपनी आहे.



या कार्यक्रमात नामांकित उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते आणि उद्योगातील तज्ज्ञ सहभागी होत असून, खेळण्यांच्या जगातील नव्या प्रवृत्ती, नवकल्पना आणि व्यवसाय संधी यांचे प्रदर्शन करण्यात येत आहे. स्पोर्ट्स गुड्स एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑल इंडिया टॉय मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या सहयोगाने आयोजित हा मेळा नेटवर्किंग, ज्ञानविनिमय आणि जागतिक बाजारपेठेतील संधींसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून ओळखला जातो. होस्टेड बायर प्रोग्रामला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, हा मेळा व्यवसायासाठी एक प्रीमियम केंद्र बनला आहे, असे तनु ऐलावाडी, व्यवस्थापकीय संचालक, स्पिलवारनमेसे इंडिया प्रा. लि. यांनी सांगितले.

या फेअरमध्ये अनेक नवीन उत्पादने सादर केली जात आहेत. त्यातील एक आकर्षण म्हणजे क्रिकेट आयकॉन्स या ब्रँडकडून सादर करण्यात आलेल्या 7-इंची ॲक्शन फिगर्स क्रिकेटप्रेमी आणि कलेक्टर्ससाठी एक नवीन अनुभव देणारी प्रीमियम शृंखला. क्रिकेट आयकॉन्स यांनी आपल्या या नव्या मालिकेचे लाँचिंग किड्स इंडियामध्येच करण्याचा निर्णय घेतला, ज्यातून या फेअरचे नवकल्पनांसाठीचे केंद्रस्थान अधोरेखित होते.

2025 चा परिषद कार्यक्रम खेळण्यांच्या उद्योगातील बदलत्या गरजांवर आणि भविष्यातील दिशांवर केंद्रित आहे. यामध्ये भारतात टॉय सेफ्टी इकोसिस्टम विकसित करण्यावरील चर्चा, स्मार्ट टॉइज, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा खेळण्यांवरील प्रभाव, तसेच टॉइज विथआऊट बॅरियर्स सर्वसमावेशक आणि लिंग - निरपेक्ष खेळण्यांवरील सत्राचा समावेश आहे.

फ्रॉम इम्पोर्टर टू एक्सपोर्टरः इंडियास रायझिंग ग्लोबल फुटप्रिंट इन द टॉय इंडस्ट्रीर या सत्रात भारताच्या खेळणी उत्पादन आणि निर्यात क्षेत्रातील वाढीवर प्रकाश टाकण्यात आला.उद्घाटन समारंभात उद्योगातील प्रतिष्ठित नेत्यांनी भारताच्या खेळणी उद्योगातील बदलत्या वातावरणावर आपले विचार मांडले. महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार म्हणाले, आपण अशा खेळणी ब्रँड्स निर्माण करूया जे भारताच्या आत्म्याशी जोडलेले आहेत जिथे नवकल्पना आणि परंपरा यांचा संगम आहे, आणि प्रत्येक मुलाचे खेळ आपल्या संस्कृती, मूल्ये आणि आत्मनिर्भर भारत व वसुधैव कुटुंबकम् या दृष्टीकोनाशी जोडलेले आहे. भारतातील खेळणी निर्मितीची परंपरा आपल्या कौशल्य आणि विविधतेचे दर्शन घडवते.

■ ■ ■

# असा लागला शोध भुर्रर उडणारे विमान



विमान शोधाबद्दल दोन प्रमुख मते आहेतः एक, भारतीय शिवकर बापूजी तळपदे यांनी १८९५ मध्ये प्राचीन ग्रंथांवर आधारित विमानाचा शोध लावला आणि उड्डाण केले, जे जगाला कमी माहिती आहे.

दुसरी, राईट बंधूंनी १७ डिसेंबर १९०३ रोजी पहिले यशस्वी, शक्तीवर चालणारे विमान तयार करून उड्डाण केले, ज्यांना या शोधाचे श्रेय दिले जाते.

शिवकर बापूजी तळपदे यांनी १८९५ मध्ये भारतात विमानाचा शोध लावला, असा एक दावा आहे, त्यांनी महर्षी भरद्वाज यांच्या प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून, एका विमानाचे यशस्वी उड्डाण १५०० फूट उंचीपर्यंत केले होते, असे मानले जाते.

परंतु, या शोधाचे श्रेय राईट बंधूंना दिले जाते, त्यामुळे याबद्दल वाद आहेत. ऑरव्हिल आणि विल्बर राईट यांनी १७ डिसेंबर १९०३ रोजी पहिले यशस्वी, शक्तीवर चालणारे विमान तयार केले आणि उड्डाण केले. त्यांनी पक्ष्यांचा अभ्यास करून आणि विविध ग्लायडरच्या चाचण्या घेऊन उड्डाणाबद्दल शिकले.त्यांच्या पहिल्या विमानात, ज्याला 'फ्लायर' म्हणतात, सतत उड्डाण करण्यासाठी मोटर होती.

थोडक्यात, विमान शोधण्याच्या इतिहासावर अनेक मते आहेत आणि या विषयावर वादंग आहेत. भारतात शिवकर बापूजी तळपदे यांचाही शोध मानला जातो, तर जगात राईट बंधूंना विमानाचे जनक मानले जाते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गाला अखेर मंजुरी

## मुंबई-हावडा मार्गावरील ताण कमी होणार : अतिरिक्त गाड्यांचे संचालन शक्य

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ७ :

महाराष्ट्रातील रेल्वे नेटवर्क आणखी सक्षम करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकण्यात आले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच२ सातत्याने विकासाला दिशा देण्याचे काम असल्याच्या कृतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व रेल्वे बोर्डाने भुसावळ - वर्धा तिसरी आणि चौथी रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे.



या प्रकल्पामुळे मुंबई - हावडा या देशातील महत्त्वाच्या रेल्वे मार्गावरील वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, अतिरिक्त प्रवासी गाड्यांचे संचालनही शक्य होणार आहे. व नवीन गाड्या सुरू होण्यास व सुविधा मिळण्यास गती मिळेल. दळणवळण सुविधेत वाढ होईल. या प्रकल्पाची लांबी ३१४ किलोमीटर असून, यावर अंदाजे ९१९७ कोटींचा खर्च होणार आहे. या मार्गावर ७२ रोड ओव्हर/अंडर ब्रिज आणि १ रेल ओव्हर रेल ब्रिज बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा यवतमाळ हिंगोलीहे जिल्हे लाभान्वित होणार आहेत. रेल्वे मार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळे निर्माण होणारा अडथळा कमी होऊन गाड्यांच्या वेळापत्रकात सुधारणा होईल. तसेच पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

याशिवाय या प्रकल्पामुळे ४५ कोटी किलो सीओ २ उत्सर्जनात घट होणार असून, ही घट १.८ कोटी झाडे लावल्यासारखीच परिणामकारक ठरेल.

या संदर्भात खासदार अनुप धोत्रे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत . सहकारी आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल यांनी विकास कामाला सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ बुधवार, दि. ८, ऑक्टोबर २०२५ ■

## देहव्यापारावर पोलिसांची धाड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**
गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी)ने ऑपरेशन शक्ती अंतर्गत एका देहव्यापाराच्या अड्ड्याचा भंडाफोड केला. अड्डा चालविणाऱ्या महिला व पुरूषाला अटक करून पीडित महिलेची सुटका केली. सुशीलकुमार लालसिंग ठाकूर (३७) रा. चुनाभट्टी, विवेकानंदनगर आणि शोभा श्याम शेंडे (४५) रा. हनुमाननगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

हुडकेश्वर ठाण्यांतर्गत नरसाळा मार्गावरील ब्रम्हविद्या सोसायटीमध्ये एका घरी काही लोक देहव्यापाराचा अड्डा चालवत असल्याची माहिती एसएसबीला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंटरला ग्राहक बनवून तेथे पाठवले. पंटरने सुशील आणि शोभा यांच्याशी सौदा करून पोलिसांना इशारा दिला.

पोलिसांनी धाड टाकून झडती घेतली असता एक पीडित महिला मिळाली. आरोपींनी पैशांचे आमिष दाखवून तिला देहव्यापारात लोटले होते. पोलिसांनी पीडित महिलेला ताब्यात घेतले. शोभा आणि सुशीलविरुद्ध हुडकेश्वर ठाण्यात पीटा ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपींकडून रोख १,५०० रुपये, २ मोबाईल आणि वाहन असा एकूण १ लाख रुपयांचा माल जप्त केला. ही कारवाई पोनि राहुल शिरे, पोहवा प्रकाश माथनकर आणि त्यांच्या पथकाने केली.

### सरन्यायाधीश भूषण गवई यांचेवरील भ्याड हल्याच्या निषेधार्थ
## जिल्हा न्यायालय परिसरात आंदोलन



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**
जिल्हा वकील संघटना नागपूर चे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे व महासचिव ॲड.मनीष रणदिवे यांचे नेतृत्वात जिल्हा न्यायालय परिसरात सरन्यायाधीश भूषण गवई यांचेवर झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ दि.७ आक्टोम्बर २०२५ रोजी नारे निदर्शने आंदोलन करण्यात आले.बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष ॲड.अनिल गोवरदिपे, जिल्हा वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड.कमल सतुजा, माजी महासचिव ॲड.नितीन देशमुख यांचेसह जवळपास ५०० च्या वर वकील बांधव उपस्थित होते.

जिल्हा न्यायालय परिसरातुन संविधान चौकापर्यंत वकील मंडळी पायी चालत निघाले. संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन आंदोलनाची सांगता झाली. याप्रसंगी, ॲड. रोशन बागडे यांनी भारतीय लोकशाहीच्या तीन स्तंभापैकी एक असलेल्या न्यायपालिकेच्या प्रमुखावर झालेला हा हल्ला अतिशय लाजीरवाना असुन न्यायसंस्था ही धर्मनिरपेक्ष भारतातल्या कोणत्याही धर्मास समतेचा आरसा दाखविण्याचे काम करत आलेली आहे. आणि यापुढेही न्यायसंस्थेची स्वायत्तता अबाधित राहने ही लोकशाहीच्या बळकटीसाठी गरजेचे असुन कालचा हल्ला हा लोकशाहीसाठी हा काळा दिवस असल्याचे प्रतिपादन केले. म्हणून राकेश किशोर यांची सनद रद्द करण्यात यावी जेणेकरून अशा प्रकारच्या घटनांना आळा बसेल.

यावेळी डिबीएचे पदाधिकारी ॲड. उषा गुजर, ॲड. आशिष नागपूरे, ॲड. संदिप बावनगडे, ॲड. वासुदेव कापसे, ॲड. मनोज मेंढे, ॲड. उदय डबले, ॲड. योगेश मंडपे, कौटुंबिक न्यायालयाचे पदाधिकारी ॲड. रामनाथ सेन, ॲड.वासंती रिंके, ॲड. आदिल खान, ॲड. निलेश पानतावने, ॲड.निलेश गायधने, ॲड.श्रीरंग भोंगाडे, ॲड. विलास राऊत, ॲड. रवि गवई , ॲड. स्मिता ताकसांडे, ॲड. स्मिता कांबळे, ॲड. विनोद खोबरे, ॲड. नितीन वासे, ॲड. विकास कराडे, ॲड.विक्की तांबे, ॲड. सौरभ भेंडे, ॲड.लुबेश मेश्राम, ॲड. विरीन बावर, ॲड.अनथोनी, ॲड. रोहन मालविय, ॲड. बाराहाते मॅडम, ॲड.विशाखा मेश्राम, ॲड. वैभव दहिवले, ॲड. सचिन मेकाले, ॲड. सुबोध व इतर अनेक वकील उपस्थित होते.

## विषारी कफ सिरपमुळे
### १८ महिन्याच्या बाळाचा मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**
नागपूरमध्ये विषारी कफ सिरपमुळे १८ महिन्याच्या बाळाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. धानी डेहरिया नावाच्या या चिमुकलीचा नागपुरातील शासकीय मेडिकल रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार, मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील धानी गंभीर स्थितीत उपचारासाठी नागपुरात दाखल करण्यात आली होती. तिच्या किडनीच्या कार्यात बिघाड आणि मेंदूमध्ये सूज निर्माण झाल्याने तिला रुग्णालयात उपचार सुरू होते. धानीच्या मृत्यूनंतर या विषारी कफ सिरपामुळे नागपुरातील मृत्यूची संख्या एकूण दहा झाली आहे.

कफ सिरपमुळे बाळांच्या मृत्यूनंतर प्रशासन आणि आरोग्य अधिकारी खडबडून जागे झाले आहेत. वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे पथक शासकीय मेडिकल रुग्णालयात पोहचले असून, बालरोग विभाग प्रमुख आणि न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे तज्ज्ञ यांच्यासह रुग्णांची स्थिती, उपचारांची माहिती आणि मेडिकल इतिहास तपासण्यात आला आहे. त्याचबरोबर, एम्स नागपूरच्या नेतृत्वाखाली केंद्रीय पथकाने छिंदवाडा जिल्ह्यातील परासीया तालुक्याचा दौरा केला, जिथे या सिरपमुळे सर्वाधिक बाळ प्रभावित झाले आहेत. तीन दिवसांत केंद्रीय पथक आपला अहवाल केंद्राला सादर करणार आहे.

विषारी कफ सिरपात मुख्य घटक डेक्सट्रोमेथोर्फन हायड्रोब्रोमाइड सिरप आहे, जे १९५० च्या दशकात कोडेनला पर्याय म्हणून विकसित करण्यात आले. हे सिरप कोरड्या खोकल्यावर आराम देण्यासाठी वापरले जाते आणि मेंदूपर्यंत खोकल्याचे संदेश पोहोचण्यापासून थांबवते. औषध केमिकल प्रोसेसिंगद्वारे तयार केले जाते आणि लहान मुलांसाठी प्यायला सोपं असल्यामुळे सिरपच्या स्वरूपात दिले जाते. विशेष म्हणजे, जर मुलांना किंवा रुग्णांना यापूर्वी लिव्हर, किडनी किंवा इतर गंभीर आजार असतील, तर हे औषध देण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पालकांनी बाजारात सहज मिळणारे सिरप मुलांना देण्यापूर्वी त्याची सुरक्षितता आणि डॉक्टरांचा सल्ला निश्चित करणे गरजेचे आहे.

## गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या नेतृत्वात आरक्षण बचाव महा जनआक्रोश मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ७ :**
गोंडवाना गणतंत्र पार्टी व संयुक्त कृती समिती च्या वतीने बासुदेवशाह टेकाम, राष्ट्रीय उपाध्यक्ष, गोंडवाना गणतंत्र पार्टी यांचे नेतृत्वात आयोजित केले आहे. दि ९ आक्टोंबर, सकाळी ११वा. स्थळ तहसिल कार्यालय, रामटेक मोर्चा मार्ग गोटूल पेनठाणा, शितलवाडी, टी - पॉईंट , बस स्टैंड चौक, आंबेडकर चौक, गांधी चौक. तहसिल कार्यालय, रामटेक येथे खालील विविध मागण्यासाठी काढण्यात येणार आहे.

अनुसुचित जमाती म्हणजे आदिवासीचे आरक्षण सर्वांना महाप्रसाद वाटतो का? येथे सर्वच आदिवासींचे आरक्षण लाटण्याच्या प्रयत्न करत आहे. खूप मोठी शोकांतिका आहे. ज्या आरक्षणाच्या भरोशावर आदीवासी मुले उच्च शिक्षण घेऊन अधिकारी बनतात तर काही नेते लोक आरक्षणाच्या भरोशावर आमदार, खासदार व मंत्री बनतात, ते सुध्दा आज चुप किंवा झोपलेले आहेत ही शोकांतिका आहे. आज बंजारा धनगर व इतर समाज हे आदिवासीचे आरक्षण हिंसकवण्याच्या प्रयत्न करत आहे. हे जर थांबवायचे असेल तर सर्व समाज बांधवांनी यासाठी जागृत झालं पाहिजे आणि एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. म्हणून दिनांक ९ ऑक्टोबर रोज गुरुवारला सकाळी ११ वा. तहसिल कार्यालय रामटेक येथे धोक्यात आलेले आरक्षण व इतर विषयांना घेऊन आरक्षण बचाव महा जनआक्रोश मोचार्चे आयोजन करण्यात येत आहे. तरी जास्तीत जास्त हितचिंतक समाजसेवी संघटनानी यात सामील व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहे. बंजारा, धनगर व इतर कोणत्याही जातीला अनुसुचित जमाती (आदिवासी) मध्ये समावेश करू नये हे संविधानिक आरक्षण आहे. मतांच्या लाचारीसाठी यात राज्य सरकारने लुडबुड करू नये.

आदिवासी तसेच डोंगराळ अर्थात (दुर्गम भागामध्ये पयार्यी शिक्षक रुजु होइपर्यंत या मागातून बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करू नये. आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत वर्ग ली पासून त्वरीत प्रवेश देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी. नोकरीतील आदिवासींचा अनुशेष त्वरीत भरण्यात यावा.

वन व महसुल जमीनीवरील अतिक्रमणधारकांना त्याचे हक्क कायम करून जमिनी पट्टे वाटप करण्यात यावे. आदिवासीना वनवासी संबोधना-यांवर ॲट्रासिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करावे. आदिवासींच्या जमीनी लीजवर देण्याचा शासन निर्णय घेऊ नये यामुळे आदिवासी भूमीहीन व बेरोजगार होईल. छोटा बिंदु नामावली मध्ये राज्य सरकारने असंवैधानिक बदल केल्यामुळे हजारों आदिवासी नोकरीपातून वंचित झाले आहेत. करीता २९ मे २१७ प्रमाणे बिंदु नामावली दुरुस्ती करून आदिवासी आरक्षगाचा बिंदू २ वर करावा. आदिवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचा डी बी टी प्रक्रियाबंद करून जेवणाची व्यवस्था पूर्वीच्या प्रमाणे सुरू करावी.

नागपूर जिल्हयात नुकतेच झालेल्या नुकसानीसाठी सरसकट पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी. नॅशनल पेच टायगर प्रकल्प येथे वारंवार वाघ व हिंसक प्राण्यांच्या हल्लूयामुळे शेतक-यांचे बळी गेले असून लाखो पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्याच्या शेतीच्या संरक्षणासाठी झटका मशीन वाटप करण्यात यावे.

प्रादेशिक व बफर झोन मध्ये काम करणाऱ्या मजुराचे पाच ते सहा महिन्यांपासून पगार झालेले नाही तरी ते त्वरीत देण्यात यावे.

देवलापार वनपरिक्षेत्रात वाघांच्या हल्ल्यामुळे व अपघातामुळे वारंवार लोकांची जीवितहानी होत आहे रामटेक तालुका अंतर्गत देवलापार येथे उच्च शिक्षणाकरिता महाविद्यालय सुरू करावे. देवलापारला पूर्ण तालुक्याचा दर्जा देण्यात यावा, अशा विविध मागण्यासह मोर्चा काढण्यात येणार आहे.

## बसच्या धडकेत विद्यार्थिनी ठार
### खरबी रोडवर भीषण अपघात

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**
दुचाकीने शिकवणीला जात असलेल्या विद्यार्थिनीला भरधाव असलेल्या खासगी बसच्या चालकाने मागून जबर धडक दिली. यात गंभीर जखमी विद्यार्थिनीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची ही भीषण घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत खरबी रोडवर मंगळवारी सकाळी घडली. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये रोष पसरला. मोठ्या संख्येत नागरिकांनी प्रशासनाविरुद्ध घोषणा दिल्या. यामुळे काही वेळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भाग्यश्री जियालाल टेंभरे (१७) रा. माँ अंबे कॉलनी, खरबी असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे.

भाग्यश्री बारावीची विद्यार्थिनी होती आणि नीट परीक्षेची तयारी करीत होती. त्यासाठी तिने शिकवणी लावली होती. नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास भाग्यश्री तिच्या एमएच-४९/झेड-०७१८ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने शिकवणीला जात होती. गरीब नवाज चौकातून खरबी चौकाकडे जाताना पांढऱ्या रंगाच्या खासगी बसच्या चालकाने तिच्या दुचाकीला मागून जबर धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, भाग्यश्री एका बाजूला पडली आणि तिचे वाहन बऱ्याच अंतरापर्यंत फरफटत गेले. भाग्यश्रीने हेलमेट घातलेला नव्हता. यामुळे तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. वाठोडा पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि भाग्यश्रीला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात घेऊन गेले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी आरोपी बस चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

**प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी**

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्ररोष पहायला मिळाला. नागरिकांनी सांगितले की, या मार्गावरून जड आणि मोठ्या वाहनांची रहदारी वाढली आहे. त्यातच भंगार विक्रेते आणि इतर दुकानदारांनी रस्त्यापर्यंत आपले सामान पसरवून ठेवले आहे. त्यामुळे रस्ता अरूंद झाला आहे. रोज छोट्या-मोठ्या अपघाताच्या घटना येथे होतात. वारंवार तक्रार करूनही महानगर पालिका येथून अतिक्रमण हटविण्यास तयार नाही. पाहता-पाहता लोकांची गर्दी जमली आणि तणावाची स्थिती निर्माण झाली. लोक प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी करू लागले. माहिती मिळताच डीसीपी निकेतन कदम घटनास्थळी पोहोचले.

## अत्यावश्यक कामांसाठी महावितरणचा शटडाऊन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**
रोहीत्र कार्यान्वयन, उपरी ते भुमिगत केबल आणि इतर अत्यावश्यक कामांसाठी महावितरणतर्फे. उद्या बुधावारी (दि. 8) महाल विभागात काही तासांकरिता वीज पुरवठा बंद करण्यात येणार आहे.

ग्राहकांनी या कामांमध्ये सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे, जेणेकरून भविष्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता त्यांना सुरक्षित आणि दजेर्दार वीजपुरवठा मिळू शकेल. या कामांमुळे सकाळी 8 ते 12 या वेळेत ओंकार नगर, सद्भावना नगर, स्वराज नगर, गजानन नगर, श्रीनाथ साई नगर, ग्रीन प्लॅनिट कॉलनी, राघवेंद्र नगर, सकाळी 9 ते 12 या वेळेत ताज नगर, फुले नगर, दिनेश्वर नगर, रघुजी नगर. नंदनवन कॉलनी, लक्ष्मीनारायण मंदिर, नंदनवन पोलिस स्टेशन, रिलायन्स फ्रेश, ताजश्री अपार्टमेंट, सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत नगर विकास सोसायटी, संताजी सोसायटी, समाजभूषण सोसायटी, एफसीआय सोसायटी, रचना सोसायटी,जागृत हनुमान मंदिर परिसर, मेंघरे लेआउट, मधुबन लेआउट, आदिवासी सोसायटी, मनीष नगर.सकाळि 11 ते दुपारी 2 या वेळेत सराईपेठ गुलाब बाबा आश्रम परीसर, दसरा रोड, रहातेकर वाडी, भूतिया दरवाजा, तुळशीबाग, गुजरवाडा, उपाध्ये रोड, कोठी रोड, नाईक रोड, भोसले विहीर, नवी शुक्रवारी, गायत्री कॉन्व्हेंट, पांडव कॉलेज, प्रशांत नगर, नंदनवन रोड, नंदनवन पाण्याची टाकी, नंदनवन कॉलनी, कबीर नगर, गुरुदेव नगर, कीर्ती नगर, प्रियदर्शिनी कॉलेज, दुपारी 3 ते 5 या वेळेत एनआयटी कॉम्प्लेक्स, आयुर्वेदिक लेआउट, छोटा ताजबाग, नेरकर हॉस्पिटल, नवपती शाळा, चिल्लर शॉप छोटा ताजबाग रोड आणि सकाळी 8:30 ते 12 या वेळेत शास्त्रीनगर, हिवरी नगर, गरोबा मैदान, दत्त नगर, बाबुळबन या भागातील वीजपुरवठा बंद राहील

ग्राहकांनी वीज पुरवठा बंद होण्यापुर्वी पाण्याची टाकी भरणे, मोबाइल फोन चार्ज करणे आणि इतर महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण करून ठेवावी. ज्यामुळे भविष्यात अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळेल. नागरिकांनी या कामात सहकार्य करावे.

## विवाहितेची आत्महत्या, पती-सासूवर गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**
लग्नाला अनेक वर्ष होऊनही मुलबाळ होत नसल्याने पती आणि सासूने विवाहितेचा इतका छळ केला की तिने आत्महत्या केली. पोलिसांनी तपासाअंती पती आणि सासूवर आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदविला आहे. नितीन दिनकर पाटील (४५) आणि शारदा दिनकर पाटील (६५) दोन्ही रा. लियो पॅराडाईज, गोकुळ सोसायटी, बोरगाव अशी आरोपींची नावे आहेत. अर्चना नितीन पाटील (४५) असे मृत विवाहितेचे नाव आहे.

**मुलबाळ होत नसल्याने करीत होते छळ**

मिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिल २००९ रोजी नितीनचे मुंबईच्या ऐरोली येथील रहिवासी अर्चनाशी रितिरिवाजाने लग्न झाले होते. अर्चनाचे वडील कृष्णत हरगुडे यांनी मोठ्या धुमधडाक्यात मुलीचे लग्न केले होते. मात्र लग्नाला अनेक वर्षे होऊनही नितीन आणि अर्चनाला बाळ होत नव्हते. नितीन आणि त्याची आई शारदा यासाठी अर्चनाला दोष देत होते. तिला शिविगाळ करून मारहाण करीत होते. याबाबत अर्चनाने तिच्या कुटुंबीयांना बरेचदा माहिती दिली होती. अनेकदा समजवल्यानंतरही आरोपी अर्चनाचा छळ करीत होते. दररोज तिला टोमणे देत होते.

आरोपींकडून होत असलेल्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून अर्चनाने गत १६ सप्टेंबरच्या सायंकाळी राहते घरी छताच्या पंख्याला दोरी बांधून गळफास लावला. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात अर्चनाचे वडील कृष्णत यांनी मुलीवर होत असलेल्या अत्याचारांची माहिती दिली. नितीन आणि शारदाच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप लावला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोघांनाही अटक केली आहे.

### ओ.बी.सी.समाजाच्या वतीने होणाऱ्या १० ऑक्टोबरच्या महामोर्चात
## सकल कुणबी समाजाचे समर्थन जाहीर




■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**
महाराष्ट्र शासन मुख्यमंत्राच्या वतीने मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाण पत्र देऊन त्यांना ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण देण्याचे गैर संवैधानिक कार्य केले. त्यामध्ये कुणबी समाजाचा व्याप्त असा विरोध आहे.

ओबीसी समाजाचा विचार न करता मराठयाना कुणबी जातीचे प्रमाण पत्र देऊन ओबीसी प्रर्वगीतील समाजावर घाव घातला आहे. यांचा तिव्र निषेध करणया करिता कुणबी समाजाच्या विविध ठिकाणी सभा झाल्यात त्या सभांमध्ये निषेध नोंदविण्यात आला.

१० ऑक्टो.२०२५ रोजी होण्याऱ्या महामोर्चास कुणबी समाजाने समर्थन जाहीर केले. त्याच वेळी समाजातील सर्व घटकांत महामोर्चात मोर्चात संख्येने सहभाग घ्यावा, असे आव्हान सकल कुणबी समाजाचे अध्यक्ष पुरुषोत्तम शहाणे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

की शासनाने ०२/०९/२०२५ ला काढलेला जी आर मागे घ्यावा रद्द करावा अन्यथा संपूर्ण राज्यांमध्य कुणबी व ओ.बी.सी मोठे आंदोलन करतील अशी माहिती दिली. त्यावेळी उपस्थित कल्पना मानकर, विजया धोटे राजेश काकडे, समीर अरबट, अमित पिचकारे अशोक काकडे, अमोल हाडके उपस्थित होते.

## हश हेज कॅफेवर पोलिसांची धाड

**नागपूर :** अंबाझरी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर गोकुळपेठ परिसरात सुरू असलेल्या हश हेज कॅफेवर धाड टाकली. कारवाईच्या वेळी येथे मोठ्या संख्येत ग्राहक हुक्क्याचा धूर सोडताना आढळले. पोलिसांनी कॅफे संचालकांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

अभय मनोहर राठोड (२२) रा. रवीनगर, निशांत राजेश पाटील (२१) रा. प्रतापनगर आणि सामिन एकर धाबक (२०) अशी आरोपींची नावे आहेत. गोकुळपेठ मुख्य मार्गावर असलेल्या लक्ष्मीकृपा अपार्टमेंटमधील हश हेज कॅफेमध्ये अवैधरित्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती अंबाझरी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास पंचासह कॅफेवर धाड टाकली. यावेळी २९ ग्राहक वेगवेगळ्या टेबलवर बसून हुक्क्याचा धूर सोडताना आढळले.

## मेहंदीच्या रंगांमध्ये बहरतोय जागर शारदेचा
### खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्र नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित जागर शारदेचा रंग मेहंदीचा या उपक्रमाला नागपुरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. मेहंदीच्या रंगांनी बहरलेल्या या उत्सवात मेहंदी कलावंत व महिला उत्साहाने सहभागी होत आहेत.

संपूर्ण नागपुरात दि. १२ ऑक्टोबरपर्यंत अर्थात सात दिवस मेहंदी कलावंतांच्या कलाविष्कारातून आदिशक्तीचा हा जागर अनुभवता येणार आहे. यंदा शहरातील विविध भागांमध्ये ४५० ठिकाणांवर मेहंदी कलावंत सहभागी झाले आहेत. प्रत्येक मंडळामध्ये सर्व वयोगटातील महिला उत्साहाने सहभागी होत आहेत. लहान मुली देखील मेहंदी रंगवून घेत आहेत. उत्तर मंडळामध्ये महिलांनी करवाचौथच्या निमित्ताने मेहंदी रंगविण्याचा उपक्रम आयोजित केला. यामध्ये फॅन्सी ड्रेस, नृत्य, नाट्य आदी स्पर्धांचे आयोजन देखील महिलांनी केले.

गिनेस बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या प्रसिद्ध मेहंदी आर्टिस्ट सुनीता धोटे यांच्या टीममधील मेहंदी कलावंत विविध शारदोत्सव मंडळांमध्ये महिलांच्या हातावर मेहंदी रेखाटत आहेत.

विशेष म्हणजे प्रत्येक मंडळात मेहंदी रंगविण्यासाठी सहभागी होणाऱ्या महिला पारंपकिक वेशभुषेत येत आहेत. नवरात्रोत्सव संपल्यानंतरही या उपक्रमात महिला तेवढ्याच उत्साहाने आणि आनंदाने सहभागी होत आहेत.

उपक्रमाच्या संयोजक व खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या सदस्य मनिषा काशीकर यांच्यासह भाजपच्या नागपूर शहर महिला आघाडीच्या अध्यक्ष दिव्या धुर्डे, महामंत्री वंदना शर्मा, मनीषा अतकरे, डॉ. विशाखा जोशी, अनिता काशिकर, संपर्क मंत्री मोहिनी रामटेके व सहसंपर्क मंत्री स्वाती आखतकर सर्व मंडळांना भेटी देऊन महिलांचा उत्साह वाढवत आहेत.

**नितीन गडकरीची संकल्पना**

कला, साहित्य, संस्कृतीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने गडकरी यांनी ही संकल्पना मांडली. त्यानुसार दरवर्षी नित्यनेमाने हे आयोजन करण्यात येते. शेकडो मेहेंदी कलावंतांना या निमित्ताने आपली कला सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. याशिवाय अनेक तरुणी व महिलांनी यातूनच रोजगाराचा मार्गही निवडला.

# कोंढाळी नगरपंचायत स्थापनेच्या दोन वर्षांनंतर प्रथमच निवडणुकीचा मुहूर्त

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. ७ :



दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर कोंढाळी नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीचा मुहूर्त ठरला आहे. महाराष्ट्र शासनाने ९ ऑक्टोबर २०२३ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे कोंढाळी ग्रामपंचायतीला नगरपंचायत म्हणून मान्यता दिल्यानंतर जवळपास दोन वर्षांनी म्हणजे ऑक्टोबर २०२५ मध्ये या नव्या नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणात कोंढाळी नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद नागरी मागास प्रवर्ग (ना.मा.प्र.) या गटासाठी आरक्षित झाले आहे. यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांचे गणित बदलले असून स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना ऊत आला आहे.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ९ ऑक्टोबर २०२३ रोजी क्रमांक एमयुएन-२०२६/प्र.क्र.११२/नवि-१८ या अधिसूचनेद्वारे नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी ग्रामपंचायतीचे रूपांतर कोंढाळी नगरपंचायत मध्ये करण्यास मान्यता दिली होती.

ही अधिसूचना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३४१(अ) आणि अनुच्छेद २४३-थ यांच्या तरतुदींनुसार प्रसिद्ध करण्यात आली होती.

यापूर्वी दि. २१ जून २०२३ रोजी प्राथमिक उद्घोषणा प्रसिद्ध करण्यात आली होती, मात्र त्यावर कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्याने शासनाने अखेरीस कोंढाळीला संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून घोषित केले. १० ऑक्टोबर २०२३ पासून कोंढाळी नगरपंचायतीवर प्रशासक राज लागू झाले असून, प्रशासकिय अधिकारी धनंजय बोरीकर तर प्रशासक म्हणून डॉ. नरेंद्र बेंद्रे यांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार नगर विकास विभाग व राज्य निवडणूक आयोगाने संयुक्तपणे निवडणूक प्रक्रियेला वेग दिला आहे.

दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची राज्यस्तरीय सोडत काढण्यात आली. यातच कोंढाळी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद ना.मा.प्र. प्रवर्गासाठी निश्चित झाले.

दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी नगरपंचायत कार्यालयात काटोलचे उपविभागीय अधिकारी पियूष चिवंडे, मुख्य प्रशासक धनंजय बोरीकर व प्रशासक डॉ. नरेंद्र बेंद्रे यांच्या उपस्थितीत प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढण्यात आली. सदर कार्यक्रमाला स्थानिक जनप्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. २०११ च्या जनगणनेनुसार कोंढाळीची एकूण लोकसंख्या १३,८७७ इतकी होती. त्यापैकी अनुसूचित जातींची लोकसंख्या १,४५८ आणि अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४२३ इतकी आहे. सध्याच्या वाढत्या लोकसंख्या घनतेनुसार २०२५ मध्ये कोंढाळी ची लोकसंख्या सुमारे १६,००० च्या घरात पोहोचल्याचा अंदाज आहे. या लोकसंख्येच्या आधारे आरक्षणाचे प्रमाण ठरविण्यात आले असून, नगराध्यक्ष पद ना.मा.प्र. प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले आहे.

कोंढाळी नगरपंचायतीच्या स्थापनेनंतर येथे भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा),आप आप पक्ष तसेच मनसे, रिपाई आणि काही स्वराज्य संघटनांचे कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. नगराध्यक्ष पद ना.मा.प्र. प्रवर्गात गेल्याने काही अनुभवी उमेदवारांचे समीकरण बदलले असून, आता नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्रभाग आरक्षणात काही विभाग महिलांसाठी, तर काही अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव असल्याने स्थानिक राजकारणात नव्या गणितांना सुरुवात झाली आहे.

कोंढाळी नगरपंचायत ही नागपूर जिल्ह्यातील तसेच काटोल विधानसभा मतदारसंघात नव्याने गठीत झालेली एक महत्त्वाची शहरी संस्था ठरणार आहे. येथील औद्योगिक विकास, व्यापारी बाजारपेठ तसेच नागपूर-अमरावती महामार्गावरील भौगोलिक स्थान लक्षात घेता ही नगरपंचायत ग्रामीण-नागरी संक्रमणाचा आदर्श ठरू शकते.

## नगराध्यक्षपद ना.मा.प्र.साठी आरक्षित

**प्रभागनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित झाले आहे**

1 प्रभाग क्र. 1 - सर्व साधारण,
2 प्रभाग क्र. 2 - सर्व साधारण
3 प्रभाग क्र. 3 - अनु जाती
4 प्रभाग क्र. 4 - ना मा प्र महिला
5 प्रभाग क्र. 5 - नामाप्र महिला
6 प्रभाग क्र. 6 - सर्व साधारण
7 प्रभाग क्र. 7 - सर्व साधारण महिला,
8 प्रभाग क्र.8- सर्व साधारण महिला
9 प्रभाग क्र. 9 - अनु जाती महिला,
10 प्रभाग क्र. 10 - ना मा प्र
11 प्रभाग क्र. 11 - सर्व साधारण महिला
12 प्रभाग क्र. 12 - नामाप्र महिला
13 प्रभाग क्र. 13 - सर्व साधारण महिला
14 प्रभाग क्र. 14- सर्व साधारण
15 प्रभाग क्र. 15 - ना मा प्र
16 प्रभाग क्र. 16 - अनु जमाती महिला
17 प्रभाग क्र. 17 - सर्व साधारण

# नगरधनच्या उमराव कुस्ती तालीमच्या खेळाडूंनी ९ सुवर्ण पटकाविले



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ७ :

दि.४ ऑक्टोबर ला सुरेशभट सभागृह नागपूर येथे नागपूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा आंतरशालेय कुस्ती स्पर्धेत नगरधन येथील उमराव कुस्ती तालीम संघाच्या कुस्तीगीरांनी चमकदार कामगिरी केली. येथे सराव करणारे खेळाडू भवन्स स्कूल मौदा,स्व.इंदिरा गांधी विद्यालय,नगरधन व नंदीवर्धन उच्च माध्यमिक विद्यालय नगरधन येथील असून या सर्व पुरुष व महिला खेळाडूंना रामटेक कुस्ती संघाचे सहसचिव,राष्ट्रीय खेळाडू व पंच असलेले तालीमचे संचालक ईश्वर मेश्राम व उपाध्यक्ष निलेश दमाहे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. वय १४ वर्षाआतील मुलींच्या ३० कि.वजन गटात इशिका सावरकर प्रथम क्रमांक,५४ कि. वजन गटात यशस्वी ईश्वर मेश्राम प्रथम क्रमांक व मुलांच्या ३५कि.गटात हार्दिक कलाम शेख प्रथम क्रमांक ठरला. वय १७ वर्षाखालील मुलींच्या ४१ कि. गटात राणी रामदास निकुले प्रथम क्रमांक,४३कि.गटात गुंजन निलेश दमाहे प्रथम क्रमांक,४६ कि.गटात आरुषी महेंद्र मोहारे प्रथम क्रमांक,५३ कि.गटात हिमांशी नरेश मसुरके प्रथम क्रमांक,५७कि.वजन गटात हिना नरेश मसुरके प्रथम क्रमांक व ६५ कि.गटात संजना प्रवीण देशमुख प्रथम हिने क्रमांक पटकाविला.

# ज. नेहरु विद्यालय व क. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची रिले विभागीय स्पर्धेत निवड

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ७ :



येथील जवाहरलाल नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी रिले स्पर्धेत विजयी होऊन त्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेत निवड झाली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ क्रिडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हास्तर मैदानी स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील कृतीका गोडबोले, धनश्री चौधरी, समृद्धी बागडे, साधना शाहू यांनी ४०० बाय ४ रिले सामन्यात प्रथम क्रमांक प्राप्त करून विभागीय स्पर्धेत. आपले स्थान पक्के केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल व्हि.एस.पी.एम.अॅकेडमी ऑफ हायर एज्युकेशन संस्थेचे कार्यवाह युवराज चालखोर, प्राचार्य सचिन डेहनकर, मुख्याध्यापक विनोद देऊळकर, जिल्हा क्रिडा सचिव शरद सुर्यवंशी,तालुका क्रिडा सचिव उमेश चौरे, क्रिडा शिक्षक पंकज मानेकर , प्रणय भुयार, निर्मला टेकाडे, पंकज पाटिल, दिनेश निगुट, ज्योती मानकर, अमित गायधने, वर्षा घारपूरे,उषा पांगुळ, शुभांगी काळे, प्रीती रामटेके, वृषाली कोकाटे, शुभम शहारे, जयश्री चौधरी, जोत्सना गमे, पुजा ठाकरे, अश्विन बाभूळकर, विनोद भोंगाडे, केसरी राऊत आदींनी आभिनंदन केले.

## सरन्यायाधीश भुषण गवई यांच्यावरील वकिलाचा हल्ला जातीय व्देष भावनेतून
# सुलेखा कुंभारे यांनी केला निषेध

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ७ :

सुप्रीम कोर्ट हे देशाच्या लोकशाहीचा सर्वोच्च स्तंभ आहे. परंतु नुकत्याच घडलेल्या घटनेत आदरणीय सरन्यायाधीश भुषणजी गवई यांच्यावर जातीयवादी विचारसरणीच्या वकिलांनी बूट फेकण्याचा असभ्य व जातीय व्देष भावनेतुन जो निंदनीय प्रयत्न केला. त्याचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. ही घटना केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय न्यायव्यवस्थेच्या सन्मानावर व लोकशाहीच्या मूल्यांवर थेट आघात करणारी आहे. न्यायपीठ हे सर्वसामान्य जनतेसाठी न्यायाचा सर्वोच्च मंदिर आहे आणि अशा नीच कृत्यांनी त्याच्या पावित्र्यावर प्रश्न निर्माण होतो. आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि सरकार व संबंधित यंत्रणांना यांना विनंती करतो की, अशा असभ्य व जातीयतेच्या प्रेरणेने केलेल्या कृत्यांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी.

जनेकरुन भविष्यात कोणीही अशा प्रकारे देशातील न्यायालयाच्या प्रतिष्ठेवर आघात करण्याचे धाडस करू नये, यासाठी उदाहरणादाखल शिक्षा व्हावी. लोकशाही, समानता व सामाजिक बंधुत्व या मूल्यांचे रक्षण करणे आपली जबाबदारी आहे.

# नवीन डिझाइन, अपग्रेडेड इंटीरियर आणि आधुनिक वैशिष्ट्यांसह नवीन बोलेरो सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज बोलेरोची नवीन श्रेणी सादर केली. नवीन बोलेरोची किंमत 7.99 लाखांपासून (एक्स-शोरूम) सुरू होते तर नव्याने सादर केलेल्या टॉप-एंड इ8 प्रकाराची किंमत 9.69 लाख (एक्स-शोरूम) आहे. नवीन बोलेरो निओची किंमत 8.49 लाखांपासून (एक्स-शोरूम), आणि नवीन टॉप-एंड प्रकार ठ11 ची किंमत 9.99 लाख (एक्स-शोरूम) आहे. या लाँचसह, बोलेरो श्रेणी सौंदर्यशास्त्र, अधिक आरामदायी प्रवास आणि आधुनिक वैशिष्ट्यांसह तिचे आकर्षण कायम ठेवते आहे. 25 वर्षांचा वारसा आणि 16 लाखांहून अधिक समाधानी ग्राहकांसह, बोलेरो ही एक वैविध्यपूर्ण एसयूव्ही आहे. शहरातील गजबजलेल्या रस्त्यांपासून ते खडकाळ ग्रामीण लँडस्केपपर्यंत विविध भूप्रदेशांमध्ये तिचा वावर सहज असतो. कारण, कोणत्याही भूप्रदेशांत सहज अॅडजस्ट होईल अशी तिची अनुकूलता आहे. आणि यामुळेच ती ग्राहकांसाठी मौल्यवान आहे.

महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या ऑटोमोटिव्ह डिव्हिजनचे मुख्य कार्यकारी अधिकारी नलिनीकांत गोल्लागुंटा म्हणाले, काळाच्या कसोटीवर बोलेरोने स्वतःला सिद्ध केले आहे. त्यामुळेच 25 वर्षांहून अधिक काळ भारतातील सर्वात वैविध्यपूर्ण आणि मजबूत एसयूव्हींपैकी एक म्हणून तिने आपले स्थान निश्चित केले आहे. या चिरस्थायी वारशाच्या पायावर नवीन बोलेरो गतिमान आणि वेगाने विकसित होणाऱ्या नवीन भारताच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन केली गेली आहे.

# न्यू सुभेदार लेआउट येथे रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



अमर ज्योती सांस्कृतिक क्रीडा मंडळ तर्फे न्यू सुभेदार लेआउट येथील छत्रपती संभाजी महाराज (तारा ग्राउंड) येथे विजयादशमीनिमित्त भव्य रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी कार्यक्रमाला प्रामुख्याने माजी नगरसेवक व नागपूर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष दीपक कापसे, संत गजानन महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष स्वप्निल मोंढे, बिल्डर अनुराग रोटकर, सामाजिक कार्यकर्ते किशोर गीद, धनंजय बेलखोडे, संजय हरडे, संदीप काकडे, स्वप्निल मर्जी, राहुल निरडकर, अमर ज्योती क्रीडा मंडळाचे अध्यक्ष शंतनु दीपक कापसे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्तीक सिरसाट, रौनक मेंढे, तंमय डाहारे, साहील सावरकर, सक्षम पडोळे, सार्थक लिंगे, आशुतोष खनोरकर, श्याम आकनपल्लीवार, नविन खडसे, यश जगताप, अनिरूद अंधारे, कस्तुब हरडे, पवन तलमले, राम वांदिले, आदीत्य अंधारे निवृत्ती वाणकर, राम आकनपल्लीवार, वेदांत सोनभद्रे, यश कुर्वे, सौरभ लहरिया, ललीत नासरे, सुजल मानमोडे, निखील ढोले, उदीत परमार, क्षितीज आडे, कुनाल सहस्त्रबुधे,उमंग वाटकर, प्रज्वल वाघमारे, अमीत गाडगे, अमोल रहाटे, विपीन चौधरी, मोणु चौधरी, शुभम सकस, एलेक्स तागडे,आयुष वाटकर, संचित कापसे, हर्ष खडसे, अनिकेत भोगे, प्रजय मण्डपे आदींनी अथक प्रयत्न घेतले.

# रिपब्लिकन पक्ष खोरीपाचे राष्ट्रीय अधिवेशन वैचारिक क्रांतीने दुमदुमले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :



मंगळवार क्रांतीभूमी, दिक्षाभूमीनगरी नागपूर येथील गुरुनानक भवन, राममनोहर लोहिया वाचनालय जवळ अशोक नगर, इंदोरा, उत्तर नागपूर येथे रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे राष्ट्रीय अधिवेशन वैचारिक क्रांतीने दुमदुमले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र, राज्यसभेचे माजी उपसभापती तथा रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस दिवंगत नेते बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते.

याअधिवेशनाची सुरुवात रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) चे राष्ट्रीय अध्यक्ष देशकजी खोब्रागडे यांचे हस्ते झेंडावंदन करून तसेच प पू डॉ बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे, तसेच माजी आमदार उपेंद्र शेंडे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. अधिवेशनाच्या सुरुवातीला बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात व सहवासात काम केलेले रिपब्लिकन नेते दिवंगत मारोतराव कांबळे यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. विदर्भ प्रदेश अध्यक्ष सी पी रामटेके यांनी स्वागताध्यक्ष म्हणून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. एन व्ही ढोके यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सत्रात देशातील वर्तमान राजकीय परिस्थिती आव्हाने व उपाययोजना या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून पक्षाचे प्रवक्ते प्रशिक आनंद , महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे, प्रा मुकुंद मेश्राम, डॉ विनायक गणवीर अध्यक्ष, नागपूर प्रदेश यांनी देशातील विद्यमान राजकीय परिस्थितीवर परखड विचार मांडले. त्यानंतर दुसऱ्या सत्रात रिपब्लिकन चळवळीत महिला, युवक, विद्यार्थी यांचा सहभाग काळाची गरज या विषयावरील परिसंवादात वक्ते म्हणून प्रकाश तारु अध्यक्ष रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन, महाराष्ट्र प्रदेश,आयु गच्चे अध्यक्ष, मराठवाडा प्रदेश, संघमित्रा खोब्रागडे, चंद्रपूर यांनी आपले विचार मांडले.

## मनपातर्फे महर्षि वाल्मिकी यांना विनम्र अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने रामायणाचे रचयते महर्षि वाल्मिकी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील महर्षि वाल्मिकी यांच्या तैलचित्राला मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपायुक्त राजेश भगत, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, अमोल तपासे यांच्यासह सर्वश्री शैलेश जांभूळकर, सुरेश शिवणकर, गजानन जाधव, अतुल महतो, अरुण तुर्केल, अतिश मेश्राम, प्रशिक ठवरे, मनोज सांगोळे, विशांत पिपरे, विशाल गडपायले, अशोक वानखेडे, विशाल मेहता उपस्थित होते.

# आम आदमी पार्टीच्या वतीने महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :



आम आदमी पार्टी, प्रभाग क्रमांक 5 नागपूर शहराच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व पुर्व प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांची जयंती गांधी चौक, विनोबा भावे नगर, नागपूर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. आम आदमी पक्षाचे प्रभाग सचिव अनिल संभे यांच्या शुभहस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलि वाहण्यात आली.

राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी सत्याग्रह आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न केला.तर देशाचे दुसरे पंतप्रधान असलेल्या लाल बहादूर शास्त्री यांनी "जय जवान जय किसान" चा नारा दिला. त्यांनी भारताच्या अन्न सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलि वाहण्यात आली. महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या आदर्शांचा गौरव करणे आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करणे. त्यांच्या जीवन आणि कार्यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळते आणि त्यांना राष्ट्रसेवेच्या भावनेतून कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

यावेळी प्रदिप पौनिकर, किसन निमजे, विजय नंदनवार, चेतन निखारे,अनिल संभे, हेमराज कुंभारे, संजय मोरे, संजू पटले,चेतन सोनकुसरे व आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफी द्या : राहुल गांधींना धमकी देणाऱ्यावर कारवाई करा
# सावनेर तालुका काँग्रेस व युवक काँग्रेसकडून पोलीस स्टेशनला निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ७ :



महाराष्ट्र राज्यात यंदा झालेल्या अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांची खरीप हंगामाची वाटचाल बिकट झाली आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी हताश व उध्वस्त झालेले आहेत. त्यांना तात्काळ आर्थिक मदत व कर्जमाफीची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर आज सावनेर तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदार सावनेर यांना निवेदन देण्यात आले.

हे निवेदन माजी मंत्री सुनील केदार यांच्या निर्देशानुसार तहसीलदारांना देण्यात आले असून त्यात शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नावर सरकारने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी सरकारवर टीका करताना सांगितले की, "राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा समजून घेत नाही. दिवसरात्र मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील आसवे पुसण्याची जबाबदारी ही सत्ताधाऱ्यांची आहे, मात्र त्यांच्याकडून फक्त आश्वासनांची खेळखंडोबा सुरू आहे.

कॉंग्रेस कमिटीने आपल्या निवेदनात सांगितले की, "शेतकऱ्यांवर प्रचंड कर्जाचा डोंगर आहे. ओल्या दुष्काळामुळे ते कर्जफेडीच्या स्थितीत नाहीत. त्यामुळे सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांची आत्महत्या रोखता येणार नाही."

याच दिवशी कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी सावनेर पोलीस स्टेशन येथेही एक निवेदन दिले. यात भाजपाचे कार्यकर्ते पिंटू महादेवम यांनी लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे गंभीर प्रकरण मांडले. कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी हे कृत्य लोकशाहीविरोधी असल्याचे सांगून संताप व्यक्त केला. "अशा धमक्या देऊन लोकशाहीच्या आवाजाला गप्प करण्याचा प्रयत्न होत आहे. हे सहन केले जाणार नाही. पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी," अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

या निवेदन प्रसंगी कॉंग्रेस नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात विशेषतः शेषराव रहाटे,बैजनाथ डोंगरे,जानराव केदार, प्रकाश खापरे ,सभापती रवींद्र चिखले,गोविंदाजी ठाकरे, कपिल वानखेड़े, प्रकाश पराते, गणेश काकड़े, कॉंगेस नेते राजेश खंगारे, माजी नगराध्यक्ष पवन जैस्वाल, अनिल राय, सतीश केदार, दीपक दलाल, अशोक डवरे, प्रवीण झाडे, सुभाष राहटे, कॉंगेस नेते मनोज बसवार, तेली समाज पंचकमेटी चे अध्यक्ष गोपाल घटे, सुरेश केने, अमोल केने, हेमंत सोरमारे, ईश्वर घोड़मारे आदींसह असंख्य कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या सर्वांनी एकमुखाने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढा देण्याची व राहुल गांधींवरील धमकीविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची तयारी व्यक्त केली.

कार्यकर्त्यांनी शेवटी इशारा दिला की, "जर राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय दिला नाही आणि प्रशासनाने राहुल गांधींना धमकी देणाऱ्यावर कठोर कारवाई केली नाही, तर पुढील काळात कॉंग्रेस रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलन छेडेल. जबाबदारी ही सत्ताधाऱ्यांवर असेल.

# भाजपचा गड मानला जाणाऱ्या वाडीत काँग्रेस-राष्ट्रवादीचा कस लागणार?

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. निवडणूक आयोगाने २४७ नगरपरिषदांच्या आरक्षणाची यादी जाहीर केली असून, त्यानुसार वाडी नगरपरिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण (खुला) प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे वाडीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. हिंगणा विधानसभा मतदारसंघाचे तीन टर्मचे आमदार समीर मेघे (भाजप) यांच्या प्रभावक्षेत्रात वानाडोंगरी, डिगडोह-देवी, बुटीबोरी, वाडी या मोठ्या टाऊनशिप नगरपरिषदा तसेच नीलडोह आणि गोधणी (रेल्वे) या नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतींचा समावेश आहे. या भागात मतदार पारंपरिकपणे भाजपसोबत राहिला असला, तरी वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) भाजपला कडवे आव्हान देण्याच्या तयारीत आहेत.



नागपूर तालुका वार्तापत्र
अरुण कराळे

मागील दहा वर्षांपूर्वी झालेल्या वाडी नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्षपद अडीच वर्षे अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी आणि उर्वरित अडीच वर्षे खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित होते. त्यानंतर पाच वर्षांपासून नगरपरिषदेवर प्रशासक राज सुरू आहे. त्यामुळे या वेळची निवडणूक वाडीकरांसाठी विशेष महत्त्वाची ठरणार आहे. खुल्या प्रवर्गाचे आरक्षण मिळाल्याने ओबीसी समाजात समाधान व्यक्त होत असून, इच्छुक उमेदवारांमध्ये चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. संभाव्य उमेदवारामध्ये भाजप कडे नरेश चरडे, आनंदबाबू कदम, केशव बांदरे, कैलाश मंथापूरवार, गोविंदराव रोडे,कॉंग्रेस कडे दुर्योधन ढोणे, प्रकाश कोकाटे, अश्विन बैस,राजेश थोराणे, शिवसेना (ठाकरे गट )कडे हर्षल काकडे, मधु माणके पाटील, रुपेश झाडे , शिवसेना ( शिंदे गट ) संजय अनासाने, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) कडे राजेश जयस्वाल, प्रेम झाडे, वसंतराव ईखनकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) कडे संतोष नरवाडे, अमीत हुसनापूरे ,वंचित बहुजन आघाडीकडे दिनेश बन्सोड,बहुजन समाज पार्टी (बसपा) कडे नरेंद्र मेंढे हे तगडे उमेदवार दावेदार आहे. राजकीय समीकरणांच्या हालचालींनुसार महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही आघाड्या आपापल्या पद्धतीने एकत्र लढण्याच्या चर्चेत आहेत. त्यामुळे कोण सत्तेची खुर्ची मिळवणार, याकडे वाडीकरांचे डोळे लागले आहेत. नागपूर ग्रामीण पंचायत समीती वर यापूर्वी कॉंग्रेसची सत्ता होती. कॉंग्रेसचे ६ , भाजपा ४, राष्ट्रवादी १, वंचित १ सदस्य निवडून आले होते.

सुरवातीचे तीन वर्ष द्रुगधामनातील रहीवाशी रेखाताई वरठी या नागपूर पंचायत समीतीच्या सभापती होत्या. नंतरचे दोन वर्ष गोधणी ( रेल्वे ) च्या रुपाली मनोहर या नागपूर पंचायत समीतीच्या सभापती होत्या. या निवडणूकीत पंचायत समीती प्रत्येक पक्ष आपल्या ताब्यात घेण्यासाठी आतापासुन कंबर कसने सुरु केली आहे. ■ ■

# वाडीतील स्मशानभुमीतील समस्या सोडवा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ७ :

टेकडीवाडी व आंबेडकर नगर स्मशानभुमीत स्वच्छतेचा अभावा सोबत समस्याचा महापूर असुन दोन्ही ठिकाणी सोई सुविधांचा अभाव आहे. अशा आशयाचे निवेदन भाजपा वाडी मंडळातर्फे बाधकाम अभियंता नितेश घोरमाडे यांना मुख्याधिकारी ऋचा धाबर्डे यांचे वतीने देण्यात आले. वाडी नगर परिषद अंतर्गत टेकडी वाडी आणि आंबेडकर नगर अशी दोन स्मशान घाट आहेत परंतु दोन्ही ठीकाणी सोई सुविधांचा अभाव दिसुन येतो दोन पाण्याची मशीन आहे परंतु त्यात पाणीच राहत नाही.

शौचालय व मुत्रीघर आहे परंतु स्वच्छता नाही, श्रद्धांजली भवन आहे परंतु बसण्याकरीता सभागृहात खुर्च्या नाही, श्रद्धांजली देण्याकरीता सोयीकरची व्यवस्था नाही, टेकडी वाडी येथील स्मशान घाट येथे कधी कधी ५ ते ६ प्रेत येतात अशा वेळी उघड्यावर अंतिम संस्कार करावे लागतात पावसाळ्यात प्रेत ओली होतात प्रेताला अग्नि दिल्यानंतर पाण्याची प्रदक्षिणा मारावला जागाच नाही.

यापूर्वी सुद्धा अनेक निवेदने देण्यात आले वसंत विहार येथे छट पुजेकरीता गट्टू लावणे,नवनीत नगर येथील सेफ्टी टँक सफाई करणे, कोहळे लेआऊट येथील जोडरस्ता बांधकाम,मंगलधाम सोसायटी येथील मैदानात हायमास्ट लाईट लावणे, शिवाजी नगर येथे सिवर लाईन चे काम व भूमीगत नाली बांधकाम, वैष्णव माता नगर,शाहु लेआऊट, कोहळे लेआऊट, गुरूप्रसाद नगरची मलवाहनी बांधकाम,विकास नगर व स्मृति नगर लेआऊट या ठिकाणचे नालीचे चेंबर बांधणे आदी मागण्या निवेदनातुन देण्यात आल्या.

यावेळी माजी उपसरपंच आनंदबाबू कदम, जिल्हा उपाध्यक्षा सरीता यादव,राजुताई भोले, अनुजाती मोर्चा जिल्हा महामंत्री दिनेश कोचे, वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, महीला आघाडी वाडी मंडळ अध्यक्षा कल्पना सगदेव, ओबीसी महिला आघाडी मंडळ अध्यक्षा ज्योती भोरकर, उर्मिला चौरसीया, मंगला पडोळे, पुष्पा क्षिरसागर, कमलाकर ईंगळे, मंडळ युवा मोर्चा जिल्हा मंत्री अक्षय तिडके, जयंत वैद्य, ज्ञानेश्वर गावंडे, दत्ता बाबर, शंकर कडू,लिलाधर भोयर,अनील भाटीया,संजय केचे,राहुल तायडे, प्रकाश मोगरकर, डॉ.प्रकाश जोशी पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.


भाजपाचे मुख्याधिकारी यांना निवेदन

## पी.ए फाऊंडेशन तर्फे चित्रकार मनिष रामटेके यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

पी. एफाउंडेशन तर्फे चित्रकार मनीष रामटेके यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक खासदार श्यामकुमार बर्वे, रामटेक लोकसभा मतदार संघ, मान. रश्मि बर्वे, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद नागपूर, कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार नितिन राऊत, माजी मंत्री , सुमेधा राऊत, प्रमुख अतिथि धनंजय वंजारी, आय आर एस, इंकम टॅक्स डिपार्टमेंट, नागपूर, सखाराम मंडपे, माजी मुख्याध्यापक, सुकेसिनी लोखंडे, पोलिस निरीक्षक, सी.बी.आय. नागपूर, सिद्धार्थ गायकवाड, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण नागपूर, प्रीती प्रधाने, सामाजिक कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# पाच दशकापासुन भिक्खु संघास भोजनदान



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ७ :

दीक्षाभूमी येथे येणाऱ्या भीक्खु संघाची कुठलीही व्यवस्था नाही याची खंत नजरेसमोर ठेवून कामठी येथील बिडी कामगार महिला नी एकत्रित येऊन वाटी भर पिठ, तांदूळ, तेल व चार आणे, आठआणे एक रुपया असा गोळा करून पाच दशकांपासून भीक्खु संघास भोजन वाटप कामठी येथील बौद्ध उपासिका संघाने सुरू केले आहे. महामायावती महिला उपासिका संस्थाच्या वतीने लाभलेल्या सहकायार्तुन हजारोंच्या घरात जमा होणारी वर्गणी आता लाखोंच्या घरात येऊन पोहोचली आहे.

उपासिका वंचळा गजभिये, सुलका बोरकर , गोपिक मेश्राम, जसु पाटील, जुना बोरकर ,कचराबाई आळे, तुळसा मेश्राम , सीता मेश्राम, चद्रभागा रामटेके, कृष्णा भिवगडे , सर्वस्वता रामटेके, सत्यफुला वाहाणे, सारु चव्हाण, यमुना शेंडे, जाई बनसोड आदींच्या सहाय्याने हा उपक्रम दीक्षाभूमी वर अल्प प्रमाणात होता. भीक्खु संघा व्यतिरिक्त बाहेर गावाहुन येणाऱ्या लोकांना देखील मदत करण्यासाठी पुढे येत या महिलांनी गावखेड्यात व वस्त्या मध्ये फिरून वर्गणी गोळा करून हजारो च्या घरात असलेल्या ह्या उपक्रमाचे रूपांतर लोकसहभागातून लाखो रुपयांचे झाले आहे. आज तिसऱ्या पिढीतील महिला या उपक्रमाचे आयोजन करत असून महिलांना मोठ्या प्रमाणात सभासद बनविले आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या एकत्रित सहभागातून हजारो भीक्खु आणि लाखो नागरिकांना सतत पाच दिवस भोजन दान देण्यात येत असून या सर्व वाटचालीत माहामाया महिला सेवा संस्था च्या कविता रामटेके, वंदना कांबळे, उर्मिला ऊके लक्ष्मी गजभिये, कविता ढोके, जिजाबाई मेश्राम, गिरजाबाई रामटेके सह शेकडो महिला सभासद सहभागी असून मार्गदर्शक भदन्त नाग दिपंकर महास्थविर यांच्या मार्गदर्शनात व व्यवस्थापन सहायक म्हणून अनिल मेश्राम, राजेश ढोके , बुद्धरतन ऊके प्रकाश गजभिये सह इतरांच्या मदतीने यशस्वी कार्य केले आहे.

# टोल नाका माथनी येथे मौदा काँग्रेस पक्षातर्फे निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. ७ :

टोल नाका माथनी येथे काँग्रेसव पक्ष मौदा तर्फे स्थानिक नागरिकांच्या हक्कांसाठी निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात स्थानिक जनतेशी संबंधित अनेक गंभीर तक्रारी मांडण्यात आल्या असून, त्यावर त्वरीत कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षातर्फे निवेदनात प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. स्थानिक नागरिकांचे मासिक पासेस पूर्वीप्रमाणेच लागू करण्यात यावेत. स्थानिक ट्रक चालक व मालकांकडून अवैधरित्या करण्यात येणारी वसुली तात्काळ थांबवावी तसेच त्यांना पथकरात सवलत देण्यात यावी. ओव्हरलोडच्या नावाखाली घेतली जाणारी अवैध वसुली तात्काळ बंद करावी. टोल प्लाझावर सुरुवातीपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना बोर्ड दरानुसार वेतन देण्यात यावे.




राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व शासन निर्णयानुसार सर्व नियम काटेकोरपणे लागू करण्यात यावेत. जे कर्मचारी सुरुवातीपासून टोल प्लाझावर कार्यरत आहेत, त्यांना नोकरीत कायम ठेवण्यात यावे. टोल प्लाझा परिसरातील अनधिकृत अतिक्रमण तात्काळ दूर करण्यात यावे. महामार्गावरील सर्विस रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी. टोल सुरू झाल्यापासून काम करणाऱ्या कामगारांचे वेतन कमी करण्यात आले असून, पूर्वी २०,००० रुपये मिळणाऱ्या कामगारांना आता केवळ १०,००० रुपये देण्यात येत आहेत, तसेच त्यांच्याकडून १२ तास काम करवून घेण्यात येत आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य मा. देवेंद्र गोडबोले यांनी या सर्व मागण्यांवर ठोस निर्णय घेण्याचे टोल प्रशासनाला आवाहन केले असून, मागण्या १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण न झाल्यास, १३ ऑक्टोबर रोजी माजी मंत्री सुनील केदार, खासदार श्यामकुमार बरवे, देवेंद्र गोडबोले, राजाभाऊ तिडके, अनुराग भोयर तसेच काँग्रेस कमिटी मौदा तालुका, युवक काँग्रेस मौदा आणि तालुक्यातील जनतेच्या वतीने भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी स्थानिक प्रशासन व टोल प्लाझा माथनी व्यवस्थापनावर राहील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

निवेंदन देता वेळी माजी जिल्हापरिषद सदस्य देवेंद्र गोडबोले, महाराष्ट्र काँग्रेस महासचिव राजाभाऊ तिडके, महाराष्ट्र युवक महासचिव अनुराग भोयर, काँग्रेस तालुका अध्यक्ष ध्यानेश्वर वानखेडे, माजी उपनगराध्य राजेश निनावे, गटनेते किशोर संडेल, नगरसेवक शुभम तिघरे, माजी युवक तालुकाध्यक्ष विक्की साठवणे, युवक शहराध्यक्ष जितू साठवणे, बाजारसमिती सभापती राजेश ठवकर, युवक तालुकाध्यक्ष धीरज ठोंबरे, कामठी विधानसभा महासचिव अमय छेडगे, सचिन काळमेघ, नितेश सुपारे, प्रशांत तिजारे, मनीष नेगी, युवक उपशहराधक्स अमर घोडमारे, सरपंच महेश कलरे, किशोर कानफाडे, शुभम तिघरे, कृष्ण अवतारे, जितू गोडबोले, शुभम बावनगडे, अंकुर सुपारे, सूरज बोरकर, शुभम चेगडे, चेतन गोडबोले, मनोज लारोकर,चेतन धनजोडे समस्त काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते..

## आरपीएफने केले बेपर्वा बॅगमधून मद्य जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

ऑपरेशन सतर्क अंतर्गत आरपीएफ नागपूरच्या नार्को टीमने एक विशेष सतर्कता मोहीम राबवली. सकाळी 11:45 वाजता ट्रेन क्र. 12626 केरळ एक्सप्रेस प्लेटफॉर्म क्र. 2 वर येताना, आरक्षक लूनाराम टाक यांनी पहारा ड्युटी दरम्यान दुसऱ्या जनरल कोचच्या मागे एक बेपर्वा तपकिरी रंगाचा ट्रॉली बॅग पाहिला. जवळ असलेल्या प्रवाशांकडून चौकशी केली असता, कोणालाही त्या बॅगचे मालकी हक्क स्वीकारले नाहीत.

बॅग सीसीटीव्ही निरीक्षणाखाली तपासणीसाठी आरपीएफ पोस्ट नागपूरकडे आणले गेले. बॅग उघडल्यानंतर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मद्य आढळले. जप्त केलेल्या वस्तूंमध्ये 17 बाटल्या 100 PIPERS WHISKY (प्रत्येक 750 मिली) होत्या ज्यांची एकूण अंदाजे किंमत 46,410/- होती. या विदेशी मद्याच्या बाटल्या आदित्य पाटील यांच्या देखरेखीखाली फ्लायिंग स्क्वॉड कर्मचाऱ्यांना सुपूर्द करण्यात आल्या. पुढील तपासासाठी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हा यशस्वी कारवाई आरपीएफ नागपूरच्या सातत्यपूर्ण सतर्कतेचे आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी असलेल्या समर्पणाचे उदाहरण आहे.

# फोनपेने कार्ड पेमेंट्ससाठी इंटिग्रेटेड सुविधा असलेला नेक्स्ट-जेन स्मार्टस्पीकर सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

फोनपेने आज ग्लोबल फिनटेक फेस्ट 2025 मध्ये फोनपे स्मार्टपॉड हा आपला नेक्स्ट-जेन स्मार्टस्पीकर सादर केला. व्यापारी आणि ग्राहक या दोघांच्या बदलत्या पेमेंट गरजा लक्षात घेऊन हे नवीन हायब्रिड डिव्हाइस डिझाइन केले आहे.

उद्योगाशी संबंधित या कार्यक्रमात झालेल्या लाँचमुळे भारतीय व्यापाऱ्यांसाठी व्यावहारिक उपाययोजना विकसित करण्याच्या फोनपेची बांधिलकी अधोरेखित झाली आहे. स्मार्टस्पीकर आणि पारंपरिक पॉइंट ऑफ सेल (पीओएस) डिव्हाइसच्या सर्वोत्तम वैशिष्ट्यांची सांगड घालणारे भारतात तयार केलेले स्मार्टपॉड हे फोनपेचे पहिले असे सोल्यूशन आहे. या माध्यमातून व्यापाऱ्यांना एकाच किफायतशीर उपकरणात दोन्ही सुविधा मिळणार आहेत.




लाँचबद्दल बोलताना फोनपेच्या मर्चंट बिझनेसचे चीफ बिझनेस ऑफिसर युवराज सिंग शेखावत म्हणाले, ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्मार्टपॉड सादर करताना आम्हाला आनंद होत आहे.

आमच्या आधीच्या स्मार्टस्पीकरमुळे क्युआर कोडवर आधारित पेमेंट स्वीकारणे अधिक विश्वासार्ह आणि सुरळीतपणे होत होते. आता स्मार्टपॉड या किफायतशीर उपकरणाद्वारे कार्ड पेमेंट स्वीकारण्याची सुविधा देऊन पुढचे पाऊल टाकण्यात आले आहे. विशेषतः सर्व प्रकारचे डिजिटल पेमेंट्स परवडणाऱ्या पद्धतीने स्वीकारू इच्छिणाऱ्या छोटे व्यापाऱ्यांसाठी हे उत्तम अपग्रेड आहे.

## सेवाभाव, आरोग्य जागरूकता आणि जीवनमूल्ये यांना प्रोत्साहन देणारी
# आरसीएम रूपांतरण यात्रा नागपूरला पोहोचणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

भारतातील आघाडीची डायरेक्ट सेलिंग कंपनी आरसीएम त्यांच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त १३ ऑक्टोबर रोजी नागपूर, महाराष्ट्र येथे रूपांतरण यात्रा घेऊन येत आहे. ही यात्रा स्थानिक समुदायांसाठी नवीन उपजीविकेच्या संधी आणि अधिक स्वावलंबनाचे दरवाजे उघडेल आणि त्याचबरोबर महिला उद्योजक, युवा नेते आणि समुदायातील बदल घडवणाऱ्यांच्या वास्तविक जीवनातील कथा दाखवेल.

१०० दिवसांचा, १७,००० किमीचा हा देशव्यापी प्रवास ७५ शहरांना भेट देईल आणि २५ भव्य उत्सवांचे आयोजन करेल, ज्यामध्ये आरोग्य (आरोग्य), सेवा (सेवा) आणि संस्कार (मूल्ये) यांचा संदेश पसरवला जाईल. ही मोहीम आरसीएमच्या दृष्टिकोनाला बळकटी देते की ती केवळ थेट विक्रीमध्येच नाही तर लोककेंद्रित आणि मूल्यांवर आधारित चळवळ आहे.

नागपूरमधील रहिवासी आरसीएमच्या विविध उत्पादन श्रेणीचा अनुभव घेतील, अनोख्या संधी शोधतील आणि ही लोककेंद्रित चळवळ संपूर्ण भारतातील जीवन कसे सकारात्मकरित्या बदलत आहे हे प्रत्यक्ष पाहतील. २००० मध्ये स्थापन झाल्यापासून, आरसीएमने हजारो यशोगाथा - गृहिणी, निवृत्त व्यावसायिक, तरुण आणि अगदी मद्यपानावर मात करणाऱ्या व्यक्तींना - समग्र यश मिळविण्यासाठी आणि सन्मानाने त्यांचे जीवन पुनर्बांधणी करण्यासाठी सक्षम बनवले आहे.

आरसीएमच्या २५ वर्षांच्या प्रवासाचे स्मरण करणारा नागपूरमधील हा भव्य कार्यक्रम इंदोरा क्रीडांगण, नारा रोड, इंदोरा, नागपूर, महाराष्ट्र येथे आयोजित केला जाईल, ज्यामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

हा कार्यक्रम दोन भागात आयोजित केला जाईल - सकाळी आरोग्य आणि सेवांशी संबंधित उपक्रम, त्यानंतर संध्याकाळी उत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रम. संपूर्ण आरसीएम अनुभव देण्यासाठी, रूपांतरण मेळा (मेळा) देखील आयोजित केला जाईल. पाहुण्यांना आरसीएमच्या विस्तृत पोर्टफोलिओचा अनुभव इंटरॅक्टिव्ह बूथद्वारे घेता येईल, ज्यामध्ये न्यूट्रिचार्ज आणि गामा उत्पादन लाइन असलेले हेल्थ झोन आणि महिलांचे कपडे आणि पादत्राणे प्रदर्शित करणारे कीसोल पॅव्हेलियन यांचा समावेश आहे.

फूड कोर्टमध्ये आरसीएमच्या स्वेच्छा आणि गुड डॉट ब्रँडसह विविध प्रकारचे निरोगी आणि स्वादिष्ट पदार्थ देखील दिले जातील. एक विशेष रक्तदान शिबिर देखील आयोजित केले जाईल.

# सावनेर येथे महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ७ :

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखिल भारतीय सफाई मजदुर संघटना शाखा सावनेर वतीने बसवार लेआउट येथील संघटनेचे कार्यालय येथे श्रीसंत महर्षी वाल्मिकि यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सफाई कामगारांनी फोटो ची पुजा अर्चना व माल्यार्पण नंतर मिठाई चे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी व्हाईस ऑफ मिडिया संघटनेचे अध्यक्ष सुधाकर बागडे होते तर यावेळी रेखा मतेल, अनीता वाघमारे, शीतल नकाशे, दिक्षा गिरगुसे, सुरेश मधुमटके, सतीश मधुमटके , दुर्गेश नहरकर महेश वाघमारे किशोर चनेलिया, पप्पू सफेला रेखा मतेल दादाजी बरिसल आशीष नकाशे यांच्या सह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. कार्यकमाचे अध्यक्ष सचीन लिडर यांनी प्रास्ताविक केले संचालन दशरथ मतेल व आभार प्रदर्शन आशीष नकाशे यांनी मानले.

# डॉ. निलय हांडे यांना एमएस सिग्नेचर इंटरनॅशनल अवॉर्ड्स

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ७ :

एमएस सिग्नेचर इंटरनॅशनल अवॉर्ड्स २०२५ अंतर्गत रामटेक येथील नामवंत अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. निलय हांडे यांना "अर्कॅडमिक एक्सलन्स अँड एक्स्ट्राऑर्डिनरी स्किल्स इन द फील्ड ऑफ ऑर्थोपेडिक्स" या पुरस्काराने गौरविण्यात आले.

डॉ. हांडे हे कंसल्टंट ऑर्थोपेडिशियन, ओजोन थेरेपी, मिरास (मिनिमली इन्व्हेसिव्ह रिडक्शन ऑस्टिओसिंथेसिस) या नव्या इटालियन तंत्रज्ञानाचे भारतात प्रसारक असून, व्हीमस हॉस्पिटल, ओजस व शांताराम ऑर्थो हॉस्पिटल यांचे संचालक आहेत.

त्यांना हा सन्मान अस्थिरोग शास्त्रातील शैक्षणिक प्रावीण्यासाठी, अत्यंत परवडणाऱ्या किमतीत सांधेरोपण शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यासाठी, सामाजिक कार्यातील निष्ठा, पुरातत्त्व व इतिहासातील अभ्यासाची आवड, ग्रामीण व वंचित समाजाला दर्जेदार आरोग्यसेवा पुरविण्याच्या नेतृत्वक्षमतेसाठी देण्यात आला.



समारंभात यूएसए बोस्टनची डॉ. लॉरी फ्रीड गर्ग, आस्क एंड गेट सोलुशन चे संस्थापक अध्यक्ष हिमांशु वर्मा, भारत सरकार आरोग्य मंत्रालय चे माजी कमिशनर डॉ.हिमांशु भुषण व इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. निलय हांडे यांना जागतिक सम्मान मिळाल्या बद्दल त्यांच्या चाहत्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नवीन बिडीपेठमध्ये रंगला खडीगंमत महोत्सव



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

वैभव सांस्कृतिक कला मंडळ, नागपूरच्यावतिने विजयादशमी, म. गांधी जयंती तसेच नवरात्रीचे औचित्य साधून नवीन बिडीपेठ परिसरात खडीगंमत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

नागपूर येथील तुर्रा निशाणचे निनाद बागडे आणि भंडारा जिल्ह्याच्या लाखांदुर येथील पंचशिल निशाणच्या श्रीदेवी बनकर यांच्यात दुय्यम सामना रंगला. सुनीलभाऊ राऊत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शाहीर कलावंत नरेश बावणे, रमेश बांते, संतोष खडसे, अविनाश ठाकरे, दीपक दहीकर, नरेश चव्हाण, संजय वाकडे, संजय मेश्राम, ज्ञानेश्वर पाटील, अरूण बन्सोड, रामेश्वपर मेश्राम, रविंद्र अंबादे, ईशुलाल वाघाडे, गौतमकुमार वानखेडे, प्रदिप वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.

स्त्री भृण हत्या, मोबाईलचे दुष्परिणाम, स्वच्छ भारत अशा अनेक विषयांवर खडगंमतच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमात सहभागी शाहीर आणि त्यातील कलावंत, वादक यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

# डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा अभूतपूर्व सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

ज्येष्ठ कवी, साहित्यिक, संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या वयाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर, माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ गिरीश गांधी सह अध्यक्ष असलेल्या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी अमृत महोत्सवी सत्कार समितीतर्फे डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम शनिवार, ११ ऑक्टोबर रोजी, व्हीआयपी रोडवरील वनामती, वसंतराव नाईक स्मृती सभागृह येथे डॉ.शरद निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेला आहे. मुख्य सत्कार सोहळ सायं. ५.४५ वा. होणार असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे दृकश्राव्य संदेशाद्वारे मनोगत व्यक्त होईल. या प्रसंगी मराठी भाषा मंत्री उदय सामंत,



माजी मंत्री डॉ नितीन राऊत व ज्येष्ठ संपादक आणि माजी राज्यसभा खासदार कुमार केतकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ रावसाहेब कसबे, ज्येष्ठ समाजवादी नेते रघू ठाकूर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष प्रा वसंत आबाजी डहाके, डॉ. श्रीपाल सबनीस आणि उत्तम कांबळे, तसेच ज्येष्ठ लेखक, समीक्षक डॉ. वि.स. जोग, ख्यातकीर्त वैद्यकीय शिक्षण तज्ज्ञ डॉ वेदप्रकाश मिश्रा आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी हे उपस्थित असतील.

मुख्य सत्कार सोहळ्याच्या अगोदर, प्रमोद भुसारी यांची संकल्पना व दिग्दर्शन असलेली डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांची प्रकट मुलाखत, दुपारी ४ वाजता नाट्यमय अभिरूप न्यायालय स्वरूपात आयोजिण्यात आली असून, न्यायाधीशाच्या भूमिकेत कुमार केतकर तर अतुल भुसारी, प्रमोद भुसारी, मोहन पांडे, राजेश चवडे व अन्य यांचा त्यात प्रमुख सहभाग राहणार आहे.

# रीदा सेठची विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

जिल्हा क्रीडा विभागातर्फे विद्यापीठ बास्केटबॉल मैदान, रवी नगर येथे आयोजित वयोगट १९ खाली मुलींच्या बास्केटबॉल स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल, वर्धमान नगरच्या संघाने उज्वल कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला.

या यशस्वी संघात आर्या सातवणे, लैशा झामड, ऐश्वी जैन, हिया शर्मा, ध्रुवी पटेल, सांची अग्रवाल, वेदिका मदान, आशि गोयल, खुशी जेजानी, रीदा सेठ, विरती सवाडिया आणि मानसी डोलके या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारावर रीदा सेठ हिची विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. ही निवड नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी स्वप्नील बन्सोड यांनी केली. रीदा सेठ हिने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक मनोज रक्षक यांना दिले आहे. तिच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या कांचन उके, उपप्राचार्या दीपा चक्रवती व जयंति चक्रवती यांनी अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मलब्यापासून बनवलेले १० टक्के रिसायकल साहित्य वापरणे अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
नागपूर महानगरपालिकेने पर्यावरणाचे रक्षणासह बांधकाम-पाडकाम (सी अँड डी) कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण आणि पथदर्शी निर्णय घेतला आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मनपाच्या सर्व विकासकामामध्ये आता किमान १० टक्के रिसायकल अर्थात प्रक्रिया केलेले साहित्य सामग्री वापरणे अनिवार्य केले आहे. यासंदर्भात आयुक्तांनी एक परिपत्रक जारी केले असून, निर्णयामुळे 'पर्यावरण (बांधकाम आणि पाडकाम) कचरा व्यवस्थापन नियम, २०२५' चे पालन नागपूर शहरात अधिक प्रभावीपणे होण्यास मदत मिळणार आहे. सदर निर्णय हा येत्या १३ ऑक्टोबर पासून लागू होणार आहे.

नागपूर महानगरपालिकेने मे. हैद्राबाद सी अँड डी वेस्ट प्रा. लि. यांच्या भागीदारीने भांडेवाडी येथे १५० टन प्रतिदिन क्षमतेचा बांधकाम व पाडकाम कचरा प्रक्रिया प्रकल्प यशस्वीरित्या सुरू केला



आहे. या प्रकल्पातून बारीक वाळू, जाडी वाळू १० मि.मी., २० मि.मी., ४० मि.मी. आकाराची खडी आणि चिकणमाती हे पुनर्चक्रित साहित्य तयार होत आहे. या सामग्रीची व्हीएनआयटी येथे यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

परिपत्रकानुसार, मनपाने घेतलेल्या सर्व नवीन निविदांमध्ये बेडिंग वर्क्स, ग्रॅन्युलर सब-बेस, पुनर्भरण, कुशनिंग (आधार देण्याचे काम) अशा बाबींकरिता पुनर्चक्रित सामग्रीपैकी किमान १० टक्के सामग्री पुनः वापरणे बंधनकारक असणार आहे. विशेषतः बगीचा मार्ग, पादचारी मार्ग आणि मलनिस्सारण वाहिनी/पावसाळी नाली मधील पाईपलाईनचे खोदकाम पूर्ववत करण्याकरिता (अमृत -२ अंतर्गत येणारी कामे वगळता) ही अट त्वरित लागू राहतील.

यामध्ये प्रकल्प ऑपरेटर मे. हैद्राबाद सीअँडडी वेस्ट प्रा. लि. यांची ही जबाबदारी असेल की, उत्पादित साहित्य सर्व तांत्रिक मानके पूर्ण करेल. यासाठी ऑपरेटरला दर महिन्याला व्हीएनआयटीमध्ये सामग्रीची तपासणी करून त्याचा अहवाल नागपूर महानगरपालिकेला सादर करणे अनिवार्य आहे. तसेच, पुनर्चक्रित सामग्रीच्या दरांचा तक्ता नियमितपणे मनपाला सादर करावा लागेल.

मनपाच्या या निर्णयामुळे बांधकाम व पाडकाम कचऱ्याचा प्रश्न तर सुटेलच, शिवाय शहराच्या विकासकामांमध्ये पुनर्चक्रित सामग्रीचा वापरामुळे नैसर्गिक स्त्रोतांची बचत होईल वाढेल, ज्यामुळे नागपूर शहर हरित आणि स्वच्छ, सुंदर होण्यास मदत होईल.

### असे आहेत कंत्राटदारांसाठी नियमः

मनपाने निविदा दस्तऐवजात कंत्राटदारांसाठी पुढील नियम समाविष्ट करणे अनिवार्य केले आहे:

**१. प्रमाणांची सक्तीः -** कंत्राटदाराने भांडेवाडी येथील सीअँडडी वेस्ट प्रकल्पातून प्रक्रिया केलेले किमान १० टक्के पुनर्चक्रित साहित्य खरेदी करणे अनिवार्य असेल.

**२. अनुपलब्धतेचा अहवालः-** ऑपरेटरकडून सामग्री उपलब्ध न झाल्यास, कंत्राटदाराने त्वरित अभियंता-प्रभारी यांना लेखी स्वरूपात त्याची माहिती देणे आवश्यक आहे.

**३. अंतिम देयकः-** कंत्राटदाराला अंतिम देयक (बिल) केवळ तेव्हाच दिले जाईल, जेव्हा तो प्लांटच्या खरेदीच पुरावा सादर करेल आणि १० टक्के पुनर्चक्रित सामग्री रिसायकल एग्रीगेट वापरल्याचे प्रमाणपत्र अभियंता-प्रभारी देतील. सामग्री उपलब्ध नसल्यास, अभियंता-प्रभारी तसे प्रमाणित करतील.

## निलडोह नगर पंचायतचे प्रभाग निहाय आरक्षण घोषीत

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ७ :
तालुक्यातील नगर पंचायत निलडोहचे प्रभाग निहाय आरक्षण नुकतेच जाहिर झाले असुन १७ पैकी ४अनुसूचित जाती, १ अनुसुचित जमाती व ५ नामाप्र करिता आरक्षित झाल्या आहे. ९ जागा महिलांकरिता आरक्षित आहे.

अनुसूचित जाती करिता प्रभाग क्र. ४ ,६,९,१३ आरक्षित असुन ४ व ६ महिलासाठी आरक्षित आहे. प्रभाग क्र.२ अनुसूचित जमातीच्या महिला करिता आरक्षित आहे. प्रभाग क्र. १, ३, ५, ८ व ११ नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाले असुन त्या प्रभाग क्र.३, ८ व ११ महिलांकरिता आरक्षित झाले आहे. उर्वरीत ७ प्रभाग खुल्या वर्गासाठी असुन प्रभाग क्र. १०, १५ व १६ महिलासाठी आरक्षित आहे, तर प्रभाग क्र. ७, १२, १४ व १७ सर्वसाधारण आहे. आरक्षण सोडतीची प्रक्रिया उपविभागीय अधिकारी सुरेश बगळे व मुख्याधिकारी योगीता डांगरे यांच्या उपस्थितीत निलडोह नगर पंचायतच्या सभागृहात पार पडली. या वेळी भाजपा, कांग्रेस, राकांपा, शिवसेना, वंचित आघाडी व बसपा आदी राजकीय पक्षाचे पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्यानी उपस्थित होते.

## हृदयविकार जनजागृती सेमिनारचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
भारतामध्ये हृदयविकाराचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. SAAOL हार्ट सेंटर, जी नॉन-इन्वेसिव्ह कार्डिओलॉजी या क्षेत्रात आघाडीवर कार्यरत संस्था आहे, यांच्या वतीने हृदयविकार जनजागृती सेमिनार आयोजित करण्यात आला आहे. हा सेमिनार ८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ६.०० वाजता, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, झाशी राणी चौक, वर्धा रोड, सिताबर्डी, नागपूर येथे होणार आहे. या प्रसंगी डॉ.बिमल छाजेर (एम.डी.), SAAOL हार्ट सेंटर चे संस्थापक व संचालक, यांना प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सेमिनारचे उद्दिष्ट हृदय आरोग्याविषयी जनजागृती करणे असून, त्यात जीवनशैलीतील सुधारणा,EECP थेरपी आणि "झिरो ऑईल" आहार पद्धतीवर विशेष भर दिला जाणार आहे.

प्रतिबंध आणि रोगमुक्तीवर सतत लक्ष केंद्रित करून, आम्ही "हार्ट अटॅक-फ्री इंडिया" घडविण्याच्या उद्देशाने जनजागृती, नवोपक्रम आरोग्यसेवेच्या माध्यमातून कार्यरत आहेत अशी माहिती पत्रकार परिषदेत डॉ.आलम यांनी दिली त्यावेळी, डॉ. सुमित, कुमारी डॉ. जोशना उपस्थित होत्या.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
लग्नाचे आमिष दाखवून प्रियकराने तरुणीचे लैंगिक शोषण केले. लग्नासाठी दबाव टाकला असता शिवीगाळ करून मारहाण केली. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी २० वर्षीय पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. मॅक्स रोनाल्डो इमॅन्युअल असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मॅक्सने सप्टेंबर महिन्यात पीडितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. लग्नाचे आमिष दाखवून वेगवेगळ्या हॉटेलमध्ये घेऊन तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले. पीडितेने त्याला लग्नाबाबत विचारले असता टाळाटाळ करू लागला. पीडितेने दबाव टाकला असता मॅक्सने लग्नास थेट नकार दिला. जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. पीडितेने घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी लैंगिक अत्याचार आणि ॲट्रोसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## पोलीस बॉईज जनआधार संघटना कार्यकारिणीचा विस्तार

■ महासागर प्रतिनिधी, वानाडोंगरी, दि. ७ :
सदरक्षणाय -खलनिग्रणाय हे ब्रिद घेऊन सज्जनांच्या रक्षणासाठी व दुर्जनांवर करडी नजर ठेवून असणाऱ्या पोलीस प्रशासनाच्या कार्यतत्परतेमुळे समाज सुरक्षित आहे. परंतु काम करतांना पोलिस अधिकारी कर्मचारी तथा परीवार यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते ते उपेक्षित राहतात. त्यांच्या समस्या व मागण्या शासना पर्यंत पोहचविल्या पाहिजे व त्यांच्या परीवाराला न्याय मिळाला पाहिजे.



जनतेच्या रक्षणार्थ पोलीस व पोलीसाच्या हक्कासाठी पोलीस बॉईज जनाधार संघटना;या उद्देशाने प्रेरित होवुन युवा सामाजिक कार्यकर्ते संस्थापक अध्यक्ष राकेश करंडे यांनी पोलीस बॉईज जनाधार संघटना स्थापन केली व तिचा संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार सुरू आहे. जिल्हाध्यक्ष नागपूर (ग्रामीण) रोशन उमेश गुप्ता, हिंगणा तालुका अध्यक्ष प्रदीप यादव, तालुका अध्यक्ष प्रमोद भारती, ईसासनी शहर अध्यक्ष रितेश सिंह, डिगडोह शहर उपाध्यक्ष नीतेश महतो, मोहित विश्वकर्मा, कुलदीप दुबे, अर्जुन गुप्ता, पंकज गुप्ता, धनंजय शाह, यांची नियुक्ती कार्यकारिणी समितीवर करण्यात आली. या प्रसंगी संघटनेचे वरीष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओडिशातून तीनचाकी ऑटोने गांजाची तस्करी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
गुन्हे शाखेच्या एनडीपीएस पथकाने ओडिशातून तीनचाकी ऑटोने गांजाची तस्करी करणाऱ्या साळा-भाटव्याच्या जोडीला गोपनिय माहितीच्या आधारावर भंडारा-नागपूर मार्गावर सापळा रचून अटक केली. आरोपींनी ऑटोच्या मागच्या भागात विशेष जागा तयार केली होती. पोलिसांनी गुंगारा देण्यासाठी त्यावर ॲल्युमिनियम प्लेट आणि रेक लावली होती. मात्र माहिती खात्रीशिर असल्याने आरोपी जाळ्यात अडकले. पोलिसांनी त्यांच्याकडून १२ किलो गांजासह एकूण ८ लाख ४४ हजार ९०० रुपये किंमतीचा माल जप्त केला. मोहम्मद शारिक मोहम्मद वकील अंसारी (३०) रा. इंदिरा मातानगर, बिनाकी लेआऊट आणि मोहम्मद मासूम शेर अली (२२) रा. वनदेवीनगर अशी अट-केतील आरोपीची नावे आहेत.

### साळा-भाटवा एनडीपीएस पथकाच्या जाळ्यात

शहरातील एक गांजा तस्कर तीनचाकी मालवाहू ऑटोमध्ये माल घेऊन नागपूरला येत असल्याची माहिती रविवारी दुपारी एनडीपीएस पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर भंडारा रोडवर नाका क्र. ५ जवळ सापळा रचण्यात आला. सांगितलेल्या वर्णनाचा ऑटो अडवून शारिक याला ताब्यात घेतले. मात्र ऑटोच्या झडतीत पोलिसांना काहीही मिळाले नाही. परंतु माहिती खात्रीशिर असल्याने पोलिसांनी ऑटोची पुन्हा झडती घेतली असता मागच्या भागात ॲल्युमिनियम प्लेट आणि त्यावर एक रॅक दिसली. संशयातून प्लेट आणि रॅक हटवली असता एक खाचा दिसला. त्यात १२ किलो गांजा मिळाला.

चौकशीत शारिकने सांगितले की, तो स्वतः ऑटोने माल घेण्यासाठी ओडिशाला गेला होता. नागपुरात प्रवेश करताच त्याने पोलिसांपासून वाचण्यासाठी साळा मासूम याला बोलावले होते. पोलिसांनी त्यालाही पकडले. मालाबाबत विचारणा केली असता शारिकने ओडिशाच्या लावण्य राणा आणि गोपिनाथ भोक्ता याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली.

## वाहन चोर पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
सक्करदरा पोलिसांनी ठाण्यात नोंद वाहन चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक केली. नौशाद खान उर्फ शकिमान अमल खान (४३) रा. मोठा ताजबाग असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचे दुचाकी वाहनही जप्त केले.

मोठा ताजबाग परिसरात दर्गा रोडवर राहणारे फिर्यादी शेख गुलाम ख्वाजा (४६) यांनी १८ ऑगस्टच्या रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांची एमएच-४९/बीडी-१४९७ क्रमांकाची दुचाकी घरासमोर पार्क केली होती. अज्ञात आरोपीने त्यांची दुचाकी चोरून नेली होती. १९ ऑगस्टच्या सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर त्यांनी सक्करदरा ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर आरोपीचा सुगावा लागला. पोलिसांनी नौशादला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्हाची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्याकडून चोरीचे वाहनही जप्त करण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

## घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या योजनेचा अतिरिक्त आयुक्तांनी घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी सोमवारी (ता.६) घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी लावण्यात आलेल्या फेस रेकग्निशन प्रणाली बद्दल माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सदर प्रणालीचा वापर वाढविण्याचे आवाहन केले. तसेच प्रणालीचा वापर न करणाऱ्या कर्मचाऱ्यान कारवाई इशारा दिला.

बैठकीत मनपाचे उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले,




माहिती तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे, राज चौधरी उपस्थित होते.

लोखंडे आणि राज चौधरी यांनी सांगितले की, या प्रणालीद्वारे किती कर्मचारी कामावर हजर आहेत, ही माहिती सहज उपलब्ध होईल. त्यांनी सांगितले की, लक्ष्मीनगर झोन, गांधीबाग झोन, मंगळवारी आणि हनुमान नगर झोन येथे स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती चांगली असून लकडगंज, आशीनगर, धंतोली, आणि नेहरू नगर झोन येथे कमी आहे. झोनल स्वच्छता अधिकाऱ्यांनी या प्रणालीचा वापर करतांना येणाऱ्या समस्येची माहिती दिली.

## अभिनव कल्पनेतून चमकले 'जीव्हीपी पॉइंट'

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
नागपूर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला सतरंजीपुरा झोन मधील लालनगर भागात नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या अभियानांतर्गत लालनगर भागातील एका जुन्या 'जी.व्ही.पी. पॉइंट' अर्थात मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्या जाणाऱ्या ठिकाणाची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली, तसेच नागरिकांनी पुन्हा कचरा फेकू नये, यासाठी या जागेचे आकर्षक सौंदर्यीकरण करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्वात उपायुक्त राजेश





भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखीत विशेष चमू कार्य करीत आहे. मनपाच्या चमूने स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने हा पॉइंट पूर्णपणे स्वच्छ केला. यानंतर, भविष्यात इथे कोणीही कचरा टाकू नये यासाठी तिथे वॉल पेंटिंग करण्यात आले.

तसेच 'वेस्ट टू बेस्ट' अर्थात कचऱ्यापासून सर्वोत्तम कलाकृती या संकल्पनेचा वापर करून त्या जागेला एक आकर्षक आणि प्रेरणादायी स्वरूप देण्यात आले. या अभिनव कल्पनेचे केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन शहरने आपल्या अधिकृत सोशल मिडिया स्थळांवर शेअर करीत कौतुक केले आहे. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी या कार्याबद्दल कौतुक केले.

## मुद्रांक विक्रेत्यांवर येणार गदा

### अतिरिक्त शुल्क घेऊन स्टॅम्प पेपर विक्रीचा प्रकार उघड



■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ७ :
शहरातील परवानाधारक मुद्रांक विक्रेत्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा दहा टक्के अतिरिक्त शुल्क घेऊन स्टॅम्प पेपरची विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

या बेकायदेशीर वसुलीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी व विद्यार्थ्यांना आर्थिक फटका बसत असून त्यांना उदंड त्रास सहन करावा लागत आहे. शासकीय कागदपत्रे, बँक व्यवहार तसेच प्रवेशप्रक्रियेसाठी स्टॅम्पची आवश्यकता असते; मात्र अतिरिक्त शुल्कामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर मोठा भार पडत आहे. या गंभीर प्रकाराची तक्रार नमाजी अली (विदर्भ सहसंघटक, शिवसेना), दिलीप गावकवाड (जिल्हा संघटक, शिवसेना), प्रशांतजी बाई (जिल्हा समन्वयक, कामगार सेना), जितेंद्र बंजारी (सर्कल अध्यक्ष) व विक्रमजी सावरकर यांच्या उपस्थितीत मुद्रांक जिल्हाधिकारी एस. ए. तरासे यांच्याकडे करण्यात आली.

तक्रार प्राप्त होताच जिल्हाधिकारी तरासे यांनी तातडीने संबंधित विभागास कारवाईचे आदेश दिले. दोषी विक्रेत्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवून त्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून, लवकरच मुद्रांक विक्रेत्यांवर कारवाईची गदा कोसळण्याची असल्याचे संकेत मिळत आहेत.

**महासागर प्रभाग वार्ता**

## नाकाबंदी संपली, परंतु बेरिकेड्स अद्याप हटवले नाहीत; नागरिक त्रस्त

प्रमोद जांभूळकर, नागपूर दि. ६
कळमना ते पारडी मार्गावरील वाहतूक विभागाच्या नाकाबंदीचे काम पूर्ण होऊन महिना उलटून गेला असला तरीही, संबंधित ठिकाणी लावलेली बेरिकेड्स अद्याप हटवण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लकडगंज झोन क्रमांक ८ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक २३ मधील या मार्गावरून कळमना मार्केटहून मोठ्या प्रमाणावर जड वाहतूक होत असते. याशिवाय शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयांकडे जाणाऱ्या नागरिकांचीही वर्दळ या मार्गावर मोठ्या प्रमाणावर आहे. अशा परिस्थितीत रस्त्याच्या



मधोमध उभे असलेले बेरिकेड्स अपघाताला आमंत्रण देत आहेत. यामुळे वाहतुकीचा खोळंबा तर होत आहेच, पण वाहनचालकांना सतत धोका पत्करावा लागत आहे. स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेत, या ठिकाणची बेरिकेड्स त्वरित हटविण्याची मागणी केली आहे. यामध्ये आल्विन गायकवाड, हरीश सहारे, मनोज रक्षक, समीर सोनेकर, अजय दत्ता, मिलिंद उपाध्याय, उमेश गिरडकर, राजेश तेलरांधे, खुशाल बाळबुधे, प्रितीन रंगारी ,धीरज यादव ,स्वप्नील समर्थ , विनोद डहारे ,वीरेंद्र बघेल ,प्रभू गजभिये ,भूषण नाईक यांनी पुढाकार घेतला आहे. प्रशासनाने तत्काळ कारवाई करून रस्ता मोकळा करावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## नागोराव पाटणकर मार्गावर मोकाट जनावरे

### अपघाताची शक्यता

प्रमोद जांभूळकर, नागपूर दि ७
प्रभाग ७, इंदोरा नागोराव पाटणकर मार्ग, जरीपटका रोड परिसरात रस्त्यावर मोकाट फिरणारी जनावरे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मोठा धोका बनली आहेत. हा रस्ता अत्यंत वर्दळीचा असून, अनेक शाळा आणि महाविद्यालयात ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे याठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या रस्त्यावर वाहनांची सतत ये-जासुरू असते. अशा परिस्थितीत रस्त्यावर फिरणारी मोकाट जनावरे वाहतुकीस अडथळा निर्माण करीत असून, वारंवार जामची स्थिती निर्माण होते. काही वेळा ही जनावरे अचानक वाहनांसमोर येतात, ज्यामुळे अपघात होण्याचा धोका अधिक वाढतो आहे.स्थानिक नागरिक प्रमोद लोखंडे, राजन शेंडे, राजन मानवटकर, संजय रामटेके, जितु गोडबोले, निलेश बोरकर, विजय वाघमारे, विक्की डोंगरे ,सागर डोंगरे ,आनंद साखरे ,रविन्द्र जनबंधू यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, या मोकाट जनावरांना तातडीने कोंडवाड्यात टाकावे व संबंधित



जनावरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करावी.नागरिकांच्या या मागणीची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन आवश्यक पावले उचलावीत, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.